## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | भारतीय समाजाचे आकलन | १ |
| २) | लिंग भिन्नता व स्त्रियांवरील अत्याचार | १७ |
| ३) | अपंगत्व | ४२ |
| ४) | जातीवाद जमातवाद आणि आंतर जातीय संघर्ष | ५६ |
| ५) | प्रदेशवाद, भाषिक भिन्नता आणि संघर्ष | ६८ |
| ६) | भारतीय संविधान / राज्यघटना | ७९ |
| ७) | राजकीय प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक | ९७ |


munotes.in

विभाग -१

# घटक -१

# भारतीय समाजाचे आकलन

**पाठाची रचना :**

१.० पाठाची उद्दिष्ट्ये
१.१ प्रास्ताविक
१.२ धर्मानुसार लोकसंख्या विभागणी
१.३ लिंगभेदावर आधारित विषमता
१.४ भारताची भाषिक विविधता
१.५ भारताची प्रादेशिक भिन्नता, ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची गुण वैशिष्ट्ये
१.६ सारांश
१.७ विद्यापीठस्तरीय प्रश्न

## १.० पाठाची उद्दिष्ट्ये

- भारताची धर्मानुसार लोकसंख्या विभागणी समजावून घेणे.
- भारताची लिंगभेदावर आधारित विषमता समजावून घेणे.
- भारतातील भाषिक विविधता ही संकल्पना समजावून घेणे.
- भारताची प्रादेशिक भिन्नता समजावून घेणे.
- ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची गुण वैशिष्ट्ये समजावून घेणे.
- भारतातील विविधतेतील विषमता ही संकल्पना समजावून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. आकाराच्या दृष्टीने विचार केल्यास भारत हा जगातील सातवा देश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये चीन खालोखाल भारताचा दुसरा क्रमांक लागतो. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या सोळा टक्के लोकसंख्या भारतात आहे. जगाच्या वाटणीला आलेल्या भूभागापैकी फक्त २.४ टक्के भूभाग भारताच्या वाट्याला आला आहे. त्यामुळे भारतात लोकसंख्येची घनताही जास्त आहे. येथे भिन्न धर्म, पंथ, जाती, उपजाती, भाषा, देव-देवता, उपासना पद्धती, चालीरीती आहेत. येथे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विविधता आहे. येथे ग्रामीण, आदिवासी आणि नगरांमध्ये राहाणाऱ्या नागरिकांचीही विविधता आहे.

भारत हा भाषा, धर्म, प्रादेशिकता, जाती, वंश इ. अनेक दृष्टीने विविधता असणारा देश आहे. भारताच्या प्रत्येक राज्याची भाषा वेगळी आहे. प्रत्येक भाषेच्या अनेक बोलीभाषा अस्तित्वात आहेत. जगातील सर्व मोठ्या धर्माचे अनुयायी थोड्याफार प्रमाणात भारतात आढळून येतात. भारतात प्रत्येक प्रदेशातील, धर्मातील, जातीतील चालीरीती, रूढी, परंपरा व संस्कृती वेगवेगळी आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात भौगोलिक विविधता प्रकर्षाने आढळून येते. प्रचंड मोठ्या क्षेत्रफळामूळे भारतात प्राकृतिक विविधता ही फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. या विभिन्न वैशिष्ट्यांचा भारतीय जीवन पद्धतीवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

## १.२ धर्मानुसार लोकसंख्या विभागणी

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. राष्ट्र म्हणून भारतीय राज्यघटना कुठल्याही धर्माचा पुरस्कार करीत नाही. त्याचबरोबर एखाद्या धर्माला विरोधही करीत नाही. भारत हा बहुधार्मिक देश आहे. अनेक धर्माचे लोक त्यांच्या वैशिष्ट्यांसह येथे राहतात. भारतात हिन्दू, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, जैन व इतर अनेक धर्माचे लोक राहतात.

भारतात सर्वात जास्त हिन्दू धर्माचे लोक राहतात. त्यानंतर इस्लाम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन व इतर धर्माचे लोक राहतात. हिन्दू धर्म हा येथील अतिप्राचीन धर्म आहे. या धर्मामध्ये चार पुरुषार्थ, चार आश्रम, चार वर्ण, चार योग इ. शी निगडीत तत्वज्ञान आहे. हिन्दू धर्मानंतर लोकसंख्येने मोठा असलेला धर्म म्हणजे इस्लाम होय. परमेश्वर एकच आहे. त्याच्या आज्ञा पोहोचविणाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे लोकांनी वागले पाहिजे हा उपदेश इस्लाम धर्मात प्रमाण मानला जातो. अल्लाहला शरण जाणे, मानव प्राण्यावर प्रेम करणे, अहिंसा धर्माने वागणे इ. इस्लाम धर्म शिकवतो.

ख्रिस्ती धर्मात व्यक्तीगत तसेच सामुहिक अशी दोन प्रकारे उपासना केली जाते. त्यांच्यामध्ये रोमन कॅथॉलिक पंथ, प्रॉटेस्टंट पंथ आणि ईस्टर्न ऑर्थोडॉक्स हे तीन पंथ आढळतात. त्यांच्या धार्मिक श्रद्धा आणि विधी यात फरक आहे.

भारतामध्ये वैदिक काळापासून बौद्ध धर्माचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. बौद्ध तत्वज्ञान हा धर्म नसून ती एक वैयक्तिक, सामाजिक आचरण पद्धती आहे. प्रत्येकाने व्यवहारात पाळायची पाच तत्वे म्हणजेच पंचशील" ही प्रत्येक अनुयायाने पाळण्याची एक संहिता आहे. बौद्ध धर्मामध्ये हीनयान व महायान हे दोन पंथ आहेत.

भारतामध्ये शीख धर्माचे अनुयायी असून हा धर्म मुख्यतः हिन्दु धर्म व इस्लाम धर्मातील निवडक तत्वांचे एकत्रीकरण करून बनलेला आहे. १५ व्या शतकात गुरुनानक यांनी या धर्माची स्थापना केली. शीखांमध्ये पाच "क" कारांना म्हणजेच केस, कंगवा, कृपाण, कडे आणि कच्छया यांना महत्त्व आहे.

munotes.in

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्येत विविध धर्माच्या लोकांचे प्रमाण (प्रतिशत) पुढील प्रमाणे आहे.

| धर्म | प्रतिशत दशलक्ष | लोकसंख्येमध्ये |
|---|---|---|
| हिन्दू | ८०.५ | ८२७.६ |
| इस्लाम | १३.४ | १३८.२ |
| ख्रिश्चन | २.३ | २४.१ |
| शीख | १.९ | १९.२ |
| बौद्ध | ०.८ | ८.०० |
| जैन | ०.४ | ४.२ |
| इतर | ०.७ | ६.७ |
| एकूण | १००.०० | १०२८ |

भारतात सर्वात जास्त लोकसंख्या हिन्दूंची असली तरीही इतर धर्माच्या लोकांनाहीभारतीय घटनेने समान दर्जा दिला आहे. भारताच्या घटनेत धर्म निरपेक्ष किंवा निधर्मी हा शब्दआहे.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - भारतीय समाजाचे लोकसंख्येच्या आधारे बहुधार्मिक स्वरूप स्पष्ट करा.

munotes.in

भारतात सर्वात जास्त लोकसंख्या हिन्दूंची असली तरीही इतर धर्माच्या लोकांनाही भारतीय घटनेने समान दर्जा दिला आहे. भारताच्या घटनेत धर्म निरपेक्ष किंवा निधर्मी हा शब्द आहे.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - भारतीय समाजाचे लोकसंख्येच्या आधारे बहुधार्मिक स्वरूप स्पष्ट करा.

## १.३ लिंगभेदावर आधारित विषमता

लिंगभेदावर आधारित विषमता संपूर्ण जगभर अस्तित्वात आहे. दक्षिण आशियाई देशातील आणि देशांतर्गत लिंगभेदावर आधारित विषमतेच्या एका अलिकडच्या अभ्यासावरून असे दिसून आले आहे की, भारतामध्ये लिंगभेदावर आधारित विषमतेत फार विविधता दिसून आली आहे.

### १.३.१ लिंगभेदावर आधारित विषमतेचे स्वरूप :

**१) स्त्रियांचा मृत्युदर :** जगातील काही देशांमध्ये स्त्रियांचा मृत्युदर पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. ज्या ठिकाणी लिंगभेदावर आधारित विषमता आहे. अशा देशांमध्ये स्त्रियांचा मृत्युदर पुरुषांपेक्षा अधिक आहे. ज्या ठिकाणी ही विषमता नाही आणि आरोग्य दक्षता आणि आहार याबाबतीत भेद केला जात नाही त्या देशात मृत्यूदरात विषमता नाही.

**२) जन्माच्या बाबतीत विषमता :** पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्माला प्राधान्य दिले जाते. पूर्वीच्या काळी ही बाब माता-पित्याच्या इच्छेपुरती मर्यादित होती. पण आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे गर्भाचे लिंगनिदान करणे शक्य झाले आहे. त्यामुळे स्त्रीभृणहत्या काही देशांत सामान्य बाब झाली आहे.

**३) प्राथमिक सोयींबाबत विषमता :** लोकशाही देशांमध्येही लिंगभेदावर आधारित विषमता फार मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अफगाणिस्तानसारख्या देशामध्ये मुलींना शाळेत जाण्यासाठी प्रतिबंध केला जातो. भारतामध्ये मुलांच्या तुलनेत मुलींच्या शिक्षणाला कमी महत्त्व दिले जाते. इतर प्राथमिक सोई सुविधांच्या बाबतीतही फार मोठी विषमता असल्याचे दिसून येते.

**४) संधीच्या बाबतीत विषमता :** प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर जरी विषमता दिसत नसली तरी उच्च शिक्षणाच्या बाबतीत ही विषमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. फारच थोड्या मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळते.

**५) व्यावसायिक विषमता :** रोजगाराच्या संधी आणि बढती यामध्येही पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना डावलले जाते, भारतामध्ये अशा प्रकारची विषमता मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते.

**६) मालकी हक्का बाबत विषमता :** भारतात पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे स्त्रियांना संपत्तीच्या मालकी हक्कापासून वंचित ठेवले जाते. घर, जमीन इ. मालमत्तेच्या बाबतीत स्त्रियांना अत्यंत विषम अधिकार असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना व्यावसायिक, आर्थिक आणि समाजिक उपक्रमांमध्ये प्रवेश मिळविणे व प्रगती करणे कठीण होते.

**७) कौटुंबिक पातळीवरील विषमता :** कौटुंबिक पातळीवरही स्त्रियांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर विषमता असल्याचे दिसून येते. कौटुंबिक पातळीवर ग्रामीण भागात फार मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष विषमता दिसून येते. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने बाहेर काम करीत असल्या तरी त्यांना घरकाम आणि मुलांचे संगोपन यांचा अतिरिक्त भार सहन करावा लागतो.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - लिंगभेदावर आधारित विषमतेचे स्वरूप स्पष्ट करा.

## १.४ भारताची भाषिक विविधता

भारत हा बहुभाषिक देश आहे. भारतीय राज्य घटनेचे २२ मुख्य भाषा मान्य केलेल्या आहेत. मात्र भारतात प्रत्यक्षात १६५२ भाषा व पोटभाषा अस्तित्वात आहेत. भारतीय राज्यघटनेने ज्या २२ भाषांना अधिकृत भाषांचा दर्जा दिलेला आहे. त्या भाषा पुढीलप्रमाणे आहेत - (भारतीय संविधान परिशिष्ट-८)

| | |
|---|---|
| १) असामी | १२) मळ्यालम |
| २) बंगाली | १३) कन्नड |
| ३) हिन्दी | १४) बोडो |
| ४) उर्दू | १५) डोग्रा |
| ५) मराठी | १६) कोंकणी |
| ६) गुजराथी | १७) मणिपुरी |
| ७) पंजाबी | १८) ओरिया |
| ८) संस्कृत | १९) संथाली |
| ९) काश्मिरी | २०) नेपाळी |
| १०) तेलुगू | २१) सिंधी |
| ११) तामिळ | २२) मैथिली |

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक राज्याला त्यांच्या बोली भाषेस कार्यालयीन भाषा म्हणून मान्यता दिली आहेच. भारतामध्ये काही राज्यांची निर्मितीच मुळात भाषेच्या आधारे झाली. स्वातंत्र्यानंतर काही राज्यांची निर्मिती भाषिक तत्वावरच झाली. उदा. पंजाबची विभागणी पंजाब आणि हरियाणा अशी झाली तर संयुक्त महाराष्ट्राची विभागणी भाषेच्या आधारवर महाराष्ट्र आणि गुजराथ अशी झाली.

भारतामध्ये सर्वात जास्त प्रमाणात हिंदी भाषा बोलली जाते. लोकसंख्येनुसार भाषांची क्रमवारी पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| | |
|---|---|
| १ हिन्दी ४०% | ७ गुजराथी ४.८०% |
| २ बंगाली ८.२% | ८ कन्नड ३.८०% |
| ३ तेलुगु ७.८०% | ९ मल्याळम ३.६०% |
| ४ मराठी ७.४०% | १० उडिया ३.३०% |
| ५ तामिळ ६.३०% | ११ पंजाबी २.८०% |
| ६ उर्दू ५.१% | १२ असामी १.६०% |

इतर भाषा बोलणारांचे प्रमाण १%पेक्षाही कमी आहे.

प्रशासकीय कारभारात सुव्यवस्था यावी यासाठी १९५६ मध्ये राज्य पुनःर्रचनाआयोगाच्या शिफारशीनुसार भाषावार राज्यांची निर्मिती करण्यात आली. परंतु त्यामुळे स्वतःच्याभाषेच्या फाजील अभिमानाची निर्मिती झाली व त्यातून अनेक वाद निर्माण झाले. उदा. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न. राष्ट्रभाषा म्हणून उत्तरेकडील राज्यांनी हिंदीचा आग्रह धरला तरदक्षिणेकडील राज्यांनी त्याला मोठ्या प्रमाणावर विरोध केला. यातून फार मोठ्या प्रमाणावरभाषिक दंगे झाले. वास्तविक सर्वच भारतीय भाषा हा भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे.आणि तो आपण जपला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - भारतीय समाजाचे बहुभाषिक स्वरूप स्पष्ट करा.

## १.५ भारताची प्रादेशिक भिन्नता, ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची गुणवैशिष्ट्ये

भारत हा भौगोलिक विविधतेने समृद्ध असणारा खंडप्राय देश आहे. भारताच्या उत्तरेलाहिमालय, दक्षिणेला हिन्दी महासागर, पूर्वेला बंगालचा उपसागर आणि पश्चिमेला अरबी समुद्रआहे. भारतातील नद्या, उत्तरेला हिमालयातून, मध्य भारतात विंध्य पर्वतातून, सातपुडा तसेचसह्याद्री पर्वतातून उगम पावलेल्या आहेत. त्यापैकी गंगा, यमुना, ब्रम्हपुत्रा, नर्मदा, गोदावरी,कावेरी, कृष्णा महानदी या प्रमुख नद्या आहेत. काश्मीर ते कन्याकुमारी आणि कच्छ ते आसामअशा विशाल भूप्रदेशात भू-प्रकृती, हवामान, पर्जन्यमान यामध्ये विविधता आढळते.

munotes.in

उत्तरेलाहिमालय पर्वत रांगा, मधला प्रदेश गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा सतलज या नद्यांनी सखल बनलेला.दक्षिणेला पठारांचा तसेच पूर्वेला व पश्चिमेला समुद्र किनारपट्ट्याचा असे भारताचे प्रमुख चारप्राकृतिक विभाग आहेत. भौतिक पर्यावरणातील विविधतेमुळे भारतीय जीवनात देखील मोठीविविधता दिसून येते.

भारतीय संघराज्यात २८ राज्ये आणि ७ केंद्र शासित प्रदेश आहेत. भारतात ६ लाखखेडी आहेत. भारतामध्ये फार मोठ्या प्रमाणात भौगोलिक आणि हवामानविषयक, विविधतादिसून येते या विविधतेमुळे वनस्पती, प्राणी, दुर्मिळ औषधी वनस्पती, पक्षीजीवन यामध्ये फारमोठ्या प्रमाणात विविधता आढळते. भारतातील काही विभाग आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि काहीआर्थिकदृष्ट्या अविकसीत आहेत. काही राज्यांमध्ये संरचनात्मक सोयी अत्यंत चांगल्या आहेततर काही राज्यात त्या अत्यंत कमकुवत आहेत. प्रादेशिक विविधता आणि त्यानुसार असणारीविषमता भारतामध्ये नवीन नाही. अनेक विकसनशील देशात प्रादेशिक विषमता फार मोठ्याप्रमाणात दिसून येते. भारतातील प्रादेशिक विषमता गेल्या १० वर्षात फारशी कमी झालेली नाही.

### १.५.१ ग्रामीण समाज :

भारतीय समाजाची ग्रामीण समाज, शहरी समाज आणि आदिवासी समाज अशी तीनमागात विभागणी करण्यात येते. औद्योगिकरण आणि नागरीकरण सोडून लोकसंख्येचा मोठा भागग्रामीण भागात राहतो. २००१ च्या जनगणनेनुसार भारताच्या १०२.८६ कोटी लोकसंख्येपैकी७२.२१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर २७.७९ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते.याचा अर्थ ७४ कोटी १६ लाख एवढी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते.

munotes.in

### ग्रामीण समाजाची व्याख्या :

**१) त्रि. ना. अत्रे :** खेडणे म्हणजे जमीन कसणे, जमीन कसणारा तो खेडूत आणि अशाखेडूतांची वस्ती म्हणजे खेडे किंवा गाव होय.

**२) पौराणिक व्याख्या :** ज्या वसाहतीच्या भोवती किर्रसार झाडी आहे, शेती योग्य जमीन आहेआणि ज्या वसाहतीमध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळ मजुर राहतात अशी वस्ती म्हणजे गाव होय.

**३) हॅरॉल्ड पिक :** ज्या वसाहतीमध्ये एका कुटुंबापेक्षा मोठा समुदाय जवळ-जवळ वास्तव्यकरतो. शेतीची मशागत करतो, पडित जमिनीत गुरे चारतो आणि शेजारच्या गावाच्या सीमेपर्यंतहक्क सांगतो असा समुदाय म्हणजे गाव होय.

**४) शासनाची व्याख्या :** शासनासमोर गाव म्हणजे महसुली गाव (शेतसारा वसुलीसाठीठरविलेले गाव) व प्रशासकीय घटक (राज्य कारभाराच्या सोयीसाठी ठरविलेले क्षेत्र) म्हणजे गावहोय. पूर्वीचे गाव, ग्रामपंचायत असल्यास ती चालू ठेवण्याचा, बंद करण्याचा किंवा फेरफारकरण्याचा शासनास अधिकार आहे.

१० हजारापेक्षा कमी लोकसंख्या असणारी कोणतीही वसाहत ग्रामीण भाग म्हणूनविचारात घेतली जाते.

**ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये :**

**१) शेती प्रधानता :** ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. पूर्वीच्या काळी शेतीव्यवसायासाठी आवश्यक सेवा बलुतेदारांमार्फत पुरविल्या जात होत्या. त्याचा मोबदला शेतकरीबलुतेदारांना देत असत. ग्रामीण समाजातील जास्तीत जास्त लोकांचा व्यवसाय शेती असल्यामुळेग्रामीण जीवनावर शेतीचा प्रभाव अधिक आहे. ग्रामीण समाजात ज्याच्या मालकीची जमीन अधिकअसेल त्याचा ग्रामीण समाजात आणि राजकीय जीवनावर प्रभाव असतो.

**२) कुटुंबावर आधारित सामाजिक जीवन :** कुटुंब हा पहिला सामाजिक समूह आहे. कुटुंबहा ग्रामीण समाजाचा मुख्य आधार आहे. व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजांचीपूर्तता कुटुंबातच होते. सदस्यांची ओळख कुटुंबानुसार होते. सदस्याची प्रतिष्ठा, सामाजिकसंबंधांचे स्वरूप कुटुंबाने ठरते. ग्रामीण समाजात व्यक्तीवादापेक्षा कौटुंबिकता अधिक महत्त्वाचीअसते. कुटुंबामुळे समाजाचे सातत्य आणि स्थैर्य टिकून राहते. समाजाच्या सर्व अवस्थांमध्येआणि सर्व समाजात कुटुंबसंस्था अस्तित्वात होती. व्यक्तीचे समाजिकरण करण्याच्या प्रक्रियेतकुटुंब महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**३) जातिप्रथेवर आधारित समाज रचना :** ग्रामीण समुदाय अनेक जातींमध्ये विभागलेलाआहे. कायद्याने जाती व्यवस्था नष्ट करण्यात आली असली तरी ग्रामीण समाजातून जाति व्यवस्था पूर्णपणे नाहिशी झालेली नाही. ग्रामीण समाजात व्यक्तीचे पद, दर्जा, सामाजिक सबंधांचेस्वरूप जातीनुसार निश्चित होते. जात हा सामाजिक स्तरीकरणाचा बंद वर्ग आहे. जातीच्यासभासदाच्या वर्तनावर संबंधीत जातीकडून नियंत्रण ठेवले जाते. पूर्वी जातीनुसार परंपरागतव्यवसाय लोकांना करावा लागत असे. खेड्यातील वस्त्यांची रचना जातीनुसार झालेली दिसते.आज ही पद्धती बरीचशी शिथील झालेली आहे.

**४) नैसर्गिक वातावरण :** ग्रामीण भागातील वातावरण नैसर्गिक असते. गावाच्या सभोवतालीशेतजमीन, वृक्षवल्ली, जलाशय, नद्या आणि ओढे असतात. हवा आणि पाणी स्वच्छ असते.ग्रामीण लोकांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन सभोवतालच्या नैसर्गिकघटकांशी निगडीत असते.

**५) लहान आकार :** नागरी समुदायाच्या तुलनेत ग्रामीण समुदायातील लोकसंख्या कमी असते.त्यामुळे गावाचा आकार लहान असतो. ग्रामीण समुदायातील व्यक्ती एकमेकांना ओळखणारेअसतात. एकमेकांचे स्वभाव, एकमेकांची सुखदु:खे एकमेकांना माहीत असतात.

**६) सण, समारंभ व धार्मिक उत्सव यांचा प्रभाव :** ग्रामीण समाजात सण, समारंभ आणिधार्मिक उत्सवांना महत्त्व असते. या निमित्ताने गावातील लोक एकत्र येतात. ग्रामीण ऋतुचक्राशीआणि शेतीव्यवसायाशी घनिष्ठ संबंध असतो. सणसमारंभामध्ये, निसर्गातील विविध तत्वांची पूजाकेली जाते. उदा. अग्नीपूजा, सुर्यपूजा, नागपूजा, वटपौर्णिमा इ. नैसर्गिक प्रकोपाच्यानिराकरणासाठी पूजापाठ, व्रतवैकल्य, अनुष्ठान, यज्ञयाग इ. विधी केले जातात. ग्रामदेवतेच्याकृपेमुळे गावाची भरभराट होते. गावाचे स्थैर्य टिकून राहते अशी ग्रामीण लोकांची श्रद्धा असते.

**७) स्त्रियांची पराधीनता :** पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमध्ये आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण पुरूषांच्याहातांत झालेले असते. कौटुंबिक पातळीवर आणि ग्रामीण समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थानदिले जाते. ग्रामीण समाजात स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल यापुरते मर्यादित मानले जाते.कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांना सामावून घेतले जात नाही. कष्टांच्या कामामध्ये मात्रस्त्रिया अग्रस्थानी असतात. आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतीत ग्रामीणसमाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या आज्ञेतच रहावे लागते. स्त्रियांच्या दुय्यम दर्जामुळेआजार, आरोग्य आणि राहणीमान या बाबतीत त्यांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होते.

**८) श्रमिक बाजारपेठ व तंत्रज्ञान :** ग्रामीण समाजात श्रमाचे फारसे विशेषीकरण झालेले नाही.ग्रामीण समाजातील लोकांना केवळ शेतीसंबंधी तंत्रज्ञान अवगत असते. त्यामुळे श्रमाचीउत्पादकता अतिशय कमी राहते. ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये उत्पादन, वितरण आणि विनिमय यासर्व प्रक्रियांचे स्वरूप अतिशय साधे आणि सरळ असते. बाजारपेठेचा विचार करता शेतीतूनउत्पादित होणाऱ्या मालाच्या विक्रीसाठी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी मध्यवर्तीगावाच्या बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागते.

**९) निसर्गशक्तीचा प्रभाव :** ग्रामीण समाजाचा निसर्गाशी दैनंदिन संबंध येतो. शेती आणिपशुपालन निसर्गावर अवलंबून असल्याने ग्रामीण लोकांवर निसर्गशक्तीचा प्रभाव अधिक असतो.बऱ्याचदा ग्रामीण समाजाला निसर्गापुढे हार पत्करावी लागते. त्यातूनच दैवी शक्तीचे अस्तित्वआणि श्रेष्ठत्व ग्रामीण समाज मान्य करतो. निसर्गापुढे माणसाचे अपूर्णत्व तो मान्य करतो.पारलौकिक व अतिमानवी शक्तीवर आधारित श्रद्धात्मक आचारविचारांना प्राधान्य दिले जाते.संघर्षाऐवजी निसर्गाला शरण जाणे हे लोक पसंत करतात.

**१०) सामाजिक जीवनातील एकविधता :** ग्रामीण समुदायातील सर्व लोकांचा व्यवसायजवळपास सारखा असतो. आचार-विचार आणि जीवनपद्धती सारखी असते. राहणीमान थोड्याफार फरकाने सारखे असते. अशा प्रकारे ग्रामीण सामाजिक जीवनात एक प्रकारची समानतादिसून येते.

**११) प्राथमिक संबंधाची तीव्रता :** ग्रामीण समाजातील लोकांचे संबंध घनिष्ठ आणिअनौपचारिक स्वरूपाचे असतात. ग्रामीण सामाजिक संबंध साधे आणि प्रामाणिक असतात.एकमेकांच्या सुखदुखःमध्ये अनौपचारिकपणे ते सहभागी होत असतात. एकमेकांचे स्वभाव आणिखाजगी आयुष्य एकमेकांना माहित असते. परस्परांच्या दैनंदिन सान्निध्यामुळे हे संबंध घनिष्ठ,प्रामाणिक आणि जिव्हाळ्याचे असतात.

**१२) साधे व प्रामाणिक जीवन :** ग्रामीण भागात बहुतांश निर्वाह शेतीवर अवलंबुन असतो.शेतीत परंपरागत उत्पादनतंत्राचा अवलंब केला जातो. अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा ग्रामीणसमाजावर मोठा प्रभाव असतो. उत्पन्न कमी असल्याने दैनंदिन जीवन व राहणीमान यामध्येसाधेपणा असतो. कुटुंबसंस्थेचा प्रत्येक व्यक्तीवर प्रभाव असतो. प्राथमिक संबंधाची तीव्रताअसल्याने ग्रामवासियांच्या जीवनात प्रामाणिकपणाला फार महत्त्व असते.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - ग्रामीण समाजाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

### १.५.२ शहरी किंवा नागरी समाज :

भारतीय जनगणनेनुसार ज्या वसाहतीची लोकसंख्या १०,००० पेक्षा अधिक आहेआणि ज्या ठिकाणी महानगरपालिका, नगरपालिका किंवा नगरपरिषद अस्तित्वात आहे तसेचज्याठिकाणीच्या एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकसंख्या बिगरशेती व्यवसायात गुंतलेलीआहे आणि लोकसंख्येची घनता प्रती चौरस किलोमीटरला ४०० पेक्षा अधिक आहे. अशीवसाहत म्हणजे शहर किंवा नगर होय. लुइस वर्थ या समाजशास्त्रज्ञाच्या मते सामाजिकविजातीयता असलेल्या व्यक्तींचा तुलनात्मकदृष्ट्या मोठा व दाट आणि स्थायी स्वरूपाचासमुदाय म्हणजे शहर किंवा नगर होय. २००१ च्या जनगणनेनुसार २७.७८ टक्के लोकसंख्याशहरी भागात वास्तव्य करते.

### नागरी समाजाची वैशिष्ट्ये :

**१) व्यवसायांचे विविधकरण :** शहरी भागात बिगर शेती व्यवसायात म्हणजेच उद्योग आणिसेवाक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या गुंतलेली असते. शहरातील विविध औद्योगिकवसाहतीमध्ये विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये फार मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग काम करीतअसतो. तसेच सेवाक्षेत्राचा विचार करता व्यापार आणि वाणिज्य, वाहतुक आणि दळणवळण,बैंकिंग, विमा, शिक्षण, आरोग्य, शासकीय आणि अशासकीय, धार्मिक, करमणूक या विविधक्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात लोकसंख्या गुंतलेली असते. शहरामध्ये फार मोठ्या प्रमाणातव्यावसायिक विविधता आढळते.

**२) मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव :** पर्यावरणाचे नैसर्गिक पर्यावरण आणि मानवनिर्मितपर्यावरण असे दोन भाग पडतात. शहरी भागात उंच इमारती, कचेऱ्या, मनोरे, रस्ते, वाहने,कारखाने, व्यापारी पेठा, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, विद्यापीठ या मानवनिर्मितपर्यावरणाचा प्रभाव अधिक जाणवतो. शहरातील लोकसंख्येचा या मानवनिर्मित पर्यावरणाशीदैनंदिन संबंध येतो. शहरी समाजाचा मानवी प्रयत्नांवर अधिक विश्वास असतो. वैज्ञानिकदृष्टीकोनाचा प्रभाव या लोकसंख्येवर अधिक असतो.

**३) समाजाचा मोठा आकार व दाट वस्ती :** ग्रामीण समुदायाच्या तुलनेने शहरी समाजाचाआकार मोठा असतो. सहाजिकच येथे उद्योग व्यवसायांचे केंद्रिकरण फार मोठ्या प्रमाणातझालेले असते. या उद्योग व्यवसायांसाठी, शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ग्रामीणभागातून शहरी भागात स्थलांतरीत होते. मुख्य शहराला जोडून उपनगरांचा विकास

होतो.ज्याप्रमाणे उंच इमारती बांधल्या जातात त्या प्रमाणे झोपडपट्ट्यादेखील निर्माण होतात. वाहतुकआणि दळणवळणाच्या सोयींच्या विकासामुळे शहरांचा विस्तार वेगाने होत आहे.

**४) लोकसंख्येची अधिक घनता :** ग्रामीण भागात लोकसंख्येची घनता अत्यंत कमी असते तरशहरी भागात लोकसंख्येची घनता प्रती चौरस किलोमीटर ४०० पेक्षा अधिक असते. उच्चउत्पन्न गटातील व्यक्ती शहराच्या मध्यवर्ती भागात उंच इमारतींमध्ये सदनिका विकत घेऊनराहतात. अतिशय कमी उत्पन्न गटातील व्यस्ती झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करतात. शहरातीलदाट लोकवस्तीमुळे सार्वजनिक सुविधांवर फार मोठ्या प्रमाणात ताण पडतो.

**५) लोकसंख्येची विजातीयता :** शहरांमध्ये सामाजिक विजातीयता मोठ्या प्रमाणात दिसूनयेते. विविध जाती-जमातीचे लोक एकाच वसाहतींमध्ये राहत असतात. धर्म, जात, पंथ, प्रांत,भाषा हे सर्व भेद शहरांमध्ये पुसट होतात. शहरांची अशी एक वेगळी संस्कृती त्याठिकाणीअसित्वात येते. ज्याप्रमाणे शहरात सामाजिक विविधता फार मोठ्या प्रमाणात आढळते. त्याप्रमाणेव्यवसायिक विविधताही फार मोठ्या प्रमाणात आढळते. अनेकविधता हे शहरी समाजाचे अभिन्नअंग आहे. आचार, विचार, वेशभूषा, सामाजिक मूल्ये, जीवनपद्धती याबाबतीत शहरांमध्ये फारमोठ्या प्रमाणात विविधता आढळते.

**६) दुय्यम संबंधाचे प्राबल्य :** सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक विविधतेमुळे शहरातीललोकांचे संबंध दुय्यम आणि औपचारिक स्वरूपाचे असतात. या संबंधाचे स्वरूप प्रासंगिक आणितात्पुरत्या स्वरूपाचे असते. शहरातील व्यक्ती कारणमात्र आणि साधनमात्र या स्वरूपाचे संबंधठेवतात. एकाच इमारतीमध्ये वेगवेगळ्या सदनिकांमध्ये राहणाऱ्या लोकांना एकमेकांचे खाजगीजीवन, व्यवसाय, सामाजिक संपर्क याबाबत माहिती नसते. प्रत्येक व्यक्ती आपले खाजगीजीवन, स्वतंत्रपणे आणि आपल्या इच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य शहरामध्ये उपभोगते.

**७) व्यक्तिप्रधान जीवन :** ग्रामीण जीवन ज्याप्रमाणे कुटुंबप्रधान असते, त्याप्रमाणे शहरी जीवनव्यक्ती प्रधान असते. लाखो लोकांच्या समुदायात एकमेकांच्या जीवनात डोकावण्याचा कोणीहीप्रयत्न करीत नसल्याने व्यक्ती पुरेसे व्यक्तीस्वातंत्र्य शहरामध्ये उपभोगू शकते. कुल, कुटुंब,जात याबाबींना शहरात काहीही महत्त्व नसते. प्रत्येक व्यक्ती आपल्या अंगी जास्तीत जास्तकौशल्ये प्राप्त करून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करते. व्यक्तीला आवडीनिवडीजोपासता येतात. इच्छा आणि पात्रतेनुसार निर्णय घेता येतात. तो स्वतःच्या सुखाचा जास्तीतजास्त विचार करतो.

**८) छंद व गरजेनुसार समुदाय निर्मिती :** शहरामध्ये फार मोठी सामाजिक विजातीयताअसली तरी लोक आपला छंद आणि हितसंबंधाच्या जोपासनेसाठी ऐच्छिक मंडळे स्थापनकरतात. त्यातील प्रवेश आणि निर्गमन पूर्णपणे ऐच्छिक असते. त्यांचे स्वरूप हास्य क्लब,लायन्स क्लब, रोटरी क्लब, नाट्यमंडळ, साहित्य मंडळ अशा स्वरूपाचे असते.

**९) मोठ्या प्रमाणात सामाजिक गतिशीलता :** शहरी भागामध्ये भौगोलिक, सामाजिक आणिव्यावसायिक गतीशीलता फार मोठ्या प्रमाणात आढळते. व्यक्तीला आपला दर्जा आणि भूमिकायात परिवर्तनास मोठा वाव असतो. या गतिशिलतेचे स्वरूप सामाजिक, व्यावसायिक,

भौगोलिकस्तरीय त्याचप्रमाणे प्रादेशिक असू शकते. व्यक्ती स्वत: कष्टाच्या जोरावर आपल्या दर्जामध्येपरिवर्तन करीत असते.

१०) **सामाजिक सहिष्णुता** :सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक स्तरीय विविधतेच्यापरिस्थितीत प्रत्येक व्यक्ती एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती स्विकारतो. सामाजिकविविधतेमुळे व्यक्तिगत निर्माण होणारी अस्थिरतेची भावना कमी करण्यासाठी लोक एकमेकांनामदत करतात. स्पर्धात्मक वातावरणात सहकार्याच्या आधारे टिकून राहण्याचा सर्वजण प्रयत्नकरतात. मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोट, महापूर या संकटसमयी ही सहिष्णुता फार मोठ्या प्रमाणातप्रत्ययास येतांना दिसते.

११) **श्रमविभाजन व विशेषी करणास वाव :** शहरामध्ये उद्योग, व्यापार, व्यवसाय, शिक्षण,साहित्य, कला, राजकारण, करमणूक अशी निवडीची मोठी श्रेणी प्रत्येकासमोर असते.प्रत्येकाला आपल्या क्षमता सिद्ध करण्यास याठिकाणी मोठा वाव असतो. स्पर्धाही मोठी असते.प्रत्येक क्षेत्रामध्ये श्रमविभाजनास आणि विशेषीकरणास मोठा वाव असतो. प्रत्येकाचीआवडनिवड, पात्रता, क्षमता, शैक्षणिक अर्हता यानुसार शहरात संधी उपलब्ध असतात.

१२) **आर्थिक निकषावर आधारित सामाजिक स्तरीकरण :** शहरात आर्थिक निकषावरआधारित सामाजिक स्तरीकरण उदयास आलेले असते. गरीब, माध्यम, श्रीमंत अशी समाजाचीवर्गव्यवस्था अस्तित्वात आलेली असते. आर्थिक परिस्थितीवरून समाजातील व्यक्तीचा दर्जाठरत असतो. निवासस्थान, व्यवसाय, आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थान हे वर्गव्यस्थेचेनिकष प्रभावी असतात.

१३) **दुय्यम नियंत्रण :** किंग्जले डेव्हिस यांनी नागरी समुदायांच्या दुय्यम नियंत्रण या विशेषवैशिष्ट्याचा उल्लेख केला आहे. मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे केंद्रीकरण, विविध प्रांतातूनआलेली आणि विविध भाषा बोलणारी लोकसंख्या, सामाजिक विजातीयता, सामाजिक संबंधातीलऔपचारिकता यामुळे नागरी समुदायाचे नियंत्रण करण्यासाठी कायदा आणि पोलिस यंत्रणा यांचीभूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी बऱ्याचदा कठोरउपाययोजना करावी लागते.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - शहरी समाजाची वैशिष्ट्ये सांगा.

munotes.in

### १.५.३ आदिवासी समाज :

आदिवासी समाज नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त, जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्याततुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीपेक्षा वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरिती किंवा संस्कृतीआदिवासी समाजाची असते. आदिवासी समाजाला वनवासी, गिरीजन असे पर्यायी शब्द वापरलेजातात. आदिवासी समाजाच्या बोली भाषेला लिपी नसते. आदिवासी समाजाबद्दल अनेकगैरसमज आहेत. प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्वच्छंद लैंगिक संबंध ठेवणारे, वनफळे वमांस भक्षण करणारे, जादूटोण्यावर श्रद्धा ठेवणारे उघडेनागडे लोक असे अनेक गैरसमजआदिवासी समाजाबद्दल आहेत. वास्तविक निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या, स्वच्छंदी व स्वतंत्रवृत्तीच्या आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासींचे जीवन सुखमय वअनुकरणीय आहे.

भारतात आदिवासी समाज आसाम, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड,मणिपूर, त्रिपूरा, हिमाचल प्रदेश, पूर्व पंजाब, पूर्व काश्मिर, उत्तर प्रदेशाचा उत्तरभाग, बंगाल,बिहार, उत्तर महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, आंध्रप्रदेश, म्हैसूर, केरळ आणि तामिळनाडू याराज्यात आहे. आदिवासी समुदायांची भारतातील संख्या ४२७ आहे. महाराष्ट्रात ४७ आदिवासीजमाती आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये आदिवासींचे प्रमाण ८.२० टक्के आहे. भारतीयराज्य घटनेच्या कलम ३४१ आणि ३४२ नुसार राष्ट्रपतींच्या आदेशानुसार जी सूची तयारकरण्यात आली त्या सूचीमध्ये समाविष्ट समुदायांना अनुसूचित जमाती असे म्हटले जाते.

### आदिवासी समाजाची व्याख्या

**१) डॉ. रिव्हर्स :** आदिवासी समूह हा साधा, सरळ सामाजिक समूह असून त्यातील सदस्य हेएकाच समान बोलीचा वापर करतात. समान उद्दिष्ट्यांच्या पूर्ततेसाठी एकत्र येऊन कार्यकरतात.

**२) गिलीन आणि गिलीन :** एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, समान बोली भाषाबोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतु अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांचेएकत्रीकरण म्हणजे आदिवासी होय.

**३) डॉ. डी. एन्. मुजुमदार :** समान नाव धारण करणाऱ्या, विशिष्ट भू-प्रदेशावर निवासकरणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह, व्यवसाय याबाबत समान निषेध नियमांचेपालन करणारा व निश्चित अशा काही मूल्यांची, विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूहम्हणजे आदिवासी होय.

भारतातील प्रत्येक आदिवासी समुदायाची संख्या फार कमी असली तरी ते सर्वभारतभर आढळतात. ते दुर्गम डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात रानावनात राहतात म्हणून त्यांनावन्यजाती, जनजाती, वनवासी, गिरीजन असे म्हटले जाते. बहुतेक समाजशास्त्रज्ञांच्या मतेभारतातील आदिवासी हे भारतातील मूळचे निवासी, अगदी मूळचे रहिवासी आहेत.

**आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये :**

**१) विशिष्ट भूभागावर वास्तव्य :** आदिवासी हा प्रादेशिक समूह आहे. एका आदिवासीसमाजाचे वास्तव्य विशिष्ट भूप्रदेशावर असते. सामान्यतः डोंगराळ प्रदेश, दऱ्याखोऱ्या, घनदाटजंगल, पाण्याने वेढलेले बेट अशा भूप्रदेशावर त्यांचे कायमचे वास्तव्य असते. नैसर्गिक तटबंदीआणि दुर्गम भूभाग यामुळे सुधारलेल्या जगाशी त्यांचा फारसा संपर्क येत नाही.

**२) प्रमाण लघुता :** आदिवासी समुदायाचा आकार लहान असतो. समुदायातील कुटुंबाचीसंख्या मर्यादित असते. आदिवासींचे पाडे किंवा छोटी गावं विखुरलेली असतात. सामाजिकसंपर्काचे प्रमाण अत्यंत मर्यादित असते.

**३) समान रक्तसंबंध समान नाव :** प्रत्येक आदिवासी जमातीतील लोक परस्परांना एकाचरक्त नात्याचे मानतात. उत्पत्ती एकाच पूर्वजापासून झाली आहे अशी त्यांची श्रद्धा असते.बऱ्याचदा आदिवासी जमातीच्या नावाचा संबंध पूर्वजांशी असतो. प्रत्येक आदिवासी जमातीलातिचे स्वतंत्र नाव असते. उदा. कोरळू, भिल्ल, वारली, नागा, गोंड इ.

**४) समान बोली भाषा, लेखनकलेचा अभाव :** प्रत्येक आदिवासी जमातीची बोलीभाषा स्वतंत्रअसते. परस्पर विचारांची देवाण-घेवाण ते या बोलीभाषेतून करतात. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिकवेगळेपण आणि समूहभावना अधिक मजबूत होते. त्यांच्या भाषेला लिपी नसते. त्यामुळे लिखाणकलेचा अभाव असतो. त्यामुळे ज्ञान, कला, साहित्य, तंत्र यांच्या विकासावर फार मर्यादापडतात. लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, उखाणे, चालीरीती, परंपरा या त्यांच्यासंस्कृतींचे हस्तांतरण बोलीभाषेतून होत असते.

**५) साधी अर्थव्यवस्था :** इव्हान्स प्रिचर्ड यांच्या मते आदिवासींची अर्थव्यवस्था अत्यंत साधीअसते. पोटापुरते अर्थोत्पादन किंवा निर्वाह प्रधानता हे त्यांच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे.बहुतेक आदिवासी जमाती शिकार, मासेमारी, वनफळांचे संकलन, अत्यंत प्राथमिक स्वरूपाचीशेती इ. व्यवसाय करतात. त्यांच्याकडे आवश्यकतेपेक्षा अधिक शिलकीसाठा आढळत नाही.बहुतेक आदिवासी जमातीमध्ये वस्तूविनिमयावर अधिक भर असतो. बाजाराभिमुख अर्थव्यवस्थानसल्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात कमालीची समानता आढळते. आदिवासीमध्येश्रमविभाजन लिंगभेदावर आधारित आहे. व्यावसायिक विशेषीकरणाचा त्यांच्यामध्ये अभावआढळतो.

**६) मर्यादित तंत्रज्ञान :** आदिवासींची अर्थव्यवस्था साधी असते. कारण त्यांची तंत्रविद्याअत्यंत मर्यादित असते जी फक्त तोंडी देवाण-घेवाणीतून एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमित होते.सुधारलेल्या समाजातील तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचलेलेच नाही. शिकार, मासेमारी,खाद्यसंकलन, शेती याबाबतचे त्यांचे तंत्रज्ञान अत्यंत मर्यादित असते. अवजारे जुनाट असतात.जमीन उकरण्याची हत्यारे, धनुष्यबाण, मासेमारीसाठीची आणि शिकारीसाठीची जाळीयापलिकडे त्यांचे तंत्रज्ञान गेलेले नाही. उत्पादन कार्यासाठी स्वतःच्या कष्टावरच आदिवसीजास्त भर देतो.

**७) समान धर्म आणि जादूचा प्रभाव :** आदिवासींना निसर्गातील घडामोडीतीलकार्यकारणभाव कळत नसल्याने ते निसर्गाची, पूर्वजांची, भूताखेतांची पूजा करतात.आदिवासींचे धर्मसुद्धा समान असतात. धार्मिक बाबीसंबंधी त्यांची प्रतिक्रिया सामूहिक असते.त्याबाबत त्याच्यात मतभेद किंवा

तात्विक काथ्याकूट आढळत नाही. आदिवासी निसर्गाला शरणजातो. व्यावहारिक घडामोडींवर आपले नियंत्रण राहावे आणि आपल्या कार्यात यश यावे म्हणूनजादूटोणा, मंत्रतंत्र यांचा वापर ते करतात.

**८) वेगळी जीवनपद्धती :** आदिवासींचे सामाजिक संबंध औपचारिक व कराराच्या स्वरूपाचेनसतात. त्यांच्या जीवनात रक्तसंबंध, कुटुंब आणि समुदाय यांना महत्त्व असते. एका बाजूलाखूप स्वातंत्र्य उपभोगतांना त्यांचे जीवन सामूहिक स्वरूपाचे असते. सामूहिक जीवन जगतांनासमुदायाची नियमनव्यवस्था, आचारविचार, प्रथापरंपरा यांचे पालन आदिवासींना करावेच लागते.धार्मिक श्रद्धा, जादूटोणा, आचार-विचार, अन्न संस्कृती, वेशभूषा यामध्ये कमालीची समानताअसते. समाजमान्य जीवनपद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीने जीवन जगणे केवळ अशक्य असते.एखाद्याने त्याचे उल्लंघन केल्यास त्याला त्याच्या जमातीच्या शिक्षेला सामोरे जावे लागते.आदिवासी समाजामध्ये कमालीचे ऐक्य दिसून येते.

**९) जमातकेंद्रित आत्मीयता :** आदिवासी जमातीचे समान भू-प्रदेशावरील वास्तव्य, समानबोली भाषा, समान व्यवसाय, समान वेशभूषा, समान अन्नसंस्कृती, समान धर्मश्रद्धा यामुळेत्यांच्यात एक जमात केंद्री आत्मीयता निर्माण झालेली असते. त्यांच्या आचार-विचारात आणिजीवनविषयक दृष्टीकोनात कमालीचे साम्य आढळते.

**१०) जमात प्रमुखाला महत्त्वाचे स्थान :** प्रत्येक आदिवासी जमातीचा एक प्रमुख असतो. तोत्यांचा नायक असतो. त्यांच्या शब्दाचे सर्वजण पालन करतात. युद्ध संरक्षण, स्थानिक व्यवस्था,जमातीच्या कायद्याचे प्रशासन, न्यायदान ही राजकीय कार्ये तो पार पाडतो. काही वेळा अशाकारणांसाठी जमातीतील वृद्ध व अनुभवी लोकांची समिती असते.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न १) आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

प्रश्न २) ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजातील फरक स्पष्ट करा.

## १.६ सारांश

भारत हा भाषा, वंश, धर्म, संस्कृती, प्रादेशिकता इ. दृष्टिकोनातून विविधता असणारा देश आहे. येथे अनेक धर्माचे लोक आपली धार्मिक विविधता जपूनही एकोप्याने राहतात. भारतात प्रत्येक धर्मातील चालीरीती, रुढी, परंपरा आणि संस्कृती वेगवेगळी आहे. भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये भौगोलिक विविधता ही मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

लोकसंख्या विभागणीच्या दृष्टीने विचार केल्यास आजही लोक खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करीत असल्याचे दिसून येते. ग्रामीण लोकांनी मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर केल्याने भारतातील शहरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची वेगवेगळी वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते.

## १.७ पाठावर आधारित प्रश्न

१) भारतीय समाजाचे लोकसंख्येच्या आधारे बहुधार्मिक स्वरूप स्पष्ट करा.
२) लिंगभेदावर आधारित विषमतेचे स्वरूप स्पष्ट करा.
३) भारताची भाषिक विविधता स्पष्ट करा.
४) भारतीय ग्रामीण समाजाची व्याख्या सांगुन वैशिष्ट्ये लिहा.
५) शहरी समाज म्हणजे काय ? वैशिष्ट्ये सांगा
६) आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये लिहा.
७) ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजातील फरक स्पष्ट करा.
८) टिपा लिहा.
१) बहुधार्मिक स्वरूप
२) आदिवासी समाज
३) भाषिक विविधता
४) शहरी समाज
५) ग्रामीण समाज
६) ) लिंगभेदावर आधारित विषमता

❖❖❖❖

munotes.in

# घटक -२

## लिंग भिन्नता व स्त्रीयांवरील अत्याचार
## (Gender Disparity and Female Violence)

**पाठाची रचना :**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता
२.३ लिंग भिन्नतेमुळे निर्माण होणारी भिन्नता
२.४ भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान
२.५ स्त्रीयांवरील अत्याचार
२.६ स्त्री-भ्रुणहत्या
२.७ लिंग-गुणोत्तर प्रमाण
२.८ स्त्रीया आणि प्रसारमाध्यमे
२.९ भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय
२.१० सारांश
२.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

### २.० उद्दिष्टे

- लिंग भिन्नतेची संकल्पना समाजवून घेता येईल.
- स्त्रीयांवरील अत्याचाराचा सविस्तर अभ्यास करता येईल.
- भ्रुणहत्या व लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास करता येईल.
- प्रसार माध्यमांच्या स्त्रीयांविषयीच्या भूमिके संदर्भात जाणून घेता येईल.

### २.१ प्रस्तावना

तात्विक दृष्टिकोनांतून 'समानता' हा सदगुण (Virtue) आहे, म्हणून मानवीसमाजामध्ये नेहमी समानतेची अपेक्षा केली जाते. किंबहुना ज्या समाजामध्ये समानता आहे. तोचसमाज सुदृढ असतो व अनेक समस्येपासून मुक्त असतो. परंतु आपण सद्यपरस्थितीचा विचारकेल्यास अनेक प्रकारच्या समस्या आज समाजामध्ये दिसत आहेत.

munotes.in

समाजातील सर्व प्रकारच्यासमस्या. लिंगभेद, जातीभेद, वर्णभेद, भाषाभेद, प्रांतभेद, वंशभेद इत्यादी प्रकारच्या भेदामुळेनिर्माण झालेल्या दिसून येतात. हे सर्व प्रकारचे भेद समानतेच्या अथावामुळे म्हणजेचअसमानतेमुळे अस्तित्वात येतात. यामुळे असमानतेला दुर्गुण (Vice) समजले जाते.

समाजाचा सुमारे अर्धाभाग पुरुष आणि अर्धाभाग स्त्री असल्याने समाजाच्या सर्वांगीणविकासासाठी स्त्री आणि पुरुष हे दोन्हीही खऱ्या अर्थाने विकसित असणे गरजेचे आहे. त्यासाठीस्त्री - पुरुष समानता आवश्यक आहे. वैदिक काल खंडामध्ये स्त्री □पुरुष समानता होती. परंतुवैदिक काल खंडानंतर स्त्री-पुरुष समानता न राहता लिंगभेद ही समस्या उभी राहिली. स्त्रीयानाहीन, दीन लाचार समजून एक भोग्य वस्तू समजले जावू लागले. आधुनिक काळामध्ये अनेकसमाजसुधारक व प्रबोधनकार यांनी स्त्रीची अनेक समस्येतून मुक्तता करण्यासाठी प्रयत्न केले,परंतु आजही स्त्री पूर्णपणे समस्येतून मुक्त झालेली नाही. आजही तिच्यावर अनेक प्रकारचेअत्याचार होत आहेत.

## २.२ असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता

समाजामध्ये स्त्री - पुरुष, गरीब - श्रीमंत, उच्च - नीच, श्रेष्ठ - कनिष्ठ, इत्यादीअनेक प्रकारच्या विषमता म्हणजेच भिन्नता दिसतात. या भिन्नता असमानातामुळे निर्माण होतात.परंतु अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे असमानतेला सकारात्मक व नकारात्मक (Positive &Negative) असे दोन दृष्टिकोन आहेत. सकारात्मक दृष्टीकोनातून असमानतेचा विचारकेल्यास असमानता मानवी जीवनासाठी म्हणजेच समाजासाठी हानीकारक असू शकत नाही.त्यासाठी असमानतेचा तात्विक दृष्टिकोनांतून विचार केला पाहिजे.

वास्तविक पाहता निसर्गामध्ये असमानता राहणाराच, परंतु त्या असमानतेमध्ये समन्वयव सहकार्य (Co-ordination & Co-operation) या दोन्हींची ही आवश्यकता आहे.असमानतेमध्ये समन्वय व सहकार्य हे दोन्हीही एकाच वेळी कार्यान्वित होत असतील, तरअसमानतेमुळे विधायक कार्य होऊ शकते. यालाच ‘विविधतेतील एकता’ (Unity in Diversity) असे म्हटले जाते. भारतामध्ये अशा प्रकारे विविधतेत एकता दिसून येत होती.परंतु यासाठी समन्वय व सहकार्य या दोन्हींचीही आवश्यकता आहे. परंतु सद्यपरस्थितीमध्ये.एकता आपल्या देशांमध्ये दिसत नाही कारण समन्वय व सहकार्य (Co-ordination & Cooperation) या दोनही बाबीचा अभाव आहे.

निसर्ग नियमानुसार एखादे कार्य होण्यासाठी असमानतेची आवश्यकता आहे. याचेउत्कृष्ट उदाहरण म्हणजे हाताच्या बोटांची लांबी असमान आहे, म्हणून हाताच्या बोटांनीआपणांस कोणतेही कार्य आपण करु शकतो. जर हाताच्या बोटांची लांबी समान असती तरआपणांस हाताने व्यवस्थित कार्य करता आले नसते. या दृष्टीकोनातून विचार केल्यासनिसर्गामध्ये आणि मानवी जीवनांमध्ये असमानता असणार. मग या ठिकाणी एक अत्यंतमहत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे ‘असमानता बाधक, हानिकारक, विध्वंसक मानवीजीवनाला व निसर्गाला बाधक केव्हा ठरते ?या प्रश्नांचा खोल विचार केल्यास एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे, जेव्हाअसमानतेचा उपयोग मानव जेव्हा स्वार्थासाठी करतो, स्वतःचा

अहंकार पुष्ट करण्यासाठीकरतो. अनैतिक मार्गाने पद, सत्ता, प्रतिष्ठा, पैसा इत्यादी मिळवण्यासाठी प्रयत्न करतो, तेव्हा असमानता मानवी जीवन आणि समाजासाठी बाधक, हानिकारक व विध्वसंक ठरते. हीचअसमानतेची नकारात्मक बाजू होय. असमानतेच्या या नकारात्मक बाजूमूळे वेगवेगळया प्रकारचेजातीभेद, वंशभेद, प्रांतभेद, भाषाभेद, लिंगभेद इत्यादी अनेक प्रकारच्या भेदांची निर्मिती होऊनमानवी समाजामध्ये भिन्नता उभी राहते. अशा वेगवेगळया प्रकारच्या भिन्नतेमुळे मानवी जीवनअध : पतित मार्गाकडे जाते.

आज सगळीकडे आर्थिक विषमता (भिन्नता) दिसून येते. गरीबी व श्रीमंती यांच्यातीलदरी वाढतच चालली आहे. सद्यपरीस्थितीमध्ये गरीबाची गरीबी वाढतच आहे आणि श्रीमंताचीश्रीमंती वाढतच चालली आहे. त्यामुळे पराकोटीची गरीब -श्रीमंत ही भिन्नता आज समाजामध्येदिसून येते, म्हणून सर्व स्तरावर, सर्व प्रकारे आर्थिक समानता आणण्याचा प्रयत्न चालू आहे.सर्वांना समान वित्त कसे मिळेल? यासाठी प्रयत्न चालू आहे. परंतु खरोखर प्रत्यक्ष व्यवहारामध्येप्रत्येकाला समान वित्त मिळून आर्थिक समानता येईल का? या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी मिळते,कारण प्रत्येकाची बुध्दीशक्ती, शारिरीक शक्ती, वेगवेगळी राहणार . त्यामुळे प्रत्येकाला समानवित्त येऊन आर्थिक समानता येणं. ही गोष्ट अशक्य प्राय वाटते. मग आर्थिक समानता याचानेमका अर्थ काय?

तात्विक दृष्टिकोनातून आर्थिक समानतेमध्ये प्रथम अत्यंत महत्त्वाची गोष्ट येते,कीप्रत्येकांने पैसा म्हणजेच अर्थ प्रामाणिकपणे कष्ट करुन मिळवला पाहिजे. आळसामध्ये जीवनघालवून फुकटचे मिळवण्याचा प्रयत्न करु नये. वाईट मार्गाने पैसा मिळवला, तर एकाच ठिकाणीसंपत्तीचा संग्रह होतो. तेव्हा प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्याला पैसा मिळू शकत नाही. ही खऱ्याअर्थाने आर्थिक असमानता आहे. म्हणून आर्थिक समानतेमध्ये प्रामाणिकपणे कष्ट करुन पैसामिळवणे म्हणजेच "कर्म देवो भव। (Work is Worship)" प्रत्यक्ष व्यवहारामध्ये येऊन खरीश्रमप्रतिष्ठा उभी राहते. अशा प्रकारे आर्थिक समानतेमध्ये श्रमप्रतिष्ठा उभी राहणं, ही प्रथमआणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाजामध्ये प्रत्येक मानवांत दैवी भ्रातृभावाचा संबंध आहे, तोमानवाला समजणं खूप गरजेचे आहे.

वास्तविक पाहता प्रत्यक्ष व्यवहारामध्ये प्रत्येकांकडे समानवित्त नसणार. आहे रे नाही हे (Haves and Havenots) असे वर्ग असतात, तेव्हा दैवीभ्रातृभावाच्या नात्याने एक नैतिक कर्तव्य म्हणून आहे. आहे रे (Haves) हे नाही रे (Havenots) ची केअर □टेकरच्या भूमिकेतून काळजी घेऊ शकतात. हीच अपरिग्रहाची कल्पनासमाजामध्ये रुजवण्याचा प्रयान महात्मा गांधीनी करताना त्यांनी विश्वस्त (Trusteeship)ची संकल्पना सांगितलेली आहे. आर्थिक असमानतेचा हा सकारात्मक दृष्टिकोन आहे. परंतुआर्थिक असमानतेचा नकारात्मक दृष्टीकोन म्हणजे कोणत्याही वाईट मार्गाने, भ्रष्ट मार्गाचा वापरकरुन सामान्य जनतेची पिळवणूक करुन पैसा मिळवणे हा आहे, म्हणून आर्थिक समानता याचाअर्थ श्रम प्रतिष्ठा उभी राहून आर्थिक असमानतेचा सकारात्मक दृष्टिकोन होय.

याच प्रकारे समाजामध्ये निर्माण होण्याऱ्या प्रत्येक भिन्नतेचा विचार करता येतो.समाजामध्ये निर्माण होणारी प्रत्येक भिन्नता ही असमानतेच्या नकारात्मक दृष्टिकोनांमुळे निर्माणहोते. असमानतेमुळे निर्माण होणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या भिन्नता समाजाच्या सुदृढतेसाठीसमूळ नष्ट होणे खूप गरजेचे आहे. यासाठी असमानतेच्या सकारात्मक बाजूचा

munotes.in

उपयोग करुन हीसर्व प्रकारची भिन्नता नष्ट करता येते. तोच खरा व प्रामाणिक मार्ग होय. म्हणजेच दुसऱ्याशब्दांमध्ये आपण असे म्हणू शकतो की असमानतेचा सकरात्मक दृष्टीकोन म्हणजेच खरीसमानता होय. या प्रकारच्या समानतेमुळे सर्व भिन्नता नष्ट होतात.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - "असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता" ही संकल्पना असमानतेचा सकारात्मक व नकारात्मक दृष्टीकोनाच्या साहयाने सविस्तर स्पष्ट करा.

## २.३ लिंग भिन्नतेमुळे निर्माण होणारी भिन्नता

स्त्री आणि पुरुष मिळून समाज तयार होतो. स्त्री आणि पुरुष या दोघांच्या गुणांचाएकत्रित विचार केल्यास पूर्ण व्यक्ती बनते. अर्धनारी नटेश्वर हे याचेच प्रतिक आहे. जन्मतःचपुरुषांमध्ये पराक्रम, धाडसी वृत्ती इत्यादी आणि स्त्रियांमध्ये सहनशिलता, प्रेमळपणा, आत्मीयता,दयाळूपणा इत्यादी गुण असतात.

स्त्रियांच्या विकासामध्ये प्रामुख्याने जन्मजात मिळालेल्या गुणांचे संवर्धन आणिपुरुषांकडे असलेले पराक्रम, धाडसीपणा यासारखे गुण विकसित करणे या बाबींचा समावेशहोतो.परंतु स्त्रियांच्या विकासामध्ये फक्त भौतिक विकासाच्या दृष्टिकोनातून केवळ आर्थिकविकासाचाच विचार केला जातो आणि आज नेहमी एक प्रश्न उपस्थित केला जातो स्त्री श्रेष्ठ कीपुरुष श्रेष्ठ ? आज स्त्री शिक्षणांमुळे स्त्रीया शिकल्या पुरुषांपेक्षा श्रेष्ठ बनत आहेत, असे मानलेजाते परंतु वेदकाळामध्येही स्त्रियांना सांस्कृतिक पध्दतीचे शिक्षण मिळत असे व स्त्री -पुरुषसमानता होती. पण काळाच्या ओघामध्ये ही स्त्री -पुरुष समानता नष्ट झाली आणि लिंगभेदनिर्माण झाला. पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ अशी विचारधारा समाजामध्ये रुढ झाली आणि स्त्री

वरती अन्याय, अत्याचार, जुलुम इत्यादी अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टी ओढवल्या गेल्या. तिलाफक्त भोगवस्तू समजून हीन लेखले जाऊ लागले. अशा प्रकारे लिंग भेदामुळे पुरुष आणिस्त्रीयांमध्ये श्रेष्ठ -कनिष्ठ, उच्च -नीच इत्यादी प्रकारची भिन्नता, असमानता निर्माण झाली.

स्त्रीयांवर अनेक प्रकारची वाईट बंधने आली. तिचे खऱ्या अर्थाचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. अशाविपरीत काळामध्ये स्त्री -पुरुष, समानता येण्यासाठी खूप प्रयत्न झाले व आजही चालू आहेत.परंतु आज स्त्री -पुरुष समानतेचा अर्थ अतिशय विपरित घेतलेला दिसतो. तो

म्हणजे पुरुष जेजे काम करतो. ती सर्व कामे स्त्रीयांही करु शकतात. वास्तविक पाहता उपजात गुणांनुसारकामाची विभागणी स्त्री -पुरुषांमध्ये झालेली दिसते. स्त्रीयांकडे प्रेम, आत्मीयता, सहनशीलताइत्यादी गुण असल्याने ती कुटुंबाची काळजी घेणे व सदगुणांच्याा दृष्टीने कुटुंबातील सर्वांचाविकास ती उत्कृष्ट पध्दतीने करु शकते व पुरुष शौर्य, पराक्रम, धाडसी वृत्ती यांच्या साह्यानेतो कुटुंबासाठी कमावतो, त्याचे विनिमय घरातील जेष्ठ महिलांनी करायचे. परंतु आजच्याकाळात स्त्री - पुरुष समानता यांचा अर्थ पुरुष जे करतो. ते स्त्रीने करणे, असा घेतला जात आहे.

स्त्री-पुरुष समानतेचा नेमका व अचूक अर्थ वेद, उपनिषदे (वेदांत) गीता इत्यादींनीसांगितलेला आहे, तो खऱ्या अर्थाने आधुनिक विचार आहे. या विचारधारेनुसार स्त्री व पुरुष हेआध्यत्मिक दृष्टिकोनातून समान आहेत. जी भगवदशक्ती पुरुषांमध्ये आहे, तीच शक्तीस्त्रियांमध्ये आहे. म्हणून मनुष्यामधील मनुष्यत्वाच्या अर्थाने 'एक व्यक्ती' या नात्याने स्त्री -पुरुष समान आहेत. आध्यात्मिक विकास करण्याचा अधिकार स्त्री आणि पुरुष दोघांनाही समानआहे. म्हणून स्त्रीसुध्दा एक मनुष्य आहे, व्यक्ती आहे तिलाही मन,बुध्दी, भाव आहे. तिच्यावरकोणत्याही प्रकारे अत्याचार, जूलूम होऊ नयेत ही विचारधारा म्हणजे. स्त्री - पुरुष समानताहोय. आज सुधारणेच्या नावाखाली, आधुनिकतेच्या नावाखाली पुरुषी स्त्री (Manly Woman) बनत आहे. गांधीजीचा स्त्री - पुरुष समानतेचा विचार सांगतांना बी. के. लाललिहितात.

"Gandhi says, men and women have the same soul, and therefore are equal. The work assigned to one is not inferior to the work assigned to the other. Man, by nature, is physically strong and therefore. He puts in hard labour to support and protect the family. Women, by nature are loving and therefore, they are equipped by nature to play the role of a mother and the caretaker of the home. Both these duties are equally important and necessary. This must be realized by both men and women."

स्त्रियांच्या उपजत गुणांच्या विकासाच्या दृष्टिकोनांतून आज स्त्री - शिक्षणाचीआवश्यकता आहे. आजची स्त्री फक्त बाहय सौंदर्य वाढवण्यासाठी खूप प्रयत्न करीत आहे. याप्रयत्नात ती आंतरिक सौंदर्य असते. हेच विसरुन जाते. आंतरिक सौंदर्य म्हणजे मन, बुध्दी,भाव यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे. यासाठी जीवनांमध्ये आत्मविश्वास प्रामाणिकपणा,त्याग,सहनशिलता ही मूल्ये यावीत. या दृष्टीकोनातून विचार केल्यास लिंग भिन्नता राहणारनाही. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या भिन्नता समाजातून समूळ नष्ट होतील.

बुध्दिमान, कर्तत्त्ववान, स्त्रिया सर्व काळात, सर्व संस्कृतीत दिसून येतात, परंतु तरीहीसामान्य स्त्रीचे महत्त्व पुरुषांच्या तुलनेत सर्वत्र दुय्यम मानले गेले. आधुनिक विज्ञान वयंत्रयुगाचा उदय (औद्योगिक क्रांती) यामुळे उत्तरोउत्तर स्त्री स्वातंत्र्याला योग्य असा काळ येऊलागला. २० व्या शतकाच्या उत्तराधीत माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे ज्ञान -बुदधिमता यांनाअसाधारण महत्त्व झाले आहे. शरीर सामर्थ्यात स्त्री -पुरुषात फरक असला तरी बुध्दिमत्तेच्याबाबतीत स्त्रिया पुरुषां इतक्याच बुध्दिमान असल्याचे आढळते. यामुळे २१ व्या शतकातस्त्रीयुक्ती, योग्य अर्थाने स्त्री - पुरुष समानता, ही ध्येये साध्य करणे सोपे होणार आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - लिंग भिन्नतेमुळे निर्माण होण्याच्या भिन्नता सांगा व स्त्री -पुरुष समाजतेचा खरा अर्थ स्पष्ट करा.

---

---

---

---

## २.४ भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान

भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान समजण्यासाठी खालील तीन कालखंडाचा विचारकरावा लागेल.

३.४.१ वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे समाजातील स्थान.

३.४.२ वैदिक कालखंडानंतर स्त्रीयांचे समाजातील स्थान.

३.४.३ सध्याचे स्त्रीयांचे समाजातील स्थान

### २.४.१ वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे समाजातील स्थान.

वैदिक कालखंडामध्ये भारतीय स्त्रीयांना समाजामध्ये गौरवाचे व शक्तिशाली स्थानहोते. त्या काळी स्त्रीयांना आपले विचार व्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते निरनिराळयाकार्यक्रमांमध्ये, उत्कृष्ट पध्दतीने कृतिशील असत. प्राचीन हिंदू धार्मिक ग्रंथामध्ये सक्तीचे वर्णनशक्ती आणि प्रकृती म्हणून केले आहे.

- **शक्ती**

शक्ती म्हणजे वैश्विक तत्त्वाला गतीशिल करणारी उत्तेजना देणारी ऊर्जा होय. उदा. कालिकादेवी ही उर्जायुक्त, शक्तिमान व दुष्टांचा नाश करणारी आहे.

- **प्रकृति**

प्रकृति म्हणजे निसर्ग होय. प्रकृति ही कतिशील आहे.

महत्त्वाचे म्हणजे भारतातील इतिहासाला ज्ञात असलेल्या वैदिक कालखंडात स्त्रियांचेसमाजातील स्थान पुरुषांच्या बरोबरीचे होते. विविध उपक्रमामध्ये, कार्यक्रमांमध्ये स्त्रियांना भागघेण्याचे व स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे व्यक्ती स्वातंत्र्य होते. उदाहरणार्थ स्वयंवराची प्रथाहोय. स्वयंवराच्या प्रथेमुळे स्त्रियांना विवाहविषयक निर्णय घेण्याचे व बालविवाह अस्तित्वातनसल्याचे निर्दशनास येते. या कालखंडात मुलांप्रमाणे मुलीवरही उपनयन संस्कार करत असत.त्याचप्रमाणे मुलींना शिक्षणही घेता येत होते. विवाह जुळवण्यास कुटुंबाचा पुढाकार असला तरीमुलींचे मत विचारात घेतले जात होते. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रियांना पुर्न विवाह करण्याचीत्याचप्रमाणे विवाह विच्छेदनाचा अधिकार होता. ग्रहस्थाश्रमातील सामाजिक व धार्मिक कार्यातस्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत असत.

वैदिक कालखंडातील स्त्रिंया वेद वाङ्मयाचा अभ्यास करीत आणि वेगवेगळ्या प्रकारच्यावादविवादामध्ये त्या पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत असत. तपोवन शिक्षण पध्दती चालवण्यामध्येत्यांचा सहभाग पुरुषांच्या बरोबरीने असत. उदाहरणार्थ मैत्रेयी, गार्गी इत्यादी विद्वान स्त्रिंयावादविवादामध्ये निपूण असून इतरही अनेक सांस्कृतिक कार्यक्रमामधील सहभाग महत्त्वपूर्णहोता. अशा प्रकारे वैदिक कालखंडातील स्त्रिया विकसित असून एक मानव या संबंधाने स्त्री -पुरुष समानता दिसून येते. त्यामुळे त्याकाळी समाज व्यवस्थाही सुदृढ असल्याचे दिसते.स्त्रियांवरती अन्याय, जुलूम इत्यादी अनिष्ट प्रकारच्या कोणत्याही बाबी दिसून येत नाहीत.त्यामुळे या काळामध्ये संतुलित अशी विकसित समाज रचना दिसून येते.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे स्थान स्पष्ट करा.

### २.४.२ वैदिक कालखंडानंतर स्त्रीयांचे समाजातील स्थान

वैदिक कालखंडानंरचा काळ हा स्त्रीयांच्या स्थित्यंतरातील दुसरा कालखंड होय. याकालखंडात स्त्रीयांची भूमीका मर्यादित करण्यात आली. आई, बहिण, बायको व मुलगीएवढयापुरतीय सिमीत करण्यात आली. मनुस्मृती आणि अन्य धर्म - शास्त्राप्रमाणे स्त्रीलापरावलंबी करण्यात आले म्हणजे तिला पुरुषांवर अवलंबून राहावे लागले. त्यामुळे तिच्याहक्कांवर, व्यक्ती स्वातंत्र्यावर संकट आले. मनुस्मृती आणि धर्मशास्त्रांनी स्त्रीच्या वागण्यावरबंधने घातली, वेगवेगळया प्रकारचे नियम केले त्यावर नियंत्रण पुरुषांचे ठेवण्यात आले.सामाजिक सुरक्षिततेच्या नावाखाली तिच्यावर अनेक बंधने लादण्यात आली, ‘चूल आणि मूल’ हेस्त्रीचे कार्यक्षेत्र बनले. स्त्री ही उपभोग्य वस्तू समजली जावु लागली. या दुसऱ्या कालखंडातस्त्रीवर पुढीलप्रमाणे अनेक बंधने घालण्यात आली.

- हुंडापध्दती सुरु झाली.
- स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले.
- देवदासी ही अनिष्ठ प्रथा रुढ झाली.
- सती जाण्याची पध्दत प्रस्थापित झाली.
- विधवा स्त्रीयांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारण्यात आला.
- बहुपत्नीत्व प्रथा अस्तित्वात आली.
- स्त्रीयांचे सामाजिक स्थान व दर्जा खालावला.
- स्त्री दुर्बलतेचे प्रतिक बनली.

वरील प्रमाणे सर्वप्रकारची बंधने या कालखंड स्त्रीयांवर लादल्यामुळे लिंगभेद निर्माणहोऊन स्त्री -पुरुष असमानता समाजामध्ये निर्माण झाली. पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ असेसमजले जाऊ लागले व पितृस्ताक समाज निर्माण झाला. स्त्रीला हीन, दीन, लाचार समजलेगेल्यामुळे समाज व्यवस्था असंतुलित होऊन अध:पतित झाल्याचे दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - वैदिक कालखंडावर स्त्रीयांचे समाजातील स्थान स्पष्ट करा.

## २.४.३ सध्याचे स्त्रीयांचे समाजातील स्थान

आधुनिक समाजाने स्त्री -पुरुष समानता मान्य केली आहे. स्त्री व पुरुष यांच्यातभेदभाव करु नये. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळायला हवे. एक व्यक्ती म्हणून स्त्रीलाप्रतिष्ठा मिळाली पाहिजे. या सर्वांना विचार करुन भारतामध्ये राजा राममोहन रॉय यांच्यापासून तेमहात्मा गांधीपर्यंत अनेकांनी स्त्रीयांच्या प्रश्नांना वाचा फोडली. स्त्रीवर्गाच्या प्रश्नाकडे सर्वांचेलक्ष वेधून घेतले. महाराष्ट्रात महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडोकेशव कर्वे यांसारख्या समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात सततआवाज उठवला. स्त्रीयांना पुढील हक्क मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यांच्याप्रयत्नामुळे स्त्रीयांच्या समस्येसंबंधी जागृती निर्माण झाली. पुढील समस्ये संबधी वरील समाजसुधारकांनी विचार करुन त्यातून स्त्रीयांची सुटका करण्याच्या कसोसीने प्रयत्न केलेला दिसून येतो.

- केशवपन
- विधवा
- विवाहबंदी
- बाल विवाह
- सतीची प्रथा
- स्त्रीयांचे शिक्षण
- स्त्रीयांचे स्वातंत्र्य इत्यादी.

त्याचप्रमाणे राजा राममोहन रॉय यांनी सतीची प्रथा बंद करण्यासाठी संघटित चळवळ केली.त्यांच्या प्रयत्नांना यश झाले आणि १८२९ साली सतीची प्रथा बंद करण्याचा कायदा अमलातआला.

स्वांतत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने स्त्री - पुरुष मूलभूत हक्क दिले व दुष्ट प्रथांवरकायदयाने बंदी घातली. ती पुढील प्रमाणे.

munotes.in

पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना शिक्षणाच्या व रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करुन दिल्या.

- मताधिकारासारख्या महत्त्वाचा हक्क मिळाला.
- सती, हुंडा, कन्याविक्रय, बहुपत्नीत्व यासारख्या दुष्ट प्रथावर बंदी घालण्यात आली.
- स्त्रीयांना घटस्फोटाचा अधिकार देण्यात आला.
- मालमत्तेतही कायदेशीर वाटा देण्यात आला.
- मालमत्तेतही कायदेशीर वाटा देण्यात आला.
- स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये १/३ जागा राखून ठेवण्यात आल्या.
- वक्तीगत स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला.

या सर्व तरतूदीमुळे सर्व स्त्रीया शिक्षण घेऊन अर्थाजन करु लागल्या आहेतसार्वजनिक जीवनात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या उचलत आहेत. लोकशाहीच्या दृष्टीने ही अतिशयमहत्त्वाची बाब आहे.

अर्थात वरील तरतूदीमुळे स्त्रीयांचे सर्व प्रश्न सुटले नाहीत. हुंडाबळी, कुटुंबात होणाराछळ, मारहाण यासारख्या समस्या अनेक स्त्रीयांच्या वाट्याला येत आहेत. ज्या ठिकाणीस्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे उदा. केरळ, मिझोराम व गोवा या राज्यात स्त्रीयांचीपिळवणूक व अत्याचार यांचे प्रमाण कमी आहे.

भारतातील काही जाती - धर्मामध्ये पुरुषांना प्रत्येक बाबतीत प्राधान्य दिले जाते.उदा. शिक्षण, आहार, सामाजिक कार्यक्रम व काही धार्मिक प्रथा इत्यादी बाबीमध्ये पुरुषांनाप्राध्यान्य दिले जाते. व स्त्रीयांना गौण समजले जाते. फक्त गरीब कुटुंबामध्येच हे पाहावयासमिळत नाही. तर श्रीमंताच्याही घरी हीच परिस्थिती दिसून येते.

अनेक साक्षर कुटुंबामध्येही स्त्रीच्या गर्भाची गर्भजल परिक्षेद्वारा चाचणी करुन ती मुलगीअसेल तर गर्भपाताद्वारे भृणहत्या करण्यात येते. मुलीच्या लग्नाच्या वेळी हुंडा देता येणार नाही याविवंचणेतून नवजात मुलीची हत्या (Female Infenticide) केली जाते. ही प्रथा उत्तरभारतात मोठया प्रमाणात आहे. शहारामध्ये तर विविध प्रकारे स्त्रीयांची पिळवणूक केली जाते.स्वांतत्र्यानंतर आपण स्त्री - पुरुष समानता या दिशेने जाण्याचा निर्धार केला आहे.त्यासाठी ठोस पावलेही उचलली आहेत. त्याचे काही चांगले परिणाम ही आपल्याला दिसून येतआहेत. शिक्षण, अर्थार्जन, प्रशासन, राजकारण या सर्व क्षेत्रांत स्त्रीया आता हिरिरीने भाग घेऊलागल्या आहेत. परंतु याचबरोबर स्त्री - पुरुष समानतेचा खरा गर्थितार्थही लक्षात घेणेआवश्यक आहे. स्त्री - पुरुष समानता याचा अर्थ स्त्री सुध्दा पुरुषाप्रमाणे एक व्यक्ती आहे.तिला सुध्दा मन, भाव, भावना, आहे. त्यामुळे तीलाही एक मानव म्हणून गौरव मिळाला पाहिजे.याअर्थाने स्त्री - पुरुष समानतेचा अर्थ आज समाजात अस्तित्वात आल्यास वरील सर्व क्षेत्रांमध्येती खऱ्या अर्थाने यशस्वी होणार आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - भारतीय समाजातील स्त्रीयांचे काळातील स्थान स्पष्ट करा.

## २.५ स्त्रीयांवरील अत्याचार

### २.५.१ स्त्रीयांवरील अत्याचाराचा अर्थ

सन १९९३ मध्ये युनाईटेड नेशन्स् ने स्त्रीयांवरील अत्याचाराची व्याख्या पुढील प्रमाणेकेलेली आहे. “any act of gender- based violence that results in, or islikely to result in physical, psychological or sexual harm or sufferingto a woman, including threats of such acts, coercion or arbitrarydeprivations of liberty whether occurring in public or private life.”

थोडक्यात स्त्रीयांवरील अत्याचार अथवा हिंसाचाराची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते.स्त्रीयांच्या ईच्छेविरुध्द, मनाविरुध्द काही कृती करण्यास भाग पाडणे, त्यांची मुक्तसंमती नसतानाही भाग पाडणे, की जेणे करुन त्यांना शारीरिक ईजा होईल किंवा मानसिकधक्का बसेल त्या कृतीस अत्याचार किंवा हिंचासार असे म्हणता येईल. स्त्रीयांवरीलअत्याचाराचे वर्गीकरण पुढील तीन प्रकारात करता येते.

अ) कुटुंबाच्या अंतर्गत : कुटुंबामधून स्त्रीयांवर पुढील अत्याचार होतात.

- हुंड्यासाठी छळ.
- वाईट वागणूक (विशेषत : स्त्रीयांना)
- घरातील सभासदांकडून सतत निंदा - नालस्ती इत्यादी प्रकारचे बोलणे.
- संपत्तीतील हिस्सा देण्यास नकार
- उपासमार व मारहाण

ब) कायदयाने दंडणीय अत्याचार : कायदयाने दंडनीय स्वरुपाचे किंवा फौजदारी स्वरुपाचेअत्याचारामध्ये पुढील अत्याचारांचा समावेश होतो.

- विनयभंग आणि बलात्कार
- अपहरण आणि खून
- नववधूला जाळणे
- छळ करुन आत्महत्येस प्रवृत्त करणे.
- स्त्रीयांची विक्री किंवा लिलाव
- वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणे.

क) सामाजिक अत्याचार - स्त्रीयांवर सामाजिक स्वरुपाचे अत्याचार पुढील प्रमाणे होतात.

- तरुण विधवेला सती जाण्यास बळजबरीने सांगणे.
- कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ
- सार्वजनिक वाहतुक व इतर ठिकांणी लैंगिक टोमणे मारणे.
- स्त्रीयांविरुध्द कोर्टात खोटी साक्ष देणे.
- तरुण स्त्रीयांना डोळा मारणे व चावट चेष्टा -मस्करी करणे इत्यादी.

**अत्याचार करण्यास जबाबदार व्यक्ती -**

स्त्रीयांवर अत्याचार करण्यात तिच्याच कुटुंबातील सभासद पुढाकार घेतात व काहीअपरिचीतही त्यामध्ये असतात. एका सर्वे नुसार ६०%स्त्रीयांवरील अत्याचार तिच्या घरातीलव्यक्तीकडूनच केले जातात तर ४०%अत्याचार हे बाहेरील अपरिचित व्यक्तीकडून केलेजातात. घरातील व्यक्तींमध्ये पालक व त्यांचे नातेवाईक किंवा सासरचे लोक असू शकतातअनेकदा आपण वर्तमान पत्रात वाचतो की, बापाने स्वतःच्या मुलीवर बलात्कार करुन तिचा बळीघेतला. अनेकदा हुंडा किंवा बापाकडून पैसे आणण्यासाठी सासरच्या लोकांकडून नववधूचा छळकेला जातो. कुटुंबाबाहेरील व्यक्ती म्हणजे शेजारी किंवा इतर अपरिचीत व्यक्ती होय.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - अत्याचार किंवा हिंसाचाराचा अर्थ / व्याख्या सांगून अत्याचाराचे वर्गीकरण करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**२.५.२ भारतीय स्त्रीयांवरील अत्याचाराचे किंवा समस्येचे प्रकार**

भारतीय संविधनाने स्त्रीयांना मूलभूत हक्क दिले तसेच स्त्रीयांच्या सामाजिकसुरक्षेसाठी काही कायदेही करण्यात आले तरी सुध्दा भारतीय स्त्रीला विविध प्रकारच्याअत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. ह्या अत्याचाराचे किंवा समस्येचे प्रकार पुढील प्रमाणेआहेत.

**(१) कनिष्ठ दर्जा**- भारतीय स्त्रीला अजूनही समाजामध्ये दुय्यम स्थानच दिले जाते.स्त्रीयांचा कनिष्ठ दर्जा दर्शविणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

- साक्षर आणि श्रीमंत कुटुंबामध्येही त्रयस्थांसारखी वागणूक दिली जाते. अनेकदाकुपोषणही केले जाते.
- भारतातील काही भागात विशिष्ट जमातीत अजुनही सतीची प्रथा चालू आहे.
- मूलीची गर्भ असेल तर गर्भपात केला जातो.

- समाजातील स्त्रीच्या वागणूकीवर मर्यादा असतात.
- अनेक कुटुंबामध्ये किंवा काही ठराविक धर्मामध्ये स्त्रीला नोकरी करण्याची परवानगीनाही.

**(२) साक्षरता** - स्वातंत्र्यानंतर भारतातील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. १९५१ मध्येभारतातील साक्षरतेचे प्रमाण १८%होते तर २००१ मध्ये ते ६५%इतके झाले. पुरुषांच्यासाक्षरतेचे प्रमाण ७६%आहे तर स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी म्हणजेच ५४%आहे. भारतातील काही राज्यामध्ये स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय साक्षरतेच्या प्रमाणापेक्षाकमी आहे. स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मुलींच्यासुरक्षिततेचा अभाव हेच आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून मुलींच्या गळतीचेप्रमाणही जास्त आहे. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पालकांनाही नसते. त्यांना फक्त एवढेच समजतेकी मुलगी कितीही शिकली तरी तिला चूल आणि मूल हे चुकणार नाही. केरळ, गोवा व मिझोरामया राज्यांमध्ये स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

**(३) स्त्रीयाविरुध्द हिंसाचार** - स्त्रीयाविरुध्द मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होतो. घरातआणि घराबाहेरही स्त्रीयांची छळवणूक मोठ्या प्रमाणावर होते. पुढील घटनांवर हे समजण्यासमदत होते.

- हुंडा : हुंडा विरोधी कायदा १९६१ संमत करुनही भारतामध्ये काही जमातीमध्ये मोठ्याप्रमाणावर हुंडा घेतला जातो. हुंडा न दिल्याने अनेक नववधूंना सासरी त्रास होतअसल्याच्या तक्रारी पोलीस स्टेशनला नोंदविल्या जातात. काही ठिकाणी तर मुलींनाजाळण्याच्याही घटना घडतात. यातील अनेक हुंडाबळीच्या नोंदी भीतीमुळे व कायदयाचाससेमिरा चुकविण्यासाठी पोलीस स्टेशनला केल्याच जात नाहीत.

- बलात्कार व लैंगिक अत्याचार **:** शहारात या समस्येला स्त्रीयांना सातत्याने तोंड द्यावेलागते. दिवसेदिसव लैंगिक शोषण व बलात्काराच्या घटना वाढतच आहेत. प्रत्येक दोनतासाला आपल्या देशात एक बलात्कारीत घटनेची नोंद होते. लाजेमुळे किंवा शरमेनेकित्येक बलात्कारीत घटनेची नोंदी केल्या जात नाहीत. भारतात सर्वात जास्तबलात्काराच्या घटना मध्यप्रदेशात घडतात, तर शहरांमध्ये सर्वात जास्त बलात्कार दिल्लीतहोतात.

लैंगिक शोषण व बलात्कार ह्या घटना अनेकदा तिच्या सासरच्या घरातील पुरुषसभासदांकडूनही होतात. तरुण मुलींना शहारामध्ये अशा प्रकारच्या घटनांना रोज सामोरेजावे लागते.

**(४) बायकोला मारणे** काहीही अगदी किरकोळ कारणावरुन बायकोला मारणे ही भारतातीलसर्वसामान्य अशी बाब आहे. दुदैवाने अनेक बायकां हे स्वीकारतात. गरीब कुटुंबातच नव्हे तरश्रीमंत व साक्षर कुटुंबामध्येही असे प्रकार होत असतात. अगदी साक्षर असलेल्या स्त्रीयाही हेप्रकार निमूटपणे सहन करतात. बायकोला मारणे हा आपला मूलभूत हक्क आहे असेच पुरुषमानतात.

(५) **विधवांच्या समस्या** भारतीय समाजांमध्ये विधवांना अनेक समस्यांना तोंड दयावेलागते. कायदयाने जरी विधवांना पुर्न विवाहास परवानगी दिली असली तरी प्रत्यक्षात त्यांच्याशीविवाह करण्यास कोणीही तयार होत नाही. ज्याची बायको मरण पावली आहे अशा व्यक्तीहीविधवेशी लग्न करण्यास तयार होत नाहीत.

विशेष म्हणजे समाजामध्ये विधवांच्या वागण्यावर अनेक बंधने धर्माने घातलेली आहेत.काही जमातींमध्ये तर विधवांना कोणत्याही सामाजिक कार्यक्रमात सहभागीच होता येत नाही.त्याचप्रमाणे ठराविक रंगाचेच कपडे किंवा रितीरीवाजाप्रमाणे कपडे परिधान करावी लागतात.

(६) **कामाच्या ठिकाणच्या समस्या** नोकरी करणाऱ्या महिलांच्या बाबतीत ही समस्याआहे. उच्च शिक्षणांमुळे स्त्रीयांनी संघटीत क्षेत्रात नोकरीसाठी प्रवेश केला. शहरामध्ये वनिमशहरामध्ये स्त्रीयांच्या नोकरीचे प्रमाण जास्त आहे. स्त्री कामगारांना कामाच्या ठिकाणी पुढीलसमस्यांना तोंड द्यावे लागते.

- **लैंगिक शोषण** प्रत्येक संघटनेत संस्थेत कामाच्या ठिकाणी स्त्री कामगाराचे, मोठ्याप्रमाणावर लैंगिक शोषण होत आहे. अगदी शैक्षणिक संस्थाही त्यास अपवाद नाहीत. याविरुध्द तक्रार नोंदविल्यास न्याय मिळू शकतो. परंतु प्रसार माध्यमाद्वारे नको ती प्रसिध्दी,कायद्याची औपचारिकता पूर्ण करणे आणि कागदोपत्री पुरावे गोळा करणे या कटकटीपासूनसुटका म्हणून शक्यतो तक्रार केली जात नाही.

- **वेतनातील विषमता** विशेषत: असंघटीत क्षेत्रामध्ये स्त्रीयांना पुरुषांच्या तुलनेत कमीवेतन दिले जाते. भारतीय संविधानातील कलम -३९ प्रमाणे समान कामासाठी स्त्री -पुरुषांना समान वेतन देण्यात यावे अशी तरतूद असूनही अनेक ठिकाणी याचीअंमलबजावणी होत नाही आणि स्त्रीयांचीही कोणत्याही प्रकारची तक्रार नसते. अनेकदाभारतीय संविधानातील हा कायदाच अनेक स्त्रीयांना माहित नसतो.

- **पदोन्नती** अनेकदा स्त्रीयांना सर्वोच्च पदापर्यंत बढती दिली जात नाही. ठराविकपातळीपर्यंतच स्त्रीयांनी काम करावे अशी पुरुषांची अपेक्षा असते. बॉस म्हणून स्त्री असणे हेपुरुष मान्यच करीत नाहीत. त्यामुळे स्त्रीयांना पदोन्नतीच्या मर्यादा असतात.

- **मातृत्त्व** अनेक ठिकाणी स्त्रीयांना बाळंतपणासाठी रजा द्यावी लागते म्हणून कमी प्राधान्यदिले जाते. काही ठिकाणी तरी स्त्रीयांना घेतलेच जात नाही. त्याचप्रमाणे घरची सर्वजबाबदारी सांभाळून स्त्रीयांना नोकरी करावी लागते. यामुळे कामावर उशीरा येणे, अनेकदाकामावर गैरहजर राहणे इत्यादी कारणांमुळे स्त्रीयांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

- **विभक्त कुटुंबातील समस्या** विभक्त कुटुंब म्हणजे नवरा □बायको व मुले. सध्याविभक्त कुटुंब पध्दतीच स्त्रीयांना आवडतात. परंतु विभक्त कुटुंब पध्दतीमध्ये स्त्रीयांनाजास्त समस्या उद्‌भवतात घटस्फोटाचे सर्वात जास्त प्रमाण विभक्त कुटुंब पध्दती

munotes.in

मध्येचदिसून येते. मुल झालेल्या स्त्रीयांनी घटस्फोट दिल्यास तिला विविध समस्यांचा सामनाकरावा लागतो.

- **मर्यादित राजकीय सहभाग** - स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग अगदी नगण्य आहे. केंद्रव राज्य दोन्ही पातळीवर विचार केल्यास हीच परिस्थिती दिसून येते. यामुळे विधान सभेतकिंवा लोकसभेत स्त्रीयांच्या समस्या ज्या काही थोडयाफार स्त्रीया आहेत त्या मांडतचनाहीत आणि पुरुष नेतृत्व योग्य प्रमाणात त्या समस्यांना न्याय देत नाही.

राजकीय पक्ष स्त्रीयांना उमेदवारी देण्यास उत्सुक नसतात. ज्या काही स्त्रीयांना उमेदवारीमिळते त्यातील थोड्याच निवडून येतात. बऱ्याच ठिकाणी ग्रामीण भागामध्ये निवडणुकीमध्येकाही स्त्रीया निवडून आल्या तरी त्या फक्त नामधारी असतात, सर्व कारभार अप्रत्यक्षरीतीने पुरुषच करत असतात. त्यामुळे स्त्रीला स्वतंत्रपणे, स्वतःच्या विचारांनी कारभारकरता येत नाही.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न – भारतीय स्त्रीयांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे (हिसांचाराचे) किंवा समस्येचे वेगवेगळे प्रकार सांगा.

### २.५.३ स्त्रीयांवरील अत्याचाराची कारणे

स्त्रीयांवर होणारे अत्यांचार हे पुढील कारणांसाठी होत असतात.

- **पैशाशी संबंधीत** - हुंड्यासाठी तसेच इतर अनेक कारणांसाठी पैसे आणावे म्हणून नवराकिंवा सासरचे लोक नववधूवर अत्याचार करीत असतात. काही ठिकाणी नवरा दारुडाकिंवा जुगारी असेल तर बायकोकडे सतत पैशाची मागणी करतात. बायकोच्या कमाईवरउदरनिर्वाह करणारे अनेक लोक आहेत.

- **व्यक्तीमत्वसंबधीत** - अनेकदा व्यक्तीमत्वावरुन स्वभावाची चुकीची ओळख केली जातेआणि स्त्रीचा छळ सुरु होतो. संशयी स्वभावाचा नवरा बायकोच्या लहान - सहानहालचालीवरुन तिच्यावर संशय घेतो. अशावेळी संबधीत स्त्रीचा छळ केला जातो.

- **तणावाची परिस्थिती** - घरातील तणावग्रस्त वातावरणाने स्त्रीला अनेक समस्यांना तोंड द्यावेलागते. घरातील मुले व्यवस्थित वागत नसतील तर वडील आईलाच संपूर्ण दोष देतात.वडिलांच्यावर तणाव येतो त्यामुळे ते त्यांचा राग बायकोवर काढतात.

munotes.in

- **मद्यपान** - दारुची किंवा अंमली पदार्थाची नशा करणाऱ्या व्यक्ती बायकोचा छळ मोठयाप्रमाणावर करतात. नशेमध्ये या व्यक्ती बायकोच्या शारीरिक व मानसिक छळ करीतअसतात.

- **पुरुषी अहंकार** - प्रत्येक कुटुंबामध्ये नेहमी पुरुषांचेच वर्चस्व असते. त्यामुळे नवऱ्याची चूकदाखवण्याची व ती सुधारण्याचा प्रयत्न बायकोने केल्यास पुरुषी अहंकार दुखावला जातो.अशावेळी संबधीत स्त्रीला विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

- **प्रसार माध्यमांचा अतिरेक** - विविध प्रसारमाध्यमाद्वारे दाखविले जाणारे कार्यक्रम, फिल्म वमालिका यामध्ये स्त्रीयांवरील अत्याचार वारंवार दाखवले जातात. याचाही परिणामस्त्रीयांवरील अत्याचार वाढवण्यात होतो.

- **सूडाची भावना** - सूडाच्या भावनेने पेटून उठलेल्या लोकांकडून स्त्रीयांवर मोठ्या प्रमाणावरअत्याचार होतात. उदा. एकाद्या निरापराध पुरुषाला एखादया स्त्रीने बलात्कारासारख्यागुन्ह्यात अडकविल्यास संबधीत व्यक्ती सूडाने पेटून उठते आणि मग अशा व्यक्तीकडूनमोठ्या प्रमाणावर स्त्रीयांवर अत्याचार होतात.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराची कारणे सविस्तर सांगा.

**२.५.४ अत्याचाराचे स्त्रीवर होणारे परिणाम**

अत्याचाराचे स्वरुप कसे आहे यावरुन स्त्रीवर होणाऱ्या परिणामांचे स्वरुप ठरते.अत्याचारामुळे स्त्रीवर खालील प्रमाणे परिणाम होतात.

- **मानसिक परिणाम** - अत्याचार मोठ्या प्रमाणावर होत असेल तर निश्चितपणेच स्त्रीच्यामानसिक तेवर त्याचा परिणाम होतो. अपहरण व बलात्कार सारख्या घटना असतील तरत्याचा स्त्रीच्या मनावर खोल परिणाम होतो. अनेकदा स्त्री अशा धक्यातून स्वतःला सावरुशकत नाही. अशा घटनांमुळे स्त्री आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होतात.

- **शारीरिक परिणाम** -सासरच्या लोकांकडून मारहाण किंवा शारीरिक ईजा पोहोचल अशास्वरुपाच्या घटना घडल्यास त्याचा परिणाम स्त्रीच्या शरीरावर होतो. अनेकदा अशाप्रकारच्या मार-झोडीमुळे स्त्रीला अपंगत्व येण्याचीही शक्यता असते.

munotes.in

- **आरोग्यावर परिणाम** - स्त्री लग्नाअगोदर तिच्या घरच्यांनी किंवा लग्नानंतर तिच्यासासरच्या लोकांनी योग्य आहार दिला नसेल किंवा तिच्या आजारपणात योग्य दवाखानाकेला नसेल आणि या घटना वारंवार घडत असतील तर त्याचा स्त्रीच्या आरोग्यावर वाईटपरिणाम होतो.

- **सामाजिक परिणाम** - बलात्कारासारखी घटना घडली असेल तर स्त्रीच्या सामाजिकजीवनावर त्याच्या मोठा परिणाम होतो. अशा घटनांची समाजातील लोकांकडून नको तीबोलणी व टोमणे ऐकून घ्यावे लागतात. समाज अशा व्यक्तीना नीटपणे जगूच देत नाही.

- **कुटुंबातील सभासदावर होणारा परिणाम** - नवरा किंवा सासरच्या इतर सभासदांकडूनस्त्रीचा छळ होत असेल तर त्याचा परिणाम तिच्या मुलांवरही होतो. आईवरील अत्याचार,छळ या विचारांमुळे मुलांचे तारूण्य उदासिनतेत जाते. अनेकदा मुले प्रौढ झाल्यानंतरसमाजात त्याच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो.

**आपली प्रगती तपासा**.

प्रश्न - अत्याचाराचे स्त्रीवर होणारे परिणाम स्पष्ट करा.

___

___

___

___

___

## २.६ स्त्री भृणहत्या

गर्भजल परिक्षेद्वारा जन्माला येणाऱ्या संततीचे लिंग तपासले जाते आणि मुलगी असेलतर साक्षर कुटुंबात गर्भपाताद्वारे भृणहत्या मोठया प्रमाणात केल्या जातात.अतिशय धक्कादायक बातमी २२ सप्टेंबर १९९९ च्या टाईम्स ऑफ इंडिया यावृत्तपत्रात आली होती. ती म्हणजे 'राजस्थानमधील देवरा गावात ११० वर्षात प्रथमच एकामुलीचे लग्न झाले.' म्हणजेच गेल्या १०० वर्षात या गावात एकही मुलगी जन्माला आली नाही.किंबहुना स्त्रीभृणहत्येद्वारा मुलगी जन्माला येऊ दिली नाही.

### २.६.१ स्त्री- भृणहत्त्येची कारणे

- पितृसत्ताक समाज रचनेमुळे मुलाला प्राधान्य दिले जाते .- पितृसत्ताक समाज रचेनमुळेमुलीपेक्षा मुलाला श्रेष्ठ समजले जाते. पितृसत्ताक सत्तेमध्ये कुटुंबप्रमुख पुरुष असल्यानेमुलीपेक्षा मुलांची अपेक्षा केली जाते. याचबरोबर समाजामध्ये निरनिराळया प्रकारच्या रुढीपरंपरा आहेत उदा. श्राध्दाची संकल्पना, मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे श्राध्द

munotes.in

घरातील मोठ्यामुलानेच घालायचे असते. या विचारामुळे मुलीपेक्षा मुलालाच महत्त्व दिले जात.

- सामाजिक गरज आणि आर्थिक व्यवहार हे मुलांच्या संदर्भात संबंधित असल्याचे समजलेजाते.- सामाजिक-आर्थिक विकास आणि स्त्री- भृणहत्या यांचा संबंध व्यस्त असल्याचेदिसून येते. दि नॅशनल फॅमिली ॲण्ड हेल्थ सर्वे यांनी १९९८ -९९ मध्ये अहवालामध्येनमूद केले आहे की मुलगा असावा याची अपेक्षा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये जास्तआहे. प्रत्येक कुटुंबामध्ये कमीत कमी एक तरी मुलगा असावा. ही सामाजिक गरज समजलीजाते. तसेच समाजामध्ये जो मुलगा कमावतो, तेच आपल्याला उपयोगी पडणार आहे.असाही विचार केला जातो.

- मुलाला वंशाचा दिवा समजला जातो. - समाजामध्ये मुलगा असेल तरच आपला वंशटिकेल, त्यामध्ये सातत्य राहील. असा विचार केला जातो. म्हणून प्रत्येक कुटुंबात मुलगाअसावा ह्या विचारानेही स्त्रीभृण हत्या होते.

- इतर कारणे - भारतामध्ये मुलाला मालमत्ता (assats) समजले जाते तर मुलीला "देणे"(Liability) समजले जाते. आणि महत्त्वाचे कारण म्हणजे मुलीला विवाहात हुंडा द्यावालागतो. काही राज्यामध्ये तर मूलीला जन्मानंतरही मारले जाते यामुळे भारतातील काहीराज्यांत लिंग गुणोत्तरात स्त्रीयांची संख्या मोठया प्रमाणात घटत आहे. राजस्थान, बिहार,पंजाब आणि हरियाना इत्यादी राज्यांमध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण अतिशयकमी होत आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - स्त्री -भृण हत्येची कारणे सांगा.

## २.७ लिंग गुणोत्तर प्रमाण

### २.७.१ सातत्याने घटत जाणारे लिंग गुणोत्तर

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. भारतातील काही ठराविक जाती वगळता सर्वजातींमध्ये कुटुंबाचा प्रमुख हा पुरुषच असतो. भारताच्या उत्तर पूर्व भागातील काहीआदिवासीमध्ये कुटुंबप्रमुख म्हणून वयोवृध्द स्त्रीचा विचार केला जातो. परंतु तुलनात्मकदृष्ट्याकुटुंब प्रमुख म्हणून पुरुषांचाच जास्त विचार केला जातो भारतातील सतत घटत जाणाऱ्या लिंगगुणोत्तराचे प्रमुख कारण म्हणजे पुरुष प्रधान संस्कृती आहे.

**भारतातील लिंग गुणोत्तर**

| वर्षे | दर हजारी पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण |
|---|---|
| १९०१ | ९७२ |
| १९११ | ९६४ |
| १९२१ | ९५५ |
| १९३१ | ९५० |
| १९४१ | ९४५ |
| १९५१ | ९४६ |
| १९६१ | ९४१ |
| १९७१ | ९३० |
| १९८१ | ९३४ |
| १९९१ | ९२७ |
| २००१ | ९३३ |
| २०११ | ९४० |

**Source : Census Report**

वरील तक्त्यावरुन आपल्या लक्षात येते की १९०१ मध्ये दर हजारी पुरुषामागे ९७२स्त्रीया होत्या तर २००१ च्या जनगणनेप्रमाणे हे प्रमाण ९३३ एवढे खाली आलेले आहे. वरीलआकडेवारी वरुन लिंग गुणोत्तर सतत घटत नाही. तर ते कमी जास्त होत आहे. भारतात फक्तकेरळ राज्य असे आहे की तिथे सर्वात जास्त स्त्रीयांचे प्रमाण आहे. तर हरियाना हा प्रदेश असाकी तिथे सर्वात कमी स्त्रीयांचे प्रमाण आहे.

भारतातील काही राज्यांचे लिंग गुणोत्तर प्रामण पुढील तक्यात दाखविले आहे. (दर - हजारी पुरुषामध्ये स्त्रीयाचे प्रमाण )

| राज्य | लिंग गुणोत्तर प्रमाण |
|---|---|
| केरळ | १०५८ |
| तामीळनाडू | ९८७ |
| आंध्रप्रदेश | ९७८ |
| उत्तर प्रदेश | ८९८ |
| हरयाना | ७६१ |

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - सातत्याने घटत जाणारे लिंग गुणोत्तर स्पष्ट करा.

munotes.in

### २.७.२ लिंग गुणोत्तर कमी असण्याची कारणे

भारतामध्ये लिंग गुणोत्तर कमी असण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**(१) मुलाला प्राधान्य** भारतातील सर्व धर्म आणि संस्कृतीमध्ये मुलगा जन्माला येणेभाग्याचे समजले जाते. मुलीचा जन्म अनिष्ट घटना समजली जाते. अनेक कुटुंबामध्येमुलगाच व्हावा यासाठी प्रार्थना, पूजा करतात यामध्ये नवरा, बायको व सासरचेसर्वजण असतात. प्रामुख्याने स्त्रीला सुध्दा मुलगा व्हावे असेच वाटत असते मुलगाझाला तर पेढे वाटले जातात. परिस्थिती नसूनही बारसे मोठया धामधूमीत केले जाते.
परंतु मुलगी झाल्यास दु:ख व्यक्त केले जाते.

**(२) गर्भमत्ताद्वारे भृणहत्या** मुलगा हा वारसा असतो. म्हातारपणी आधार असतो.मुलगी दुसऱ्याच्या घरी जाणार. जाताना हुंडाच्या स्वरुपामध्ये संपत्ती घेऊन जाणार. याविचारामुळे मुलगी असेल तर भृणहत्या केली जाते.

**(३) मुलींच्या मृत्यूचे प्रमाण** मुलीचे संगोपन व्यवस्थित केले जात नाही. तिच्याआजाराकडे दुर्लक्ष केले जाते. या कारणांमुळे भारतात लहान मुलींच्या मृत्यूचे प्रमाणजास्त आहे. सध्या भारतामध्ये दर हजारी जन्मासारखे मुलींच्या मृत्यूचे प्रमाण ६०आहे. तर भारतातील दर हजारी जन्मामध्ये एकूण बालकांच्या मृत्यूचे प्रमाण ४८ इतकेआहे.

**(४) मातृत्वपणात देखभाल** - स्त्रीयांना समाजात दुय्यम स्थान असल्याने त्यांच्याकडेसमाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन पुरुषांसारखा नसतो. त्यामुळे अनेकदा स्त्रीया गर्भारअसतांना त्यांच्या आहाराकडे लक्ष दिले जात नाही. गरीब कुटुंबामध्ये ही समस्यामोठ्या प्रमाणांवर उद्‌भवते. त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढत जाते आणि स्त्रीच्याहीआरोग्याला धोका निर्माण होतो.

**(५) द्रारिद्रय** गरीब कुटुंबामध्ये मुलाला अतिशय महत्त्वाचे स्थान असते.सर्व संपत्तीचावारस आणि म्हातारपणांतील आधार म्हणून मुलाकडे पाहिले जाते. मुलगी झाली तरतिच्या आहाराकडे व आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे लहान मुलींच्या मृत्यूचेप्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे.

**(६) हुंडा पध्दती** मुलगी मोठी झाल्यानंतर लग्नात तिला हुंडा द्यावा लागेल. भारतातीलग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर हुंडा दिला जातो व घेतला जातो. भारताच्या काहीभागात गरीब कुटुंबामध्ये मुलगी झाली की लगेच तिला अजूनही मारले जाते. हुंडापध्दतीचे खूप मोठे परिणाम स्त्री - पुरुष गुणोत्तरावर होतात.

**(७) लहान कुटुंब** विशेषत : शहरी भागामध्ये लहान कुटुंब ही फॅशनच झाली आहे.अनेक सुशिक्षित कुटुंबामध्ये प्रथम मुलगा झाला तर दुसरे मुल त्यांना नकोच असतेकारण ‘छोटे कुटुंब सुखी कुटुंब’ ही संकल्पना सर्वांना पटत चालली आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - लिंग -गुणोत्तर प्रमाण कमी असण्याचे कारणे सविस्तर स्पष्ट करा.

## २.८ स्त्रीया आणि प्रसारमाध्यमे

समाज दर्शन मोठ्या प्रमाणावर घडवून आणणाऱ्या कोणत्याही साधनास प्रसार माध्यमअसे म्हणतात. टी.व्ही. रेडिओ, वर्तमानपत्र, मासिक, सिनेमा व आपल्या आजूबाजलाझळकणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील जाहिराती इत्यादीचा समावेश प्रसार माध्यमामध्ये होतो.प्रसारमाध्यमे समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे काम करतात. त्याचप्रमाणे शिक्षण, सामाजिकहक्क इत्यादीची जाणीव समाजामध्ये प्रसार माध्यमे करुन देतात. स्त्रीया संबधीत विषय, यामध्येस्त्रीयांवरी अन्याय व अत्याचार याविषयी समाज जागृती करणे हे सुध्दा प्रसारमाध्यमांचे कामआहे. स्त्रीयाविषयी प्रसारमाध्यमे सकारात्मक भूमिका बजावू शकतात, त्याच प्रमाणे नकारात्मकही भूमिका बजावू शकतात.

### २.८.१ प्रसारमाध्यमांची स्त्रीयाविषयक सकारात्मक भूमिका

**(अ) स्त्रीयांच्या समस्यांना प्राधान्य देणे** भारतातील स्त्रीयांना येणाऱ्या समस्या दूरदर्शनआणि वर्तमानपत्रे विविध कार्यक्रमाद्वारे प्रसारीत करीत आहेत. स्त्रीयांवर होणारे अत्याचार यांनाविविध कार्यक्रमाद्वारे प्रसारीत केले जाते. यामुळे स्त्रीयांच्या समस्याविषयी पोलीस, सरकार, वन्यायदान संस्था लक्ष केंद्रीत करतात. उदा. एखादया बलात्काराच्या घटनेत संबधीत पुरुषालागुन्हाच्या प्रमाणापेक्षा कमी शिक्षा दिली आणि प्रसारमाध्यमांनी हा विषय जनतेसमोर आणला तरनिश्चितच त्यास योग्य न्याय मिळेल.

स्त्रीयांवर अत्याचार करणाऱ्या अनेक गुन्हेगारांना पोलीस दूर्लक्षीत करतात. गुन्हेगारश्रीमंत असेल किंवा राजकीय पार्श्वभूमी असलेला असेल तर पोलीस अशा गुन्हेगारास शिक्षाकरण्यास धजावत नाहीत परंतु प्रसारमाध्यमांनी हा विषय प्रखरतेने समाजासमोर आणल्यासत्यांना योग्य कृती करावीच लागेल. थोडक्यात समाजासमोर सत्य आणण्याचे कार्य अनेक प्रसारमाध्यमे प्रामाणिकपणे करत आहेत.

**(ब) प्रसारमाध्यमांनी स्त्रीयांना पाठींबा देणे** भारतातील स्त्रीयांना येणाऱ्या अनेकसमस्या, त्यांच्यावर होणारे अत्याचार, त्यांचा होणारा छळ इत्यादीसाठी प्रसारमाध्यमांनी स्त्रीयांनापाठिंबा दिला तर स्त्रीयांच्या समाजातील स्थानात नक्कीच वाढ होईलच. प्रसारमाध्यमांनीस्त्रीयांमध्ये जागृती करण्यासाठी स्त्रीयांचे अधिकार व हक्क सर्व स्त्रीयापर्यंत पोहचविण्याचे कार्यकरत

आहेत. स्त्रीचे समाजातील स्थान, आईचे महत्त्व इत्यादीवर लक्ष ठेवून १४ मे हा आईदिवस म्हणून पाळण्यात येतो.

**(क) स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्यासाठी प्रयत्न** प्रसारमाध्यमे स्त्रीयांचेसमाजातील स्थान उच्च करण्याचे काम करु शकतात आणि करीतही आहेत. इंदिरा गांधी(राजकारण), मदर रेरेसा (सामाजिक कार्य), किरण बेदी ( पोलीस खाते), किरण मझूमदार(उद्योगपती) पी.टी. उषा (क्रिडा) इत्यादी स्त्रीयांना प्रसार माध्यमांनी समाजासमोर त्यांच्याकर्तत्वासह आणले पाहिजे. त्यामुळे तरुणींच्या मनामध्ये नवीन उमेद निर्माण होईल, करिअरच्यात्यांच्या अपेक्षा रुंदावतील त्याचप्रमाणे त्या कोणत्याही प्रकारचे धाडस करण्यास प्रवृत्त होतीलया धाडसी स्त्रीयांच्या कर्तृत्वाची जाणीव झाल्याने तरुण मुलींचे पालकही त्यांना करिअरसाठीमदत करतील त्यांना विविध क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी प्रवृत्त करतील.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - प्रसारमाध्यमांची स्त्रीयाविषयी सकारात्मक भूमिका स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**२.८.२ प्रसार माध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका**

**(अ) स्त्रीयांचे विकृत चित्रन** स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे असा सार्वतिक समज निर्माणकरण्यास प्रसार माध्यमे आणि त्यातून केले जाणारे स्त्रीयांचे विकृत चित्रण जबाबदार आहे.जाहिरातीमध्ये स्त्रीयांचे भडक व उत्तेजक प्रदर्शन करण्यात येते. चलचित्रांमध्ये अर्धनग्नताआणि कामूक दृश्यांची रेलचेल असते. अशा विकृत चित्रणांमुळे काम □भावना चाळवते. आणित्यातून स्त्रीयांचा विनयभंग आणि बलात्काराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचेदिसून येते. या सर्वांमध्ये प्रसार माध्यमे तर जबाबदार आहेतच. परंतु अनेक स्त्रीया मॉडेलप्रसिध्दीसाठी या सर्वांसाठी तयार होतात.

**(ब) स्त्रीयांवर अत्याचार होणाऱ्या कार्यक्रमांचे प्रसारण** अनेक दूरदर्शन मालिंकामध्येआणि विविध कार्यक्रमामध्ये स्त्रीयांवरील अत्याचार दाखवले जातात, बलात्काराच्या घटनावारंवार दाखवल्या जातात. त्यामुळे पुरुषांना आयताच चर्चेला विषय मिळतो कार्यक्रमांमध्येदाखविल्याप्रमाणे वाईट कृत्य करण्याचे तरुणांच्या मनामध्ये येते. काही चित्रपटांमध्ये तर अगदीअश्लील चित्रण दाखवले जाते. दूरदर्शनवरील अनेक जाहिराती कुटुंबातील सदस्यांनी एकत्रबसून पाहण्यास लाज वाटते अशाच असतात. दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांमध्ये विवाह बाहयसंबधाचे उदात्तीकरण आणि अवास्तव चित्रण प्रसारित करण्यात येते.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - प्रसार माध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका स्पष्ट करा.

## २.९ भारतांतील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी उपाय

स्त्रीयांच्या समस्या व्यवस्थिपणे कमी करण्याचा प्रयत्न केल्यास भारतीय समाजाच्याविकासात स्त्रीया महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात भारतीय स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठीपुढीलप्रमाणे उपाय -योजना करता येतील.

**(१) स्त्रीयांना शिक्षण** सध्या भारत सरकारने स्त्रीयांना सक्तीचे शिक्षण केले आहे.इयत्ता बारावी पर्यंत सर्व मूलींना मोफत शिक्षण देण्याचे भारत सरकारने ठरविलेआहे.याच्याही पुढे जाऊन महाराष्ट्र शासनाने सर्व मुलींना पदवी पर्यंतचे शिक्षण मोफतदेण्याचे ठरविले आहे. 'शिकलेली आई घरास पुढे नेई' हे प्रत्यक्षात आणण्यासाठी स्त्रीशिक्षण १००%पूर्ण झाले पाहिजे.

**२) समाज जागृती** स्त्रीयांच्या सकारात्मक बाजू समाजासमोर आणणे अतिशयमहत्त्वाचे आहे. समाजाच्या मनात असणाऱ्या पारंपारिक रुढी व परंपरा काढूनटाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर समाज जागृती आवश्यक आहे. अशासकीय संघटनासरकारी संघटना व काही खाजगी संघटनांनीही पुढाकार घेऊन हुंडा प्रतिबंध, स्त्री -शिक्षण, विधवा पुनर्विवाह व बाल - स्त्री विवाह इ. विषयी समाज जागृती केल्यासस्त्रीयांच्या सामाजिक व आर्थिक दोन्ही समस्या कमी होण्यास निश्चितच मदत होणारआहे.

**(३) कायदेशीर प्रक्रियेचे सुलभीकरण** स्त्रीयांसाठी शासनाने अनेक कायदे केलेआहेत. भारतीय संविधानाने विविध तरतूदी केल्या आहेत. परंतु अत्याचारीत स्त्रीलाया कायदयाने न्याय मिळवण्यासाठी अनेक जाचक प्रक्रियेला सामोरे जावे लागते हीचप्रक्रिया जर सुलभ केली. तर प्रत्येक स्त्री कायद्याचा आधार घेईल अन्यथा अत्याचारहोऊनही स्त्रीया कायद्याचा आधार घेणार नाहीत.

**(४) पोलीस खात्याची भूमिका** पोलीस विभागाने जर स्त्रीयांना सहानुभूतीदाखविल्यास त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न केल्यास अत्याचारकरणाऱ्यांची अत्याचार करण्याची हिम्मतच होणार नाही. अत्याचार करणारे श्रीमंतअसो की राजकारणी असो याचा विचार न करता पोलीस खाते वाजल्यास स्त्रीयांवरीलहोणाऱ्या अत्याचाराची तीव्रता कमी होईल.

**(५) कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी** स्त्रीयांवरील अत्याचारासंबंधी करण्यातआलेले कायदे कागदोपत्री अनेक आहेत. राज्य घटनेतही अनेक तरतूदी करण्यातआल्या आहेत. परंतु या सर्व तरतूदी केवळ कागदावरच राहतात. प्रत्यक्ष अंमलबजावणीहोत नाही. प्रत्यक्षात संबधीत कायदयांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यासभारतीय स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

**(६) धार्मिक नेतृत्वाचा पाठिंबा** स्त्रीयांचे समाजातील स्थान सुधारण्यात विविधधर्माच्या नेत्यांचे सहकार्य मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर फायदा होईल. सर्व जाती -धर्मांचे नेते ज्यांचा संबंधीत समाजावर किंवा धर्मावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव आहे.भारतातील सर्व धर्मातील लोक त्यांच्या धर्मातील नेतृत्वावर पूर्णविश्वास व्यक्तकरतात. म्हणून या धार्मिक नेत्यांनी ठरविल्यास स्त्रीयांवरील अत्याचाराची तीव्रताअगदी कमी होईल.

**(७) कामाच्या ठिकाणी सकारात्मक दृष्टीकोन** स्त्रीया ज्या ठिकाणी नोकरी करतात.त्या कामाच्या ठिकाणी मालकाने व सर्व सहकार्यांनी स्त्रीयांविषयी सकारात्मकदृष्टिकोन ठेवला व स्त्री कर्मचाऱ्यास योग्य वागणूक देण्याचे ठरविल्यास स्त्री अत्याचारकमी होतील.

**(८) अशासकीय संघटनांची भूमिका** स्त्रीयांचे समाजातील स्थान बळकट करण्याचीअशासकीय संघटनाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. या संघटना स्त्रीयांच्याविविध समस्या समाजामध्ये पोहचवतात व स्त्रीयांना पाठिंबा देण्याचे कामही करतात.

**(९) संसदेत प्रभावी स्त्री नेतृत्व** स्त्रीयांच्या समस्या त्यांच्यावर होणारे अन्याय त्यांच्याहोणारा छळ इत्यादी प्रभावीपणे संसदेत मांडण्यासाठी प्रभावी स्त्री नेतृत्वाची गरज आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न -भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठीचे उपयांची सविस्तर चर्चा करा.

## २.१० सारांश

असमानतेच्या नकारात्मक दृष्टिकोनांमुळे लिंगभेद, वर्णभेद, वंशभेद, प्रांतभेद, भाषाभेद, जातीभेद, अशा निरनिराळया प्रकारच्या भिन्नता समाजामध्ये निर्माण होतात. हे सर्व भेद समानतेच्या अभावामुळे म्हणजेच असमानतेमुळे समाजात निर्माण होतात. ही सर्व प्रकारची भिन्नता समाजातून समूळ नष्ट होण्यासाठी समानता समाजामध्ये येणे गरजेचे आहे. या सर्व प्रकारच्या भिन्नता मानवी समाजामध्ये संबंधाच्या समस्येमुळे निर्माण होतात. त्यामुळे मानवी

जीवनांमध्ये संबंधाची समस्या प्रथम सुटणे. त्यावरील उपायाचा शोध घेणे ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. संबंधाची समस्या सोडवण्यासाठी मानवा - मानवांमध्ये एकाच शक्तीचा वास असल्याने दैवी भ्रातृभावाचा संबंध प्रस्थापित होणं, गरजेचे आहे.

स्त्री - पुरुष समानता आणण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी आणि प्रबोधनकारांनी प्रयत्न केले आजच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक युगामध्ये स्त्री ही पुरुषाच्या बरोबरी सर्व क्षेत्रात हिरीरीने भाग घेत आहेत. अनेक क्षेत्रामध्ये स्त्री ही यशस्वी कामगिरी करीत असल्याने ती अनेक प्रकारच्या महत्त्वाची जबाबदाऱ्या स्त्रीया उचलत आहेत. परंतु सद्यपरीस्थितीमध्ये स्त्री -पुरुष समानता म्हणजे जेजे पुरुष करतो, ते ते सर्व स्त्री करु शकते, या मर्यादित अर्थाने न घेता, स्त्री -पुरुष समानतामध्ये स्त्री ही सुध्दा एक व्यक्ती आहे, म्हणून एक मानव या नात्याने स्त्री -पुरुष समानता अपेक्षित आहे. आजच्या स्त्रीला मानव म्हणून गौरव मिळाल्यास स्त्री आणि पुरुषांमध्ये कोणत्याही प्रकारचे भेद राहणार नाहीत. पुरुष व स्त्रीयांमध्ये एकमेकांबद्दल द्वेषाचे व तिरस्काराचे संबंध न राहता आत्मीयतेचे संबंध निर्माण होतील व समाज खऱ्या अर्थाने प्रगती पथावर वाटचाल करेल.

मानवी समाज हा पुरुष आणि स्त्री या दोन्ही पासून निर्माण झालेले असतो. शमाज प्रगतीशील व विकसित असण्यासाठी पुरुष आणि स्त्री विकसित असण्याची गरज आहे. यासाठी स्त्री -पुरुष समानता समाजात असावी लागते. ही स्त्री -पुरुष समानता समाजात असावी लागते. ही स्त्री -पुरुष समानता एक मानव म्हणून असावी वैदिक काळामध्ये अशा प्रकारची समानता होती. परंतु वैदिक काळानंतर स्त्री -पुरुष असमानता निर्माण झाली. पितृसत्ताक समाजाची निर्मिती झाली. त्यामुळे स्त्री एक भोग्यवस्तू मानली जाऊ लागली यांतूनच स्त्रीयांवर अत्याचार होऊ लागला. हा अत्याचार कनिष्ठ दर्जा, हुंडा, बलात्कार व लैंगिक अत्याचार, बायकोला मारणे, विधवांच्या समस्या, भृणहत्या, लैंगिक शोषण, वेतनातील विषमता, विभक्त कुटुंबातील समस्या इत्यादी अनेक स्वरुपाचा आहे. स्त्री -अत्याचाराची कारणे पैशाशी संबंधित, व्यक्तीमत्त्वासंबंधीत, तवाणाची परिस्थिती, मद्यपान, पुरुषी अहंकार, प्रसारमाध्यमांची अतिरेक, सूडाची भावना इत्यादी प्रकारची आहेत. या अत्याचाराचे स्त्रीवर मानसिक, शारीरिक, आरोग्यावर, सामाजिक, कौटुंबिक अशा प्रकारचे परिणाम होतात.

स्त्री भृणहत्या अतिशय भयानक अशी स्त्री समस्या आहे. स्त्रीभृण हत्येमुळे समाजामध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण घडत चालले आहे. दर हजारी पुरुषांमध्ये स्त्रीयांचे संख्या कमी होत चालली आहे.

प्रसार माध्यमांचा स्त्री विषयी स्त्रीयांच्या समस्यांचा प्राधान्य देणे, प्रसार माध्यमांनी स्त्रीयांना पाठिंबा देणे, स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्यासाठी प्रयत्न ही सकारात्मक भूमिका आहे. तर स्त्रीयांचे विकृत चित्रन, स्त्रीयांवर अत्याचार होणाऱ्या कार्यक्रमांचे प्रसारण हे प्रसार माध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका आहे. स्त्रीयांना सामाजिक बंधनातून सोडवण्यासाठी शासनाने अनेक फायदे केलेले आहेत.

भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी स्त्रीयांना शिक्षण, समाज जागृती, कायदेशीर प्रक्रियेचे सुलभीकरण, पोलीस खात्याची सकारात्मक भूमिका, कायद्याची

काटेकोरपणे अंमलबजावणी, धार्मिक नेतृत्वाचा पाठिंबा, कामाच्या ठिकाणी सकारात्मक दृष्टिकोन, अशासकीय संघटनांची विधायक दृष्टिकोन, संसदेत प्रभावी स्त्रीनेतृत्व इत्यादी उपाय आहेत.

## २.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) 'असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता' ही संकल्पना असमानतेच्या सकारात्मक वनकारात्मक दृष्टिकोनांच्या साह्याने सविस्तर स्पष्ट करा.

२) लिंग भिन्नतेमुळे निर्माण होणाऱ्या भिन्नता सांगा व स्त्री - पुरुष समानतेचा खरा अर्थस्पष्ट करा.

३) वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे स्थान स्पष्ट करा.

४) वैदिक कालखंडानंतर समाजातील स्त्रीयांची परस्थितीचे सविस्तर विवेचन करा.

५) सध्याच्या आधुनिक काळातील स्त्रीयांच्या स्थानाचे वर्णन करुन खऱ्या अर्थाने आज स्त्री-पुरुष समानता आहे का याचे सविस्तर विवेचन करा.

६) अत्याचार किंवा हिंसाचाराचा अर्थ / व्याख्या सांगून अत्याचाराचे वर्गीकरण करा वभारतीय स्त्रीयांवरील अत्याचाराचे किंवा समस्येचे प्रकार सांगा.

७) स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची कारणे सांगून अत्याचाराचे सविस्तर होणाऱ्या परिणामयाची सविस्तर चर्चा करा.

८) स्त्री भृण हत्तेची कारणे सांगून सातत्याने घटत जाणारे लिंग गुणोत्तराची कारणे सविस्तरसांगा.

९) प्रसार माध्यमांची स्त्रीया विषयक सकारात्मक व नकारात्मक दृष्टिकोन सविस्तर सांगा.

१०) भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी असलेल्या निरनिराळया उपायांची सविस्तरचर्चा करा.

११) टिपा लिहा.

१) लिंग भिन्नता २) स्त्रीयांचे स्थान ३) हिंसाचाराचा अर्थ ४) स्त्री समस्येचे प्रकार

५) स्त्रीयांवरील अत्याचाराची कारणे ६) भ्रूणहत्या ७) लिंग गुणोत्तर प्रमाणाची कारणे

८) स्त्रीया व प्रसारमाध्यमे.

❖❖❖❖

# घटक -३

## अपंगत्व

## (Disabilities)

**पाठाची रचना :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ अपंगाचे प्रकार

३.२.१ अंधत्व

३.२.२ बहिरेपणा

३.२.३ अस्थिरोग विषयक विकलांग

३.२.४ मानसिक विकलांग

३.४ विकलांग व्यक्तीना उपलब्ध असणाऱ्या सेवा

३.५ सारांश

३.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न


## ३.० उद्दिष्टे

- अपंगत्वाचे प्रकार समजावून घेता येतील.
- अपंगत्वाच्या प्रत्येक प्रकाराचे प्रतिबंध आणि उपचार जाणून घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना

अपंगत्व ही भारताची मोठी सामाजिक समस्या आहे. 'ज्या व्यक्ती त्यांच्या शारीरिक वमानसिक (बौध्दिक) बिघांडामुळे नित्याची कामे करु शकत नाही. त्यांना अपंग व्यक्तीसमजण्यात येते'. अपंग आणि अपंगत्वाची समस्या मानवजातीच्या सोबतच जन्माला आलेलीआहे. शारीरिक व्यंग आणि मानसिक दोर्बल्य असलेल्या व्यक्ती जगामधील प्रत्येक देशात आहेत.काहींना जन्मतःच अपंगत्व असते तर काहींना मोठा आजार व अपघात यामुळे अपंगत्वयेते. अपंगाना इतरांच्या सहानुभूतीची गरज नसते, तर त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठीआणि स्वतःच्या विकास करण्यासाठी आपल्या सर्वाच्या सहकार्याची आणि मदतीची गरज असते.भारतात सुमारे १०० दश लक्ष अपंग व्यक्ती आहेत. त्यांची वर्गवारी त्यांच्या अपंगत्वाच्याप्रकारानुसार पुढील प्रमाणे करता येईल.

- २५%मानसिक दौर्बल्यामुळे अपंगत्व आलेल्या व्यक्ती
- १५%अंधत्वामुळे अपंगत्व आलेल्या व्यक्ती.
- ३०%मुक - बधीर.
- १५%बोलता न आल्याने येणारे अपंगत्व.
- १५%इतर.

अपंगत्व येण्याचे प्रमुख कारण हे निरक्षरता हे आहे. एकूण अपंगापैकी ५५%अपंगव्यक्ती ह्या गरीब कुटुंबातील आहेत. म्हातारपणामुळे हातापायाचा थरकाप होणारे, दृष्टीगमवणारे, बहिरे होणारे, चालू न शकणारे यांनाही अपंगत्वच समजण्यात येते. पक्षघातामुळे अर्धांगलुळे पडणे, महारोगाने ग्रस्त अशा अनेक व्यक्तींचा अपंगामध्ये समावेश होतो.

## ३.२ अपंगत्वाचे प्रमुख प्रकार

शारीरिक आणि मानसिक दौर्बल्य यांवर आधारित अपंग व्यक्तीचे प्रमुख प्रकारपुढीलप्रमाणे आहेत.

(१) अंधत्व
(२) बहिरेपण
(३) अस्थिरोगविषयक विकलांग
(४) मानसिक विकलांग

### ३.२.१ अंधत्व

ज्यांना पूर्णतः दिसत नाही त्यांना अंध व्यक्ती असे म्हणतात. दोषयुक्त डोळे असणाऱ्याव्यक्तीस पूर्ण अधंत्व किंवा अंशतः अंधत्व म्हणजेच रातआंधळेपणा, अस्पष्ट दिसणे, रंगओळखण्याची क्षमता नसणे, मोतीबिंदू असणे इत्यादी दोष आढळतात. ज्यांना एका डोळ्यानेव्यवस्थित दिसते अशाचा समावेश यामध्ये होत नाही.राष्ट्रीय अधंत्व नियंत्रण कार्यक्रम यांनी अंधत्वाची व्याख्या करताना अंधत्वाच्या पुढीलतीन पातळ्या ठरविल्या आहेत.

- चांगल्या प्रतिचा चष्मा वापरुनही दृष्टी ६/६ पेक्षा कमी असणे.
- डोळ्यांची दृष्टी २० किंवा त्यापेक्षा कमी असणे.
- चांगल्या प्रतीचा चष्मा वापरुनही एका डोळ्याची क्षमता ६/६ पेक्षा कमी असणे किंवा२० पेक्षा कमी असणे.

थोडक्यात दोन्ही डोळयांनी व्यवस्थीतपणे न दिसणे म्हणजेच अंधत्व असे म्हणतायेईल.

**अंधत्वाची कारणे**

अंधत्वाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**(१) डोळयात फूल पडणे** (**Cataract**) - डोळयात फूल पडणे किंवा मोतीबिंदू असणेयामुळे अंधत्व येते. डोळयातील नेत्रस्फटीक किंवा मोती बिंदू पारदर्शकतचे काम करीतनाही त्यास डोळयात फूल पडणे असे म्हणतात. डोळयांला इजा पोहचल्याने, ‘क्ष’किरणांच्या विस्फोटाणे,

ठराविक औषधोपचारामुळे किंवा मधुमेह या आजारामुळे डोळयातफूल पडणे किंवा मोतीबिंदू ही समस्या निर्माण होऊ शकते. परंतु अनेकदा नेत्र-शस्त्रक्रियाकरुन या समस्येवर मात करता येते. म्हणजेच परत दृष्टी प्राप्त करता येते.

**(२) ग्लूकोमा (Glaucoma) –** सर्व सामान्यपणे प्रौढामध्ये निर्माण होणारा हा आजारडोळयात फूल पडणे या आजाराप्रमाणेच आहे. वयोमानानुसार डोळ्यातून पातळ द्रव सततयेते. हा द्रव डोळयातील नेत्रस्फटीकामागील मज्जातंतूवर सारखा आघात करतो. त्यामुळेदृष्ट पटल्यावर ताण पडतो आणि अंधत्व येते.

**(३) 'अ' जीवनसत्वाचा अभाव (Vitamin 'A' Dificiency)** - 'अ' जीवनसत्वाच्याकमतरतेमुळेही अंधत्व येऊ शकते. 'अ' जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे डोळयातील बुबुळावरजे पारदर्शक चिवट पटल असते ते कोरडे पडते. त्यामुळे रातांधळेपणा होतो. अशाप्रकारचाआजार हा ज्या कुटुंबामधील मुलांना सकस आहार मिळत नाही, अशा गरीब घरातीलमुलांनाच मोठया प्रमाणावर होतो.

**(४) अनेक आजार (Diseases)** ज्यांना अनेक प्रकारचे आजार असतात त्यांना त्यासर्व आजारांचा डोळयावर परिणाम होऊन अंधत्व येण्याची शक्यता असते. या आजारांमध्येमधुमेह, कांजण्या आणि हायपरटेनशन इत्यादी आजारांचा समावेश होतो.

(५) **हायफरमेट्रोफिया (Hypermetropia)** - यामध्ये लांबचे व्यवस्थित दिसते, परंतुजवळचे दिसत नाही. यासाठी लेन्सचा वापर केल्यास हा दोष टाळता येतो.

(६) **इतर कारणे (Other Causes)** मेंदूला ईजा पोहचल्यासही त्याचा परिणामडोळयावर होतो. काहींना डोळयांचा आजार पिढीजातच असतो. म्हणजेच अनुवंशकीयचअसतो.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - अंधत्व म्हणजे काय ? हे स्पष्ट करुन अंधत्वाची कारणे सांगा.

munotes.in

### अंधत्वावरील उपचार आणि निवारण (Treatment & Prevention)

(१) लहान मुलांना 'अ' जीवनसत्व असणाऱ्या पदार्थांचा आहारात समावेश करावा.

(२) हिरव्या भाज्या, गाजर, फळे, यामध्ये पेरु, लिंबू इत्यादी फळांचाही आहारात नियमितसमावेश असावा.

(३) अलिकडे धर्मदाय संस्था अतिशय कमी खर्चात डोळ्यांची तपासणी, त्यावर उपचार व ऑपरेशनही करतात.

१९०९ साली रत्नागिरी हेन्डरसन या आय्. सी. एस्. (I.C.S.) अधिकाऱ्याने‘ब्लाईड’ रिलीफ असोसिएशन ची स्थापना केली. तोपर्यंत भारतात काहीही सरकारी प्रयत्नझाले नव्हते. या संस्थेच्या शाखा पुढे ठिकठिकाणी निघाल्या, इ.स. १९२९ मध्ये अखिलभारतीय स्वरूपाची संस्था सुरु केली. संस्थेने फिरत्या दवाखान्याची सोय केली वऔषधोपचोराचीही सोय केली. इ.स. १८३४ मध्ये लुई ब्रेलने तयार केलेल्या लिपीमुळे अंधजगतात एक प्रकाशमय दालन खुले झाले.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न - अंधत्वावरील उपचार आणि निवारण सांगा.

---

---

---

---

## ३.२.२ बहिरेपणा (Deafness)

श्रवण दोषांमुळे विकलांग असलेल्या व्यक्ती बहिऱ्या असतात. काही व्यक्ती जन्मतःकर्णबधीर असल्याने त्यांची वाचाशक्ती देखील विकसित होत नाही. त्यांना मूकबधीर असेम्हणतात. सर्व सामान्यपणे ० ते ३० डेसीबल पर्यंत व्यवस्थित ऐकू येते. डेसिबेल म्हणजेध्वनीची तीव्रता मोजण्याचे परिणाम होय. ३० डेसिबेलच्या पुढे व्यवस्थित ऐकू येत नाही.श्रवण दोषामुळे पूर्ण बहिरेपणा किंवा अंशिक बहिरेपणा असे कर्ण बधिरत्व उदभवते.

बहिरेपणात व्यक्ती तिची ऐकण्याची शक्ती पूर्णच गमावून बसलेली असते. सामान्य माणूस कायबोलत आहे किंवा संपर्क साधत आहे याची बहिऱ्या व्यक्तीला अजिबात कल्पना येत नाही. जीमुले बहिरीच जन्माला येतात ती मुकीही असतात. बहिऱ्या मुलांना संपर्क साधण्यासाठी वेगळयाप्रकारचे शिक्षण दिले जाते. अंध, मूक, बधीर यांच्याकरता वेगळया शाळा निर्माण कराव्यालागतात. अपंगाच्या शिक्षणाकरिता विशेष शिक्षक, विशेष स्वरुपाची साधनसामग्री व विशेषप्रकारचे नियोजन करावे लागते.

**बहिरेपणाचे प्रकार**

बहिरेपणा हा कानाचा मुख्य दोष आहे. या कर्णदोषाचे चार प्रमुख प्रकार पडतात तेपुढीलप्रमाणे आहेत.

**(१) संवहन बधिरता** जेव्हा बाह्यकर्ण ध्वनिलहरी अंतकर्णापर्यंत पोहोच वू शकत नाहीतेव्हा हा दोष निर्माण होतो. याची कारणे दोन असतात. एकतर बाह्यकर्णात मळ खूपसाचलेला असतो किंवा कर्ण अस्थिकांची साखळी तुटते. हा दोष इतक्या गंभीरस्वरुपचा नाही.

वैद्यकीय उपचाराने अशी बधिरता काढता येते. या दोषाला आणखी काही कारणे म्हणजेकर्णपटलाला इजा पोहोचणे. आतल्या कानात निर्माण झालेली दाहकता इत्यादी असते.

**(२) संवेदना बधिरता** - हा बहिरेपणा मेंदूच्या श्रवण क्षेत्राला इजा पोहोचल्यामुळे येतो. हादोष कायमस्वरुपी असतो. यालाच प्रमास्तिष्क बधिरपणा असे म्हणतात. हा दोषप्रमस्तिष्कात नेमका कुठे आहे. हे समजल्यास त्यावरुन बहिरेपणाची नावे सांगता येतात.

- **प्रमस्तिष्क बधिरपणा** प्रमस्तिष्कच्या बाह्यकात दोष असेल तर त्यालाप्रमास्तिष्क बधिरपणा असे म्हणतात.

- **केंद्रिय बधिरपणा** मेंदूतील श्रवणकेंद्राच्या क्षेत्रात इजा पोहोचलीअसल्यास त्याला केंद्रीय बधिरपणा असे म्हणतात.

**(३) गर्भजात बधिरपणा** बधिरपणा वरील प्रकारांशिवाय गर्भजात बधिरपणा असाही एकप्रकार आहे. हा कर्णदोष जन्मजात असतो. तसेच तो अनुवंशामुळेही आलेला असतो.

**(४) संपादित बधिरपणा** कावीळ, टायफाईड, इत्यादी आजारावर करण्यात येणाऱ्याउपचार पध्दतीत दिल्या जाणाऱ्या औषधांच्या शरीरावर इतर परिणाम (Sideeffects) होतो. या औषधांच्या जास्तीच्या डोसामुळे अनेकदा बहिरेपणा येतो. गंभीरस्वरुपाच्या अपघात किंवा आवाजाचे प्रदूषण इत्यादी सारख्या घटनांमुळेही बधिरता येतेत्यास संपादित बधिरता असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - बहिरेपणाचे प्रकार सांगा.

**प्रतिबंध आणि उपचार**

संपादित बधिरपणावर वैद्यकीय उपचार करुन ते व्यवस्थित करता येतात. आवाजामुळेकिंवा अपघातामुळे बहिरेपणा आले असल्यास त्याच्यावर योग्य उपचार केल्यास आणि त्वरितउपचार केल्यास पूर्ववत ऐकू येऊ शकते.

केंद्रीय बधिरपणा किंवा गर्भजात बधिरपणा यासारख्या विकलांग पणावर वैद्यकीयउपचार पध्दतींचा काहीही परिणाम होत नाही. अशा वेळी संबंधित मुलांना त्वरित कर्णयंत्रे किंवातत्सम साधनांचा वापर केल्यास बधिरपणावर मात करता येते. समाजाने अशा मुलांकडे वेळीचलक्ष पुरविल्यास ही मुले सुध्दा व्यवस्थित संपर्क साधून त्यांचे करिअर करु शकतात.ज्या रोगांमुळे बहिरेपणा येतो अशा रोगाविषयी समाजामध्ये मोठया प्रमाणावर जागृतीकरणे आवश्यक आहे. विशेषत : जर्मन गोवर या रोगांपासून अतिशय दक्ष राहणे

आवश्यकअसते. गरोदरपणात मातेला जर्मन गोवर झाल्यास त्याचा परिणाम गर्भातील मुलाच्या कानावरहोतो व मुलगा जन्मजात बहिरा जन्माला येतो. अनेकदा अंधसुध्दा होतो.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न – बहिरेपणा या रोगावरील प्रतिबंध आणि उपचार सांगा.

___

___

___

___

### ३.२.३ अस्थिरोग विषयक विकलांग

ज्या व्यक्तीला हाडांत असा काही दोष आहे, की ज्यामुळे त्याला व्यवस्थीपणे शारीरिकहालचाली करता येत नाहीत व नियमित काम करता येत नाही त्यांना अस्थिरोग विकलांग असेम्हणतात. बंगलोर येथील शारिरीक विकलांग संघटन यांनी अस्थिरोग विकलांग या विषयी पुढीलमत व्यक्त केले आहे. 'अस्थिरोग विकलांग व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती की, ज्याच्या हाडांमध्येव्यंग असते, हांडाच्या नियमित हालचाली करता येत नाहीत, सांधे दुखतात किंवा स्नाय दुखतातअशी व्यक्ती होय.'

पुढील कारणांमुळे व्यक्ती अस्थिरोग विकलांग बनते.

- जन्मजात विकलांगपणा असणे अनुवंशिकतेमुळे किंवा जन्मानेच असा विकलांगपणा निर्माणहोतो.
- अपघाताने
- गर्भार स्त्रीयांनी हानीकारक औषधे घेतल्यास गर्भावर त्याच्या परिणाम होतो. ज्या औषधामुळेसाईड इफेक्ट होतात अशी औषधे .
- क्षय, देवी इत्यादी रोगांमुळे

**अस्थिरोगाचे प्रकार**

पुढील प्रमाणे अस्थिरोगाचे प्रकार सांगता येतात.

**(१) पोलियो** लहान मुलांना होणारा हा विकार म्हणजे पक्षघाताचाच प्रकार म्हणता येतो.ताप येऊन अंगाला लकवा मारतो. गळा दुखणे, पचनतंत्र बिघडणे, स्नायू आखडणे ही लक्षणेहीदिसून येतात. सध्या हा रोग नियंत्रणात आहे. कारण शासनाकडून पोलिओ डोस सर्व पाचवर्षाच्या आतील मुलांना दिला जातो.

**(२) मिरगीफिट (Epilepsy)** अचानक रोगी बेशुध्द होऊन कोसळतो.हातापायाला झटके देणे, दातखिळ बसणे, शरीर वेडेवाकडे किंवा ताठर होणे, ही फिटस्चीलक्षणे आहेत.

झटका येण्यापूर्वी पूर्वसूचना रोग्याला मिळते व तो किंचाळायला सुरुवात करुनबेशुध्द पडतो. हा रोग मुख्यतः अनुवांशिक आहे. शिवाय तीव्र अपचन, नजरेत फेरफार,मानसिक उत्तेजना आदि कारणांनी फिटस् येण्याची शक्यता आहे.

**(३) प्रमास्तिष्क दुर्बलता** मोठ्या मेंदूला येणारी दुर्बलता शरीराला सर्व संवेदनापोहचविणाऱ्या मेंदूतील यंत्रणेला इजा पोहचल्याने प्रमास्तिष्क दुर्बलता येते. विशेषतः गर्भारस्त्रीयांच्या बाबतीत त्यांच्या गर्भावर अशा प्रकारचा परिणाम होतो. मुलाच्या जन्माच्या वेळी मुलालायोग्य ऑक्सिजन न मिळाल्यास त्याच्या मेंदूवर परिणाम होतो. व प्रमस्तिष्क दुर्बलता येते.त्याप्रमाणे मातेला जर्मन गोवर असल्यास जन्मणाऱ्या मुलांच्या मेंदूवर त्याचा परिणाम होतो.

**(४) स्पायना बायफीडा** शक्यतो जन्मतःच हा आजार पाठीच्या कण्याला होतो. यामुळेपाठीच्या कण्यापासून खालील भाग पूर्ण लूळा पडतो. त्यामुळे मूत्राशय खराब होते. लघवीवरनियंत्रण राहत नाही. लहान मुलांना झाल्यास ती मतीमंद होण्याची शक्यता जास्त असते.

**(५) अस्थिगत संसंर्ग** - ऑस्टीओमायलेटीस हा हाडाला व हाडाच्या आतील भागामध्येहोणारा आजार आहे. हाडाला सुध्दा रक्तपुरवठयाची गरज असते. रक्तपुरवठ्यातून हाडांमध्येसंसर्ग होऊ शकतो. साधारणपणे ५ ते १४ वयोगटातील मुलांमध्ये हा संसर्ग होण्याचे प्रमाणजास्त आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - अस्थिरोगाची कारणे सांगून अस्थिरोगाचे प्रकार स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**प्रतिबंध आणि उपचार**

अस्थिरोगाच्या प्रतिबंध व उपचारासाठी भौतिकोपचार तज्ञांकडून त्वरीत शरीरातीलसंबंधित भागांचा व्यायाम केला पाहिजे. अनुभवी तज्ञांकडून किंवा सर्जरी करुन संबंधितशरीरातील हाड व्यवस्थित केले पाहिजे योग्य हालचाली करता येत नसलीत तर कृत्रिमअवयवयांचा उपयोग केला पाहिजे. लहान मुलांचा पोलिओ, पोलिओ लसीमुळे नियंत्रणात आणतायेतो. सरकारी व बिगर शासकीय अनेक यंत्रणा यांनी अस्थिरोग व त्यावरील उपाय या विषयीसमाजातील लोकांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

## ३.२.४ मानसिक विकलांग

### मानसिक विकलांगतेचे प्रकार

मानसिक दृष्ट्या विकलांग व्यक्ती विचार करण्यास व कृती करण्यास असमर्थ असते.मानसिक समस्यामुळे तिची विचार करण्याची क्षमता नष्ट झालेली असते किंवा खुटलेली

असते.अशा व्यक्तीमध्ये बौध्दिक परिपक्वताही नसते.पुढील तीन प्रकारचे मानसिक विकलांग असतात.

(अ) मतिमंदत्व

(ब) विद्वतेतील विकलांग

(क) मानसिक आजार

**(अ) मतिमंदत्व (Mental Retardation)** - गरजेपेक्षा कमी किंवा अत्यल्प बुध्दिम्हणजे मतिमंद होय. म्हणजेच मानसशास्त्रीय दृष्ट्या ७० पेक्षा कमी बुध्दिगुणांक (I.Q.)असणे. अमेरिकन असोसिएशन ऑन मेंटल रिटार्डेशन यांच्या मते, 'मतिमंदत्व म्हणजे बौध्दिककार्यातून उकळपणे प्रभावित होणे. म्हणजेच अत्याल्प बुध्दि आणि कौशल्यामधील मर्यादा.या निकषावरुन मतिमंदत्व ठरविता येते. मतिमंदत्वाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

- संप्रेषण कौशल्य
- स्वतःची काळजी घेणे
- स्वतंत्रपणे राहण्याची क्षमता
- सामाजिक क्षमता
- सामाजिक कार्यामध्ये सहभाग
- स्वतःला मार्गदर्शन करणे.
- आरोग्य आणि सुरक्षिततेचा विचार
- शैक्षणिक क्षमता
- काम आणि विश्रांती यांच्यातील ताळमेळ इत्यादी विषयी मतिमंद व्यक्ती असमर्थ असतात.विविध दृष्टिकोनातून मतिमंदत्वाचे काही प्रकार पुढीलप्रमाणे पडतात.

**१. बौध्दिक कमकुवतेवरुन मतिमंदाचे प्रकार** मानसशास्त्रज्ञ टर्मन यांनीबुध्दिगुणांकाच्या आधारे मतिमंदाचे पुढील वर्गीकरण पाडले आहेत.

- ५० ते ७० बुध्दिगुणांक - अल्पबुध्दि
- २५ ते ३० बुध्दिगुणांक -अत्यल्पबुध्दि
- २५ पेक्षा कमी बुध्दिगुणांक – निर्बुध्द

**२. शारीरिक व जैविक स्वरुपावरुन मतिमंदतेचे प्रकार** मनोविकारतज्ञने व्यक्तीमध्येशारीरिक व जैविक स्वरुपाचे कोणते दोष आहेत याचा अभ्यास करुन मतिमंदाचीचिकित्सा करतात. त्यांनी मतिमंदाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**(१) फ्रजाईल एक्स सिन्ड्रोम (Fragile x Syndrome)** दुभंगलेले रंगसूत्रपालकांकडून मुलांमध्ये संक्रमित होते. त्यातून गंभीर स्वरुपाचे बुध्दिदोष दिसून येतात.बौध्दिक मागासले पणाबरोबर वाचिक व भाषिक दोष मुलांमध्ये आढळतात. ही मुलेस्वभावाने संकोची असतात. सामान्य हालचाली योग्य प्रकारे करु शकत नाहीत. त्यामुळेअशी मुले समाजात मागे पडतात.

**(२) टर्नर्स सिन्ड्रोम (Turners Syndrome)** सामान्यपणे प्रत्येक रंग सूत्राच्याजीवनपेशीत २३ जोडया असतात. पण या मुलांमध्ये २३ व्या रंगसूत्रात दोनरंगसूत्राऐवजी एकच रंगसूत्र (Chromosome) असते.

**(३) क्लिनफेल्टर्स सिन्ड्रोम (Clean felters syndrome)** - या मुलांमध्ये २३ व्याजोडीतील रंग सूत्रात एक अतिरिक्त रंगसूत्र आढळते.

**(४) डाऊनस् सिन्ड्रोम (Down's Syndrome)** - ही मुले मंगेल वंशाच्यालोकांसारखी दिसतात. म्हणून त्यांना, मंगोल, असेही म्हणतात. यांच्यामध्ये २१ व्याजोडीतील रंगसूत्रात एक अतिरिक्त रंग सूत्र आढळते.

**(५) लघुशीर्ष (Micro Cephalus)** यामधील मुलांमध्ये डोक्याचा आकार लहानअसतो. सामान्य मुलांसारखी या मुलांच्या मेंदूची वाढ होत नाही. ही समस्या अगदी लहानवयातच निर्माण होते. बुध्दिगुणांक २५ पेक्षा कमी आढळतो. त्यामुळे त्यांना शिक्षण देणेअशक्य असते.

**(६) जलशीर्षता (Hydro Cephalus)** - या मुलांच्या डोक्याचा आकार फार मोठाअसतो. कारण त्यांचा विकास होत असताना मेंदूच्या व मज्जारज्जू पोकळीत असलेलासेरेब्रो स्वायनल द्रव बऱ्याच प्रमाणांत वाढतो. त्यामुळे मेंदूला इजा होते. इजेच्या प्रमाणातबुधिगुणांक ५० ते ७० च्या दरम्यान आढळतो.

**(७) जडवामनता (Cretinism)** कंठस्थ ग्रंथीमधून थायरॉक्झीन नावाचा स्त्राव येतो.त्याचे प्रमाण कमी झाल्यास हा दोष कमी होतो. बुध्दिगुणांक ५० च्या वर आढळत नाही.शारीरिक वाढ खुंटलेली आढळते.

**(८) फेनिल कीटोन्यूरीया** प्रोटीन (प्रथिन) द्रव्यात फनिलॅनॉनिन नावाचे ऑमिनोॲसिड असते. यकृतातून निर्माण होणाऱ्या रसामुळे या ॲसिडचे रुपांतर शरीरालापुरविल्या जाणाऱ्या शक्तीमध्ये होते, पण या समस्येमध्ये यकृतातील द्रव्याची कमतरताभासते. त्यामुळे ॲसिड साठत जाते. त्यातून मेंदूच्या कार्यात अडथळा येतो.

**(९) टे साचा (Toy- Sacha)** - अनुवंशिक दोषामुळे दुर्बल जीनचे संक्रमण होते तेचयापचय कियेमध्ये दोष निर्माण करते. परिणामी चेतापेशींची पुनर्निमिती थांबते.जन्मानंतर स्नायुंवरील नियंत्रण ढासळते. मतिमंदतेबरोबर अंधत्व, अपंगत्व असते.

**(ब) विद्वत्तेतील विकलांग (Learning Disables)**

शिक्षण घेण्याची व्यक्तीची कुवत कीती आहे. याचा विचार करुन शिक्षण क्षेत्रातीलअधिकारी मतिमंदाचे प्रकार पाडतात. ते अशा मुलांचे पुढील प्रकारे वर्गीकरण करतात.

- अध्यापनीय (Educable) शिक्षण घेण्याची कुवत असलेली मुले.
- प्रशिक्षणीय (Trainable) प्रशिक्षण देण्याची योग्यता असणारी मुले.
- अप्रशिक्षणीय (Custodial) सर्वार्थाने दुसऱ्यांवर अवलंबून असणारी मूले.

munotes.in

**(क) मानसिक आजार (Mental Disorder)** काही व्यक्तीना मानसिकविकलांगामुळे आणि मेंदू काम करीत नसल्याने त्यांना भावनिक, वर्तणूक विषयक वव्यक्तिमत्वाविषयी विकलांगपणा येतो. मानसिक आजार म्हणजे कमकुवत मानसिकआरोग्य किंवा मानसिक विकृती होय. अशा व्यक्तीची वर्तणूक ही विचित्र पध्दतीचीअसते. तसेच त्यांना भावनिक त्रासही होत असतो.

मानसिक आजार हे अनुवंशिकतेमुळे होतात. अनेकदा पर्यावरणीय घटकही मानसिकआजारास कारणीभूत ठरतात.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न – मानसिक विकलांगतेचे प्रकार सांगा

---

---

---

---

**मानसिक विकलांगतेवरील प्रतिबंध आणि उपचार**

मानसिक आजार असणाऱ्या व्यक्तींना हाताळणे अतिशय अवघड असते. अशाव्यक्तींचे उपचार हे त्या संबंधित व्यक्तीवरच अवलंबून असतात. योग्य व वेळेत उपचार केल्यासयामधील अनेक विकृती दूर करता येतात. यामध्ये पालकांची जबाबदारी महत्त्वाची असते.मुलांना स्वतःची काळजी घेण्याचे शिक्षण त्यांना द्यावे लागते.

## ३.४ विकलांग व्यक्तींना उपलब्ध असणाऱ्या सेवा

अपंगत्व ही जागतिक समस्या आहे. अपंगानाही मानवी हक्क आहेत. त्यांना सशक्त वसमर्थ बनवणासाठी अनेक कार्यक्रम हाती घेतले जातात. अपंगाचे पुनर्वसन करण्यासाठी भारतातअनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. अपंगाना पुढील सेवा उपलब्ध आहेत.

**(१) अपंगासाठी चालविल्या जाणाऱ्या संस्था-** शारीरिक व मानसिकदृष्ट्या विकलांगअसणाऱ्या साठी त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात व देशात अनेक संस्था स्थापनकरण्यात आल्या आहेत. या संस्था अंधळे, बहिरे, मुके, शारीरिक दृष्ट्या अपंग व मानसिकदृष्ट्या अपंग यांच्या समस्या सोडवण्यासाठी मोठया प्रमाणावर संशोधन करीत असतात. यासंस्था अल्प व दिर्घकालीन कोर्स अपंग व्यक्तीसाठी चालवितात. यातील काही महत्त्वाच्यासंस्था पुढील प्रमाणे आहेत.

- देहराडून येथे दृष्टी दुर्बल व्यक्तींच्या मदतीसाठी राष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात आलीआहे. या संस्थेत अंधासाठी शाळा, कार्यशाळा व प्रशिक्षण संस्था चालविल्या

जातात.अंधासाठी ब्रेल लिपीतील साहित्याची निर्मिती करण्यात येते. या संस्थेची मुंबई, दिल्लीकोलकत्ता आणि चेन्नई येथे विभागीय कार्यालये आहेत.

- अलियावर जंग इन्स्टिटय़ूटची १९८२ मध्ये मुंबई येथे स्थापना करण्यात आली ही संख्यामूक
- बधिरांना साह्य करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन इत्यादी उपक्रमहाती घेते.
- मानसिक अपंगासाठी राष्ट्रीय संस्था ही १९८४ साली सिंकदराबाद येथे स्थापन करण्यातआली. तेथे मनोरुग्णांच्या समस्येवर संशोधन करण्यात येते. मतिमंद मुलांच्या पालकासाठीप्रशिक्षण केंद्र चालवून विशेष दृकश्राव्य साहित्य वितरीत केले जाते. मतिमंद मुलांसाठीदेशात सुमारे २८६ शाळा चालविल्या जाता त्यापैकी ५१ शाळा महाराष्ट्रात आहेत.
- 'अस्थिविकलांगासाठी राष्ट्रीय संस्था' १९८२ मध्ये कोलकत्ता येथे स्थापन करण्यातआली. अस्थिदोषांमुळे दुर्बलता असलेल्या रुग्णांसाठी ही संस्था संशोधन करते आणिअस्थिविकंलांगाना प्रशिक्षण देते.
- 'स्पॉस्टिक सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था १९९० साली मुंबई येथे स्थापन करण्यातआली. अपंगांना रोजगार मिळवून देण्यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. अपंगासाठी हीसंख्या पुढील उपक्रम राबविले जातात.

(अ) अपंगाना व्यवस्याय शिक्षण
(ब) व्यावसायिक कौशल्याचा विकास
(क) उदयोग -संस्थामध्ये अपंगाना रोजगार प्राप्ती
(ड) अपंगाना संपर्क तंत्राचे शिक्षण
(ई) अपंगाना कार्यात्मक साक्षरतेचे शिक्षण
(फ) समाजाशी समायोजन करण्याची क्षमता विकसीत करणे इत्यादी.

**(२) कल्याणकारी मंत्रालय** विकलांग व्यक्तीचे पुनर्वसन करणे व त्यांना सेवा पुरवण्याचेकाम कल्याणकारी मंत्रालयाचे असते. सन २००५ -०७ मध्ये विकलांग लोकांच्या कल्याणासाठीसरकारने २४३ कोटी रुपये दिले अपंगासाठी विविध कल्याण कारी योजना व कार्यक्रमांचीआखणी कल्याणकारी मंत्रालय करते.

**(३) बक्षिस आणि शिष्यवृत्ती** भारत सरकारने राष्ट्रीय अपंग कल्याण निधी उभारलेलाआहे. दरवर्षी राष्ट्रपती विशेष कामगिरी केलेल्या अपगांना राष्ट्रीय सन्मान बहाल करतात. विविधसंख्या व संघटनाकडून पुढील बक्षिसे व शिष्यवृत्त्या अपंगांना दिल्या जातात.

- उद्योग क्षेत्रात स्वतः ठसा उमटीवणारी अपंग व्यक्ती.
- स्वतःच्या हिम्मतीवर व मोठ्या आत्मविश्वासाने स्वयंरोजगार करणाऱ्या अपंग व्यक्ती
- कार्यक्षमपणे नोकरी करणारी अपंग व्यक्ती.
- मुंबई येथील राष्ट्रीय अंध संघटना अंधाना त्यांच्या शिक्षणासाठी व प्रशिक्षणासाठी शिष्यवृत्तीदेते.

**(४) स्वयंसेवी संघटना** शारिरीक व मानसिक अपंगाना सहकार्य व मदत करण्यासाठीमोठ्या संख्येने स्वयंसेवी संघटना स्थापन होत आहेत. १९९२ मध्ये मुंबई येथे `Parents

ofDown's syndrome Association'ची स्थापना करण्यात आली. ही संस्था डाऊनसिन्ड्रोम ग्रस्त अपंगाच्या मदतीसाठी स्थापन करण्यात आली आहे. ही संस्था संबंधित मुलांच्यापालकांना डाउन सिन्ड्रोम विषयी काळजी कशी घ्यावी, त्याचे स्वरुप व त्यावरील उपचार याविषयी शिक्षण देते. समाज जागृती करण्याचे कामही ही संस्था करते.

(५) **शाळा** अपंग मुलांची शिक्षणपध्दती अवघड व वैशिष्टयपूर्ण असते. त्यांच्यासाठीस्वतंत्र विद्यालये व खास प्रशिक्षित शिक्षक यांची गरज असते. शिक्षणाचे माध्यम असणाऱ्याभाषेला ही मुले पारखी झालेली असतात त्यांच्यात अगोदर भाषा जागृती करावी लागते आणि नंतरशिक्षणाची सुरुवात करावी लागते.

भारतामध्ये अशा प्रकारच्या अपंग मुलांना शिक्षण देण्यासाठी मोठया संख्येने शाळा सुरुकरण्यात आल्या आहेत. सर्वात जास्त शाळा कर्नाटक राज्यात आहेत, त्याच्या खालोखालमहाराष्ट्र व नंतर केरळचा क्रमांक येतो. या शाळानी अपंग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षणाचाकार्यक्रम तयार केला आहे.

(६) **स्वयंसेवी संघटना आर्थिक मदत** - 'दीन दयाळ अपंग पुर्नवसन योजना' ही केंद्रसरकारने सुरु केली आह. अपंगाचे पुर्नवसन आणि शिक्षण देणाऱ्या स्वयंसेवी संस्था वसंघटनांना याद्वारे आर्थिक मदत पुरवली जाते.

(७) **विशेष सवलत** शारिरीक व मानसिक अपंगाचा भारत सरकारकडून पुढील विशेषसवलती देण्यात येतात.

- सार्वजनिक प्रवास सवलत उदा. विमान, रेल्वे एस.टी. इत्यादी प्रवासात सवलत देण्यासयेते.
- कमी व्याजदराने कर्जपुरवठा.
- आयकरांमध्ये सवलत
- इतर विविध योजनांमध्ये प्राधान्य विशेषतः शिक्षण

(८) **नोकरीत आरक्षण** शासकीय सेवामध्ये 'क' व 'ड' श्रेणीतील एकूण जागापैकी ३%जागा अपंगासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. केंद्रीय सेवामध्ये अपंगाना वयोमर्यादेतून १०वर्षाची सवलत देण्यात आली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांनाही हे आरक्षण लागू आहे.अपंगासाठी विशेष सेवा विनियोजन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

(९) **क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम** राज्य पातळीवर राष्ट्रीय पातळीवर व आंतरराष्ट्रीयपातळीवर अपंगाच्या क्रिडा स्पर्धा आणि अपंगासाठी सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.महाराष्ट्रात, राज्य सरकारने अपंगासाठी समांतर ऑलम्पीक स्पर्धाचे आयोजन केले होते. अशाचप्रकारच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील आयोजित केल्याजातात. या क्रीडा स्पर्धेत सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांना जिवनाचा नवीन अर्थ समजतो,जगण्याची नवसंजीवनी मिळते.

**(१०) मालकांचा प्रलोभन** अपंगत्व कायदा १९९५ कलम ४१ प्रमाणे संबंधित सरकारआणि स्थानिक अधिकार असणाऱ्यांनी सार्वजनिक व खाजगी, क्षेत्रातील उद्योजकांना त्यांनीत्याच्या संघटनांमध्ये ५ %अपंग लोकांना रोजगार द्यावा म्हणून प्रेरित करणे.खाजगी क्षेत्रामध्ये अपंगाना नोकरी द्याव्यात यासाठी अपंग व्यक्तीसाठी राष्ट्रीय धोरण,२००६ मध्ये स्वीकारण्यात आले. यामध्ये खाजगी उद्योगांना त्यांनी अपंगाना रोजगार द्यावेतम्हणून विविध प्रलोभन, देण्यात आली. उदा- करामधून सवलत, बक्षीसे आणि आर्थिक प्रलोभनमध्ये खाजगी मालक अपंगाना देत असलेल्या पगारातील २०%रक्कम त्यांना सरकारकडूनपरत दिली जाते.

**(११) पुनर्ववसन केंद्रे** अपंगाचे पुनर्वसन मोठया प्रमाणावर केले जाते. देश पातळीवर,प्रादेशीक पातळीवर व जिल्हा पातळीवर अपंगाचे पुनर्वसन करण्यासाठी पुढीलप्रमाणे व्यवस्थाकरण्यात आली आहे.केंद्र पातळीवर श्रीनगर, लखनौ, भोपाळ, गुहाटी आणि सुंदर नगर या ठिकाणीपुनर्वसन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. सर्व प्रकारच्या अपंगाना या ठिकाणी विविध सेवा वसुविधा पुरविल्या जातात.

- चंदीगड, कटक, जबलपूर आणि बरेली अशा चार ठिकाणी प्रादेशिक पुनर्वसन केंद्रे सुरुकरण्यात आली आहेत. याठिकाणी पाठीच्या कण्याचे विकलांग लोकांसाठी सेवा पुरविल्याजाता.
- तळापासून सर्व अपंगाना सेवा उपलब्ध व्हावी म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किंवाजिल्ह्यामध्ये एक पुनर्वसन केंद्र स्थापन करण्याचे ठरविले आहे. सध्या ५२२ ठिकाणी अशीकेंद्र आहेत.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - विकलांग व्यक्तींना उपलब्ध असणाऱ्या सेवा थोडक्यात लिहा.

## ३.५ सारांश

अपंग व्यक्तीसुध्दा मानवी समाजाचा घटक आहेत. म्हणून त्यांचाही विकास होणे महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने ज्या व्यक्ती त्यांच्या शारिरीक व मानसिक (बौधिक) बिघाडामुळे नित्याची कामे करु शकत नाहीत त्यांना अपंग व्यक्ती समजण्यात येते. शारिरीक आणि मानसिक दौर्बल्य यांवर आधारित अपंग व्यक्तीचे अंधत्व, बहिरेपणा, अस्थिरोग विषयक विकलांग, मानसिक विकलांग हे प्रमुख प्रकार आहेत. अंधत्वाची कारणे डोळयात धुल पडणे, ग्लूकोमा 'अ' जीवनसत्वाचा अभाव अनेक आजार, हायपर मेट्रोफिया इत्यादी आहेत. अंधात्वावरील उपाय म्हणजे 'अ' जीवनसत्त्व युक्त आहार, हिरव्या पालेभाज्या, गाजर, फळे इत्यादींचा आहारात समावेश असावा.

मानसिक दृष्टया विकलांग व्यक्ती विचार करण्यास व कृती करण्यास असमर्थ असते. मतिमंदन, विद्वतेतील विकलांग, मानसिक आजार हे मानसिक विकलांगाचे प्रमुख प्रकार आहेत. मानसिक आजार असणाऱ्या व्यक्तींना कुशलतेने हाताळावे लागते. योग्य व वेळेत उपचार करण्याची गरज आहे. यामध्ये पालकांची जबाबदारी महत्त्वाची असते. मानसिक रोगांने पिडीत असलेल्या मुलांना स्वतःची काळजी घेण्याचे शिक्षण त्यांना द्यावे लागते.

विकलांग व्यक्तींना उपलब्ध असणाऱ्या सेवेमध्ये अपंगासाठी चालविल्या जाणाऱ्या संस्था कल्याणकारी मंत्रालय बक्षिस आणि शिष्यवृत्ती स्वयंसेवी संघटना, शाळा, विशेष सवलत, नोकरीत आरक्षण, क्रीडा व सांस्कतिक उपक्रम, मालकांना प्रलोभन इत्यादीचा समावेश होतो.

## ३.६ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

(१) अंधत्व म्हणजे काय? हे स्पष्ट करुन अंधत्वाची कारणे सांगा व त्यावरील उपचार व निवारण सांगा.

(२) बहिरेपणाचे प्रकार सांगून त्यावरील प्रतिबंध आणि उपचार सांगा.

(३) अस्थिरोग विषयक विकलांग म्हणजे काय?हे सांगून अस्थिरोगाचे प्रकार स्पष्ट करा व त्यावरील प्रतिबंध व उपचार सांगा.

(४) मानसिक विकलांगतेचे प्रमुख प्रकार तसेच उपप्रकार सांगून त्यावरील उपचार व प्रतिबंध सांगा.

(५) विकलांग व्यक्तीनां उपलब्ध असणाऱ्या सेवा सविस्तर लिहा.

(६) टिपा लिहा.

१) अंधत्वाची कारणे

२) बहिरेपणाचे प्रकार

३) अस्थिरोगाचे प्रकार

४) मानसिक विकलांगतेचे प्रकार

❖❖❖❖

munotes.in

# घटक -४

## जातीवाद जमातवाद आणि आंतर जातीय संघर्ष

## (CASTEISM COMMUNALISM AND INTERGROUP CONFLICTS)

**पाठाची रचना :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ जाती आणि जातीची व्याख्या व वैशिष्ट्ये

४.३ जातीसंस्थामुळे निर्माण होणारी असमानता

४.४ जातीवादाचे परिणाम

४.५ जातीवादाचे निर्मूलन करण्याकरिता उपाय

४.६ जमात वादामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह)

४.७ सारांश

४.८ विद्यापीठ स्तरीय प्रश्न


### ४.० उद्दिष्टे

- जातीभेद व जाती व्यवस्था यातील फरक समजावून घेता येईल.
- जातीभेदामुळे जातीवाद कसा निर्माण झाला? जातीभेदाचे व जातीवादाचे मूळ जाणून घेता येईल.
- जमात वादामुळे परस्पर गटांतील कलह कसे होतात? याची माहिती होईल.

### ४.१ प्रस्तावना

मानव हा समाजशील प्राणी आहे. तो एकटा न राहता समाजामध्ये एकत्र राहतो त्यालाआनंदाने राहता येण्यासाठी समाजामधील मानवा मानवामधील संबंध आत्मीयेतेचे, प्रेमाचे,सहानुभूतीचे, परस्पर सहकार्याचे, साहिष्णुतेचे असणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु आजसमाजातील जातीभेदामुळे वरील प्रकारचे संबंध आज समाजामध्ये दिसत नाहीत. उलट आजसमाज निरनिराळया प्रकारच्या संघर्षाने त्रस्त आहे. याचे मूळ कारण जातीभेद आहे, म्हणूनजातीभेद आपल्या देशाला खूप मोठा शाप आहे. जातीभेदाचे मूळ कशात आहे? याचा विचारकरणे महत्त्वाचे आहे. बऱ्याच वेळा असे म्हटले जाते की जातीभेदाचे मूळ चातुवर्णव्यवस्थेमध्ये आहे. पूर्वी चातुवर्णव्यवस्था होती. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार

वर्ण अस्तित्वात होते.खोल विचार करता जातीभेदाचे मूळ चातुवर्णव्यवस्थेमध्ये निश्चित्तपणे नाही, कारण चातुवर्णव्यवस्था ही कामाची विभागणी (Distribution of Work) आहे. एक गोष्ट निश्चित्त आहे,की शारिरीक, मानसिक बौध्दिक या तिन्ही शक्ती प्रत्येक माणसाच्या वेगवेगळ्या असणार. याशक्तीनुसार व गुणकर्मानुसार असणार, निपूणतेनुसार व स्वतःच्या आवडीनुसार प्रत्येक मानवालास्वतःचे काम ठरवण्याचा अधिकार आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही काम(कर्म) हलके नाही. त्याला आंतरिक मूल्य (Intrinsic Value) असते. म्हणून "कर्मदेव भव","योग कर्मस्तु कौशल्य" असे म्हटले आहे. या तत्त्वातर चातुवर्ण व्यवस्था उभी आहे.वेदकाळामध्ये हया चातुवर्ण व्यवस्थेचा उल्लेख आहे. श्रीमद्‌भगवद् गीतेतही अध्याय -४,श्लोक- १३ मध्ये स्पष्ट सांगितले आहे.

वर्णव्यवस्थेत उच्च -नीच अशा कल्पना निर्माण झाल्या. ब्राम्हणांना या व्यवस्थेत श्रेष्ठसमजले जाऊ लागले व शूद्रांना हलके समजले जाऊ लागले. यामुळे समाजात मोठ्या प्रमाणातदरी निर्माण झाली व जाती संस्था अस्तित्वात आली. कालांतराने जाती संस्थेत उपजाती,पोटजाती निर्माण झाल्या. परिणामी शूद्रानं, अस्पृश, समजले जाऊ लागले. भारतीयराज्यघटनेने ही अस्पृशता नष्ट करण्यासाठी भारतीय संविधानात कलम -१७ मध्ये अस्पृशतानिवारण करण्याचे प्रयत्न केले आहेत. त्याचप्रमाणे भारत सरकारने १९५५ पासून Prevention of untouchability offences Act हा कायदा पास करुन अस्पृशता पाळणे. हा कायदेशीर गुन्हा आहे असे ठरविले. या कायदयामध्ये पुढे १९७६ मध्ये सुधारणाकरुन त्याचे नाव Protection of Civil Right Act असे करण्यात आले. त्याचप्रमाणेअस्पृशांना उच्च वर्णीयांपासून संरक्षण मिळावे त्यांची पिळवणूक होऊ नये म्हणून संविधानाचेअनेक कायदे केले आहेत. अस्पृशता निर्मूलनाचे काम प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरानीकेले. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतीराव फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, सावरकरयांनीही मोठया प्रमाणावर प्रयत्न केले.

जातीभेदामुळे श्रेष्ठ व कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये कलह निर्माण होतअसतात. अंतर्गत कलहामुळे देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येत आहे. भारतामध्ये प्रामुख्यानेउत्तर भारतात अशा प्रकारच्या कलहाचे प्रमाण जास्त आहे. या कलहामध्ये किंवा दंगलीमध्येअनेक निरपराध लोकांचे जीवन उदध्वस्त होत आहे. त्याचप्रमाणे सामाजिक व वैयक्तिकमालमत्तेचीही हानी मोठ्या प्रमाणात होते. भारतामध्ये काही राजकीय पक्ष हे ठराविक जातींचेसंरक्षण करण्यासाठीच अस्तित्वात आले. सत्तेवर येईपर्यंत ह्या पक्षांनी जातींचा व त्यांच्याभावनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला, व सध्या करीत आहेत. फक्त राजकीय फायदाघेण्यासाठीच जातींचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. राजकीय पक्षांच्या या दुटप्पी धोरणांमुळेजाती -जातीमध्ये तणाव निर्माण होत आहेत. दंगली होत आहेत. परंतु राजकीय नेत्यांना त्याचेकाहीही वाईट वाटत नाही.

भारत सरकारने अस्पृश्यांना सवर्णा पर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षण, शासकीय उद्योगात,नोकरी, व विधान सभा, लोकसभेत राखीव, जागा ठेवून 'आरक्षण' जाहीर केले आहे. परंतुयाचा फायदा आर्थिक दृष्ट्या सबळ असणारेच मागासवर्गीय लोकांना मिळत आहे. जोआर्थिकदृष्ट्या अतिशय गरीब आहे तो हया सवलती पर्यंत पोहचतच नाही. निरक्षरता, गरीबी वअज्ञान इत्यादी कारणांमुळे हे लोक शासकीय मदतीपर्यंत पोहोचू शकत नाहीत व

शासकीयलोकही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. अशाप्रकारे सद्यपरिस्थितीमध्ये जाती संदर्भातील कल्पनापुढील प्रमाणे आहेत.

## ४.२ जाती आणि जाती संस्था यांची व्याख्या व वैशिष्टे

(१) जातीची व्याख्या - जातीच्या अनेक व्याख्या आहेत. परंतु संक्षेपाच्या दृष्टिकोनातूनखालील दोन व्याख्यांचा विचार करु.

१. नेशफिल्डयांची व्याख्या "a class of the communitywhich disowns any connection with any other class andcan neither intermarry nor eat nor drink with any butpersons of their own community".

२. डॉ. केतकर यांनी जातीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.
"a social group having two characteristics :i) Membership is confined to those who are born ofmembers and includes all persons so born :ii) The members are forbidden by an inexorable sociallaw to marry outside the group."
वरील व्याख्येवरुन जातीचे वैशिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतात.

**(२) जातीची वैशिष्टे :**

i)**स्तर (श्रेणी) :** सामाजिक व धार्मिक दृष्टिकोनांतून जातीचे स्तर किंवा श्रेणी आहेत.या श्रेणीच्या पिरॅमिड मध्ये सर्वात वर ब्राम्हण आणि पिरॅमिडच्या तळामध्ये हलक्याजातीतील लोक व पिरॅमिडच्या मध्ये हजारो प्रकारच्या जातीव पोटजाती दाखवल्याजातात.

ii) **वंश :** एखाद्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा(social status) तो ज्या जातीत जन्मघेतो. त्याच्यावरुन ठरतो. उदा. ब्राम्हण कुटुंबामध्ये जन्म झाल्यास ब्राम्हण आणिशूद्राच्या कुटुंबात जन्म झाल्यास शुद्र समजले जाते.

iii) **स्वजाती विवाह :** स्वतःच्याच जातीत विवाह केला जातो.भूतकाळामध्ये आंतरजातीय विवाहास अतिशय विरोध होता.

iv) **सामाजिक गट :** प्रत्येक जात म्हणजे एक सामाजिक गट होय. त्याचा नेतृत्व त्यांच्यानेत्याकडून केले जाते. एखादयाने त्यांच्या जातीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास नेतात्यांना शिक्षा म्हणून एखादे काम करुन घेणे, शारिरीक शिक्षा, किंवा त्या व्यक्तीलाबहिष्कृत म्हणजेच वाळीत टाकले जाते. इत्यादी प्रकारच्या शिक्षा होत असत.

v) **स्थानिक गट :** संपूर्ण देशांमध्ये जातीचे मूल्य एकसारखे नाही उदा. एखादया विशिष्टप्रदेशामध्ये अस्पृश मानलेल्या जातीस दुसऱ्या एखादया प्रदेशामध्ये त्याच जातीसअस्पृश मानले जात नाही.

munotes.in

vi) **परंपरागत व्यवसाय :** जुन्या जातीसंस्थेमध्ये व्यवसाय मागील पिढीकडून पुढीलपिढीकडे हस्तांतरीत होत असे. उदा. व्यापार करणाऱ्याचा मुलगा हा व्यापारच करीतअसे. सुतार (carpenter) काम करणाऱ्याचा मुलगा हा सुतार कामच करत असे इत्यादी.

vii) **प्रदूषित शुध्द सिध्दांत :** परंपरागतजाती -जाती मधील संबंध 'प्रदूषित आणि शुध्द' या संकल्पनेनुसार असत. परंपरागतखालची जात वरील जातीस प्रदूषित करते, अशी संकल्पना होती.अस्पृशतेला आधारअसलेली हीच संकल्पना आहे. खालच्या जातीतील लोकांना शाळा मंदिर, विहिरीइत्यादी सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नसे.

viii) **अन्नाच्या सवयी :** अन्नाच्या सवयी संदर्भात काही बंधनेअसत. उदा. शुध्द ब्राम्हणांनी मांसाहार करायचा नाही. दारुप्यायच नाही इत्यादी. एका जातीतील दुसऱ्या जातीमध्ये जेवत नसत. विशेषतः वरच्या जातीतील खालील जातीमध्ये जेवत नसत.वरीलप्रमाणे जातीचे वैशिष्टे आहेत. परंतु सध्याच्या काळामध्ये वरील वैशिष्ट्यामध्येकाही प्रमाणात शिथिलता आलेली दिसून येते.

(३) **जाती संस्थेची व्याख्या :** जाती संस्थेचीव्याख्या पुढीलप्रमाणे केली जाते -

"It is a system of social stratification and social restriction inIndia in which communities are defined by thousands ofendogamous hereditary groups called Jatis."या व्याख्येवरुन जाती या जातीसंस्थेचे भाग किंवा एकक (part or unit) असल्याचे लक्षात येते.

(४) **जाती संस्थेची वैशिष्टे (Characteristics of the caste system) :**

i) **समाजाची विभागीय वाटणी :**

जाती संस्थेच्या अंतर्गत भारतीय समाज छोट्या छोट्या सामाजिक गटांमध्ये विभागलागेला आहे, त्यास जाती, असे म्हटले जाते. सद्य परिस्थितीमध्ये जात ही जन्मावरुनठरते. त्यामुळे एका जातीतून दुसऱ्या जातीमध्ये जाता येत नाही. असे समजले जाते.प्रत्येक जातीला स्वतःचा परंपरागत सामाजिक स्तर, व्यवसाय, चालीरीती, नियमइत्यादी असतात. असे मानले जाते.

ii) **श्रेष्ठ कनिष्ठ स्तर :** प्रत्येक भाषिक क्षेत्रामध्ये सुमारे २०० जाती आहेत. त्यातीलकाहींना श्रेष्ठ, काहींना कनिष्ठ समजले जाते, त्यावरुन त्यांचा क्रम लावला जातो.

iii) **नागरी आणि धार्मिक विशेष हक्क आणि अपात्रता संदर्भातील भेद :** जातीच्याआधारावर निर्माण झालेल्या समाजामध्ये विशेष हक्क (Privileges) आणि अपात्रता (Disabilities) यांचे असमान वितरण असते. उच्च जातीतील लोक विशेष हक्काचेसुख अनुभवत असतात. तेव्हा हलक्या जातीतील समजले जाणारे लोक निरनिराळयाअपात्रतेचा दुबळेपणाचा त्रास सहन करत असतात.

iv) **मुक्तपणे व्यवसाय निवडण्याचा अभाव :** व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. ज्ञाती संस्थेतील प्रत्येक जातीचा परंपरागत व्यवसाय ठरलेला असे. वंश परंपरागत हाव्यवसाय त्याच जातीतील मागील पिढीतून हा व्यवसाय त्याच जातीतील मागीलपिढीतून पुढील पिढीकडे हस्तांतरीय होत असे. वंश परंपरागत चालत आलेलाव्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करता येत नसे.

**आपली प्रगती तपासा .**

प्रश्न – जातीची व्याख्या सांगून जातीचे वैशिष्ट्ये सांगा.

प्रश्न – जातीसंस्थेची व्याख्या सांगून जाती संस्थेची वैशिष्ट्ये सांगा.

## ४.३. जाती संस्थामुळे निर्माण होणारी असमानता (Inequalities causedby the caste system)

जाती संस्थामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी प्रकारची असमानतासमाजामध्ये निर्माण होते. समाजामध्ये निर्माण होणारी असमानता पुढीलप्रमाणे सांगतायेते.

i) **सामाजिक दर्जातील असमानता -** जातीसंस्थामध्ये श्रेष्ठ आणि कनिष्ठ याप्रकारचेस्तर असल्यामुळे कनिष्ठ जातीतील, हलक्या जातीतील लोकांना सामाजिक दर्जेचा (social status) आनंद अनुभवता येत नाही. खालच्या जातीतील माणसाला नेहमीत्यांच्या निम्न स्तराची (lower position) आठवण करु दिली जाते. अशाप्रकारच्या वागणूकीमुळे खालच्या जातीतील लोकांचा त्यांचा स्वतःवरील विश्वासनाहीसा होतो. आत्मविश्वासाच्या अभावामुळे इतर जातीतील लोकांशी मुक्तपणे स्पर्धाकरण्यास असमर्थ ठरतात, त्यामुळे इतर अनेक प्रकारच्या असमानता निर्माण होतात.

ii) **जातीतील असमानता (Inequalities with in caste) :-** प्रत्यक्ष एकाजातीमध्ये ही असमानता दिसून येतो. यामुळे उपजति व पोटजाती निर्माण झालेल्यादिसून येतात यांचा परिणाम म्हणून समाज अने छोट्या -छोट्या विभागामध्ये, अंशामध्येविभागला जातो. आणि उपजाती व पोटजातीमुळे एकाच जातीतील लोक एकमेकांपासूनदूर जातात.

iii) **साक्षरतेमधील असमानता (Inequlities in Literacy) :** जरी देशांतीलएकूणात साक्षरतेचा दर वाढलेला आहे. तरीसुध्दा अनुसुचित जाती व जमातीतील लोकशिक्षणांच्या संदर्भातील अनेक समस्यांना तोंड देत आहेत. अनुसूचित जाती -जमातीतील १९६१ मध्ये साक्षरतेचा दर १०.२७%असून तो २००१ मध्ये ४५.२०%इतका झालेला दिसून येतो. याचा अर्थ अजून ५५%अनुसूचित जाती जमातीतीललोक मूलभूत व आवश्यक भौतिक विकासाच्या घटाकांपासून वंचित आहेत.

iv) **प्राथमिक शिक्षण (Primary Education) :** प्राथमिक शाळेत सर्वच्या सर्वयेण्याच्या दृष्टीकोनांतून आपला देश वाटचाल करीत आहे. प्राथमिक शाळेत नावनोंदवण्याचे प्रमाण २००३ -२००४ मध्ये ९०%होते आणि २००४ -२००५ मध्ये ते९८%इतके झाले. हे प्रमाण वाढण्यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत उदा.मुलांना दुपारचे जेवण, एकदिवस आड शाळा उघडणे. तसेच शिक्षक व पालक संघटनाप्राथमिक शाळेत नाव नोंदणीचे हे विधायक विकास दिसत असला तरी सुध्दा अनेकअनुसुचित जाती -जमातीतील मुले शाळेपासून दूर आहेत. अनुसूचित जातीजमातीतील ७ ते १७ वर्ष वयोगटातील फक्त ६५.७%मुले फक्त शाळेत जातात. याचवयोगटातील उच्च वर्णातील प्रमाण ८१.३%इतके आहे. अनुसूचीत जाती जमातील२०.८%मुले शाळेत केव्हाच जात नाहीत, हेच उच्च जातीतील प्रमाण ७.६%इतकेआहे. भारतामध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा यांचे प्रत्यक्ष अंतर घरांपासून जास्तआहे. मुले शाळेत जाण्यास हाही एक अडथळा आहे. अनुसूचित जाती जमातीतीललोकांची घरे गावांपासून दूर असतात, किंवा गावाच्या एका टोकाला असतात.त्यामुळेही अनुसूचित जाती-जमातीतील मुले शाळेत कमी प्रमाणात जातात. या भौतिकअंतरा बरोबर सामाजिक अंतर (Social Distance) सुद्धा ही अनुसूचित जातीजमातीतील मुले शाळेत न जाण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

v) **गरीबी :** अनुसुचित जाती -जमातीतील लोकांची मिळकत अतिशयकमी आहे. सन २००० मध्ये ग्रामीण भागामध्ये ३८%अनुसूचित जाती -जमातीतीललोक दारिद्रय रेषेखाली होते, त्यावेळी इतर जातीतील २०%लोक दारिद्रय रेषेखालीहोते. अशा प्रकारे मिळकतीती ही असमानता आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - जाती संस्थामुळे निर्माण होणारी असमानता स्पष्ट करा.

## ४.४ जातीवादाचे परिणाम (CONSEQUENCES OF CASTEISM)

- समाजामध्ये हिंसाचार बोकाळतो आणि कायदे हीन होतात.
- सर्वसामान्य आणि मागास लोकांचे जीवन उध्दवस्त होते आणि त्यांच्या संपतीचीही हानी होते.
- उच्च जातीच्या ऑफिसरने मागासवर्गीय व्यक्तींना त्यांचे विशेषाधिकार देण्याचे अमान्यकेल्यास मागासवर्गीय व्यक्तींच्या मनात सूडाची भावना तयार होते व कलह निर्माण होतो.
- मागासवर्गीय लहान किंवा अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्ज देण्यास नकार देण्याचे उच्चजातीय बँक अधिकारी भारतातील विविध भागात आजही आहेत. त्यामुळे तणावाचीपरिस्थिती निर्माण होते.
- अनेक मागावसवर्गीय व्यक्ती देशात अपमानास्पद वागणूक सहन करुन जीवन जगत आहेत.
- मागासवर्गीय अनेक मुले ज्या ठिकाणी उच्च वर्गीय लोक मोठ्या प्रमाणावर पिळवणूककरतात तेथून शहाराकडे धाव घेत आहेत. त्यामुळे शहरी जीवनावर ताण पडत आहे.
- शैक्षणिक व सामाजिक जीवनामध्ये उच्च वर्णीय लोक विविध प्रकारे मागासवर्गीयांवर दबावटाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळेही कलह निर्माण होत आहेत.
- मागासवर्गीय मुले व स्त्रिया यांची उच्च वर्णीय लोकांकडून मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होतआहे.
- जातीयवाद अनेक राजकीय नेत्यांना विधानसभा व लोकसभेपर्यंत पोहोचविण्यासाठी मदतकरतात. हेच आमदार व खासदार जातीय तणाव वाढविण्यास नंतर कारणीभूत ठरतात.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : जातीवादाचे परिणाम स्पष्ट करा.

munotes.in

## ४.५ जातीवादाचे निर्मूलन करण्याकरिता उपाय (MEASURES TO RESOLVE CARTELISM)

**जातीवादाचे निर्मूलन करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना केल्यास निश्चितच त्याचे प्रमाण कमी होऊन कलह निर्माण होणार नाहीत.**

(१) **कणखर राजकीय धोरण :** जातीय पक्ष, जातीय संघटना किंवा जातीय संस्था यांच्याकृत्यांना पायबंद घालण्यासाठी कणखर राजकीय धोरण असले पाहिजे. सत्ताधारी पक्षांनीकिंवा राज्यकर्त्यांनी जातीयवादाला पांघरुन घालू नये. किंवा जातीवाद स्वतःच निर्माणकरु नये. धर्मातील राज्याच्या भूमिकेच्या प्रामाणिकपणे अवलंब केला पाहिजे.

(२) **कडक कायदे व त्यांची अंमलबजावणी जातीय :** वाद निर्माण करणाऱ्या विरुध्दकडक कायदे तयार केले पाहिजे. नुसतेच कागदोपात्री कायदे नकोत तर त्यांचीअंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांना योग्य ते अधिकार देऊन त्यांना जबाबदार धरण्यातयावे. यामुळे समाजात जातीय कलह होणार नाहीत आणि झालेच तर ते नियंत्रणाबाहेरजाणार नाहीत.

(३) **शैक्षणिक व्यवस्थेत बदल :** संकुचित धर्म भावनांना थारा मिळणार नाही अशा प्रकारेसध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेत बदल करुन, समभावाची शिकवण रुजली गेली पाहिजे.विशाल मानवतावादी धर्माची शिकवण दिली तरच परस्परांत सहकार्याची भावना निर्माणहोईल व कलह थांबतील.

(४) **राष्ट्रनिष्ठा प्रबळ करणे :** विविध धर्मिय, विविध जातीय, लोक भारतात असले तरीआपण सर्व एकाच भारतीय संस्कृतीचे वारसदार आहोत अशा प्रकारची प्रबळ राष्ट्रीयनिष्ठेची भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात दृढ करण्यास हवी.

(५) **कार्यक्षम सरकारी यंत्रणा :** घातक अशा जातीयवादी शक्तींना तोंड देण्यासाठी कार्यक्षमकिंवा सक्षम सरकारी यंत्रणेची गरज आहे. त्याचप्रमाणे या नियमांचे पालन न करणाऱ्याअधिकाऱ्यांना कडक शिक्षा देण्यात यावी. अनेक पोलीस अधिकारी त्यांची कर्तव्येकार्यक्षमपणे बजावत नाहीत अशावेळी निवृत्ती नंतरचे फायदे देऊ नयेत. अशा कडककार्यवाहीची तरतूद असेल तरच अशा गोष्टींना पायबंद बसेल.

(६) **धर्मगुरुंची जबाबदारी :** विविध धर्मगुरु किंवा जातीयवादी प्रांतीय नेतृत्व यांची जबाबदारीफार मोठी आहे. या नेतृत्वाने समाजाला धर्माच्या मूलभूत विश्वबंधुत्वाच्या तत्त्वावरशिकवण दिली पाहिजे. धर्माची आदर्श तत्वे समाजात रुजविली पाहिजेत. धर्मद्वेष वाढेल,तणाव निर्माण होईल अशा घटकांना निष्प्रभ करण्यासाठी उदात्त विचारांची शिकवणस्वतःच्या आचरणाने लोकांना दिले पाहिजे.

(७) **प्रसार माध्यमांची भूमिका :** समाजातील विविध घटाकांमध्ये निसांप्रदायिकताची भावनारुजविण्यात प्रसारमाध्यमे मोठया प्रमाणात कार्य करु शकातात. निरनिराळ्या धर्मावरआपली पोळी भाजणाऱ्या राजकीय नेत्यांचे ढोंग समाजासमोर दाखवू शकतात.समाजामध्ये

munotes.in

जातीवादाचे हळूहळू बीजा रोपन करणाऱ्या नेतृत्वाचा, पडदा फाडण्याचे कार्यप्रसारमाध्यमांनी करावे.

(८) **समाज जागृती :** सरकारी यंत्रणेबरोबरच अशासकीय संघटना व स्वंयसेवी संघटनायांनीही समाजजागृती मोठ्या प्रमाणावर करावी. जातीयवाद याविषयी कलह निर्माण होणारनाही यासाठी वारंवार तेच तेच प्रयत्न पुन्हा-पुन्हा करुन लोकांच्या मनावर बिंबवले पाहिजे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - जातीवादाचे निर्मूलन करण्याचे उपाय सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.६ जमातवादामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह)

## (INTER –GROUP CONFLICTS CAUSED DUE TO COMMUNALISM)

राष्ट्रीय ऐक्य जाणीवपूर्वक टिकवावे लागते. कारण सर्वसाधारणपणे असे होते कीआपत्तीच्या किंवा संकटाच्या वेळी माणसे एकत्र येतात. परस्परांना मदत करतात. परंतु आपत्तीटळली की व्यक्ती पुन्हा आपल्यापुरता विचार करायला लागतात. इतरांच्या हिताचा त्यांना विसरपडू लागतो. आपलाच स्वार्थ ते पाहू लागतात. धर्म, भाषा, प्रदेश या संकुचित आधारावर काहीमाणसे स्वार्थाचे राजकारण करु लागतात. यातूनच निरनिराळया प्रकारच्या वादाचे प्रश्न उभेराहतात. यातीलच एक जमात वाद होय.

जमातवाद देशापुढील मोठे आव्हान आहे. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवादनिर्माण होतो. ब्रिटीशांनी आपल्या देशात जमातवादाचे बीज पेरले. वर्षानुवर्षे विविध धर्माचे लोकभारतात गुण्यागोविंदाने राहत आहेत. परंतु जेव्हा धर्माच्या अभिमानाचा अतिरेक होतो तेव्हा त्याचेदुराभिमानात रुपांतर होते आणि यातूनच धर्मांधता निर्माण होते.

धर्मांधता हा जमात वादाचा पाया आहे. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रीय हिताचा विसरपडतो. भिन्न धर्मीयांचा एकमेकांवरचा विश्वास उडतो. काही लोक आर्थिक आणि सामाजिकप्रश्नांचा विचारही आपापल्या धर्माच्या चौकटीतच करु लागतात. अशा अवस्थेत ते लोकधर्माविषयी, धर्म बांधवाविषयी अतिशय हळवे बनतात. आपल्या धर्माबददल कोणी काही बोललेकिंवा धर्माचा अपमान केला तर दंगली पेटतात. शेकडो निरपराध लोक मारले जातात.कोट्यावधी रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. सार्वजनिक शांतता नष्ट

होते.या सर्व परिस्थितीमध्ये राजकीय पक्ष धर्माधर्मात संघर्ष (कलह) निर्माण करण्याचे कामकरीत आहे. उदा.राम जन्मभूमी, बाबरी मशीद, गुजरात गोध्रा रेल्वे जाळपोळ २००२ या सर्वदंगली धर्माच्या चिथावणीतून झाल्या आहेत. भारतामध्ये सर्वात मोठा व भयानक संघर्ष हिंदू-मुस्लिम या दोन धर्मात स्वातंत्र्यापासूनच सुरु आहे. त्याचबरोबर हिंदू -शीख, हिंदू -ख्रिश्चनइत्यादी धर्मामध्येही नेहमी संघर्ष निर्माण होत असतात. २६ /११ च्या मुंबईवरील दहशतवादीहल्लाने तर राष्ट्रीय एकात्मतेलाच सुरंग लागला आहे. देशातील नव्हे तर जगातील शांतताच लोपपावत आहे.

**जमातवादास कारणीभूत घटक :** पुढील कारणांमुळे जमातवाद निर्माण होतो.

(१) **धर्मांधता** धर्मांधता हा जमातवादाचा पायाच आहे. धर्म निष्ठा व धर्मश्रध्दा अत्यंतआवश्यक आहे. सर्वधर्म समानतेचा संदेश देतात. परंतु याचा अतिरेक झाल्यासधर्मांधतेचा जन्म होतो. धर्म ही अफूची गोळी ठरते. त्यातूनच तणाव निर्माण होतात.थोडक्यात धर्मांधतेचा अतिरेक हे जमातवादाचे प्रमुख कारण आहे.

(२) **संस्कृती** सर्व धर्मांना स्वतःची परंपरा व संस्कृती आहे. विविध धर्मातील व प्रांतातीललोक आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. संस्कृती टिकवितानासंस्कृती -संस्कृतीत संघर्ष निर्माण होतात. म्हणजेच जमातवाद निर्माणहोतो.

(३) **राजकीय** धर्माभावना व संस्कृती स्वतःहून संघर्ष निर्माण करीत नाहीत. तर त्यांचाअतिरेक तणावाला कारणीभूत ठरतो. राजकीय सत्तांध, संधिसाधू खुर्ची मिळवण्यासाठीधर्माचा व संस्कृतीचा उपयोग करतात व माणसांमाणसातील द्वेष वाढवून दंगली घडवूनआणतात. संधीसाधू राजकीय नेते आपल्या जातीवर व समाजावर टिकून राहावे यासाठीजातीय भावनांना खत पाणी घालतात.

(४) **आर्थिक** काही लोक आर्थिक प्रश्नांचा विचारही आपापल्या धर्माच्या चौकटीतच करुलागले आहेत. आपण ठराविक धर्माचे असल्याने राजकारणात प्रभावशून्य आहोत, त्यामुळेठराविक प्रदेशाचा आर्थिक विकास करु शकत नाही. यासाठी दुसऱ्या जमातीच्या आर्थिकहितसंबंधाचा बळी देऊनच आपण आपला विकास करु शकतो. असे सांगून जातीयभावनांना प्रोत्साहन दिले जाते. व त्याचा स्वार्थासाठी उपयोग केला जातो.

(५) **भाषा** भारत हा विविध भाषिक प्रदेश आहे. भारतामध्ये १६५२ भाषा बोलल्या जातात.प्रत्येकजण आपापल्या भाषेशी भावनिकरित्या गुंतलेल्या असतो. अनेकदा भाषा भेदामुळेचप्रादेशिक भावना किंवा जमातीबददलच्या भावना उफाळून येतात व संघर्ष निर्माण होऊशकतो.

(६) **जातीय वादांचा उदय** भारतात अनेक धार्मिक गट आहेत. त्या प्रत्येक धर्मात अनेकजाती, पोट जाती आहेत. यां सर्वांमध्ये भेद निर्माण करण्याचे काम राजकारणी करतात.राज्यकर्त्यांच्या या भेदनीतीमुळे संघर्ष होतात.

(७) **इतर घटक :** इतरही काही घटक जमात वादास कारणीभूत ठरतात. ते पुढीप्रमाणेआहेत.

प्रशासन आणि कायदा सुव्यवस्था कुचकामी ठरते तेव्हा राजकीय लोकांच्या यात्रा,पदयात्रा इत्यादी.

- राजकीय लोकांची भडक भाषणे.
- प्रादेशिक समस्यांची भांडवल करणे.
- स्वार्थासाठी भावना भडकविणे (राजकीय) इत्यादी. वरील जमातवादामुळे उदभवणारे संघर्ष(कलह) टाळण्यासाठी पुढील गोष्टी आपण करायला पाहिजेत.
- आपण प्रथम राष्ट्राशी निगडीत आहोत नंतर धर्म, जात, भाषा ही जाणीव प्रत्येकाला करुनदेणे. म्हणजेच आपली निष्ठा प्रथम राष्ट्रांशी आहेत. धर्म, जात, भाषा, यांना दुय्यम स्थानआहे.
- जातीय शक्तीविरुध्द लढा देण्यासाठी राजकीय पातळीवर प्रभावी प्रचार मोहिम आखलीपाहिजे
- शैक्षणिक व्यवस्थेत बदल करुन राष्ट्रीय एकात्मतेचे वातावरण सुदृढ करण्याचा प्रयत्नकेला पाहिजे. यासाठी विविध धार्मियांमध्ये विश्वास व सहकार्य निर्माण करण्याचे कामशैक्षणिक उपक्रमाद्वारे करणे गरजेचे आहे.
- जातीय संघर्ष निर्माण करणाऱ्या जातीयवादी शक्तीचा शोध घेऊन त्यांचा पांथिकपणासमाजासमोर उघडा पाडला पाहिजे आणि अशा घातक शक्तींचा मुकाबला करण्यासाठीसरकारी यंत्रणे बरोबरच स्वयंसेवी संस्थानेही पुढाकार घेतला पाहिजे.
- धर्मावर ज्या व्यक्तीचे (राजकीय व धर्मगुरु) नियंत्रण आहे. अशा व्यक्तींवर महत्त्वाचीजबाबदारी येते ती म्हणजे सर्व धर्म समान आहेत ही शिकवण धार्मिक प्रवक्ते किंवा धर्मगुरुयांनी चांगल्या रीतीने सांगायला हवी.या गोष्टी आपण सर्वांनी मिळून केल्यास निश्चितच संघर्ष (कलह) नष्ट होतील.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - जमातवाद म्हणजे काय ते सांगून जमातवादास कारणीभूत असणारे घटक
स्पष्टी करणासह सांगा.
प्रश्न - जमातवादामुळे किंवा परस्पर गटांतील संघर्ष (कलह) सविस्तर स्पष्ट करा.

## ४.७ सारांश

मानव हा समाजशील प्राणी असल्याने तो समाजात एकत्र राहतो. सुदृढ समाजासाठी समाजातील मानवा-मानवांमध्ये परस्पर संबंध आत्मयितेचे असणे गरजेचे आहे. समाजातील या

एकोप्याच्या संबंधामुळे व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. परंतु आज राष्ट्रीय एकात्मतेपुढे अनेक प्रकारची आव्हाने निर्माण झाली आहेत.

आपल्या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढे आज भाषावाद, प्रांतवाद, फुटीरतावाद, यासारखी आव्हाने कमी -अधिक प्रमाणात आहेत. परंतु यातील गंभीर आव्हान म्हणजे जातीवाद, जमातवाद आणि त्यांच्यातील परस्परातील संघर्ष (कलह) हे होय.

चातुवर्णव्यवस्था ही गुण कर्मानुसार होती. यामध्ये वर्ण जन्मावरुन ठरत नव्हता. कर्मामधील आवड व निपुणता यानुसार ठरत होती आणि महत्त्वाचे म्हणजे चातुवर्ण व्यवस्थेमध्ये सर्व कर्मांना समान आंतरिक मूल्य असल्याने कोणतेही काम श्रेष्ठ किंवा कनिष्ठ हा भेद नव्हता. परंतु जेव्हा वर्ण जन्मावरुन ठरु लागला आणि कमीमध्ये श्रेष्ठ -कनिष्ठ ही संकल्पना आणली गेली तेव्हा जातीभेद निर्माण झाले. यातून जातीवाद निर्माण झाला.

जातीवादामुळे अनेक प्रकारच्या असमानता निर्माण झाल्या. त्यामुळे जातीवादाचे परिणाम समाजांमध्ये अतिशय विपरित प्रकारचे झाले.

आपल्या देशांमध्ये जसे जातीवादामुळे समाजामध्ये अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या. त्याचप्रमाणे जमात वादामुळेही आपल्या देशांत अनेक प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे जातीवाद व जमातवाद हे आपल्या देशाला शाप आहेत. निरनिराळे राजकीय गट जातीवाद आणि जमातवाद नष्ट करण्याऐवजी त्यांना स्वतःच्या स्वार्थासाठी खतपाणीच घालतात.

ही समस्या निघून जाण्यासाठी आपण प्रथम राष्ट्राशी निगडीत आहोत नंतर धर्म, जात, भाषा. ही जाणीव प्रत्येकाला करुन देणे आवश्यक आहे. म्हणजेच आपली निष्ठा प्रथम राष्ट्राशी आहे. धर्म, जात, भाषा यांना दुय्यम स्थान आहे. याची जाणीव प्रत्येकाला असणे अत्यंत आवश्यक आहे.

## ४.८ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

(१) जातीची व्याख्या सांगून जातीचे वैशिष्टे सविस्तर स्पष्ट करा.
(२) जातीसंस्थेची व्याख्या सांगून जातीसंस्थेची वैशिष्टे सविस्तर स्पष्ट करा.
(३) जातीसंस्थामुळे निर्माण होणारी असमानता सविस्तर स्पष्ट करा.
(४) जातीवादाचे परिणाम स्पष्ट करुन जातीवादाचे निर्मूलन करण्याकरिताचे उपाय सविस्तर सांगा.
(५) जातीसंस्थामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह) स्पष्ट करा.
(६) जमातवाद म्हणजे काय? ते सांगून जमातवादास कारणीभूत असणारे घटक सविस्तर सांगा.
(७) जमात वादामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह) सविस्तर स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक -५

## प्रदेशवाद, भाषिक भिन्नता आणि संघर्ष

## (Regionalism, Lingustic Differences and Conflicts)

**पाठाची रचना :**


५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ प्रदेशवादाचा अर्थ आणि विकास
५.३ प्रदेशवाद आणि भाविक संघर्ष वाढण्याची कारणे
५.४ प्रदेशवादाचे संघर्ष
५.५ प्रदेश वादचे संघर्ष कमी करण्यासाठी उपाय
५.६ भाषावाद
५.७ भाषिक संघर्ष
५.८ भाषिक संघर्ष कमी करण्याचे उपाय
५.९ प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम
५.१० सारांश
५.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न


### ५.० उद्दिष्टे

- प्रदेशवादाला अर्थ आणि विकास समजातून घेता येईल.
- प्रदेश वादामुळे निर्माण होणारे संघर्ष व त्यावरील उपाय जाणून घेता येतील.
- भाषिक संघर्ष व त्यावरील उपाय जाणून घेता येतील.
- प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम अभ्यासता येतील.

### ५.१ प्रस्तावना

भारतीय राजकारण शास्त्रामध्ये भारताला स्वातंत्र्यतेची पहाटेपासून प्रदेश वादालामहत्त्व प्राप्त झालेले आहे. तथापि १९६० आणि १९७० च्या उत्तरार्धातइतर प्रदेशांपासून वेगळे होण्याची संकुचित मागणीसाठी दावा करु लागले आणि स्वतंत्र्यराज्यकारभार करण्याची इच्छा तीव्र होऊ लागली. या दोन्ही गोष्टी देशाच्या एकतेला धोकानिर्माण करणाऱ्या गंभीर स्वरुपाच्या धक्कादायक होत्या. प्रदेशवादामुळे राष्ट्राची एकात्मतादुंभगली जाते.

## ५.२ प्रदेशवादाचा अर्थ आणि विकास (MEANING ANDDEVELOPMENT OF REGIONALISM)

प्रदेशवाद म्हणजेच प्रांतवाद होय. आपल्या प्रदेशाविषयी अवाजवी स्वरुपाची अभिमानबाळगणे होय. उदा. मी मराठी मी गुजराथी अशी आपली ओळख सांगणे इथपर्यंत ठीक आहे.परंतु मी गुजराथी म्हणून मी इतर प्रांतीयांपेक्षा श्रेष्ठ आहे. अशी भावना किंवा समज होणे हाअवाजवी प्रांताभिमान होय. या अवाजवी प्रांताभिमानामुळे प्रदेशवाद निर्माणहोतात.

विकासातील असमतोलपणामुळे प्रदेशवाद निर्माण होतात. ब्रिटिश राजवटीमध्येच भारताच्या आर्थिक विकासात असमतोल निर्माण झाला. स्वांतत्र्यानंतरही काही राज्यांची प्रगतीअधिक झाली. किंवा काही राज्ये आर्थिक दृष्ट्या मागासच राहिली. उदा. महाराष्ट्र, गुजरात,पंजाब, तामिळनाडू ही राज्ये आर्थिक व औदयोगिक दृष्ट्या बरीच विकसित झाली, तरओरिसा, बिहार, आसाम सारखी राज्ये आर्थिक तसेच औदयोगिक दृष्ट्या अप्रगत राहिली.आर्थिक विकास व सुधारणा हा प्रगतीचा पाया असल्याने ज्या राज्यात आर्थिक विकास होतो तीराज्ये शिक्षण, आरोग्य किंवा इतरही क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रगती करु शकतात. ज्याराज्यांमध्ये अशा प्रकारचा विकास झालेला नसतो ती राज्ये मात्र शैक्षणिक तसेच नागरीसुविधांच्या बाबतीत खूपच मागे राहतात. प्रगत राज्यातील लोकांना उपलब्ध होणाऱ्या विकासाच्यासंधी अशा राज्यांना मिळत नाहीत. शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी, दारिद्र्य अशा प्रश्नांची तेगांजले जातात. आपली फसवणूक होत आहे. आपल्याला विकासाच्या लाभांपासून दूर ठेवले जातआहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. त्यामुळे राज्या-राज्यांतील सलोखा नष्ट होतो. हासलोखा नष्ट झाल्याने राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

प्रदेशवाद हा प्रगत आणि अप्रगत अशा दोनही प्रकारच्या राज्यांना झपाटू शकतो आपणप्रगत आहोत कारण, प्रगत असल्याने आपण श्रेष्ठच आहोत असा श्रेष्ठत्वाचा गंड विकसितराज्यांतील लोकांमध्ये निर्माण होतो आणि मग ते अविकसित राज्यांतील लोकांना कमी लेखूलागतात. आपल्या विकासाच्या लाभात त्यांना वाटेकरु करुन घेण्यास त्यांची तयारी नसते. तरमागास भागातील लोकांना आपली संघटीत शक्ती उभी करण्यासाठी प्रादेशिक अस्मिता जागवावीलागते यातूनच प्रदेशवाद बळवतो. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्यास बाधा येते. तसेच लोकशाहीची वाढहीहोऊ शकत नाही.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - प्रदेशवादाचा अर्थ आणि विकास सविस्तर स्पष्ट करा.

## ५.३ प्रदेशवाद आणि भाविक संघर्ष वाढण्याची कारणे (CAUSES FORGROWTH OF REGIONALISM)

भारतामध्ये प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष वाढण्याची कारणेअनेक आहेत. या ठिकाणी नमूद करण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रदेशवाद आणि भाषिकसंघर्ष हे हातात हात घालून चालतात, म्हणजेच प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष वाढण्याची कारणेएकच आहेत.

### (१) भाषा किंवा संस्कृती माथी मारण्याच्या, विरुध्द प्रतिक्रिया (Reactionagainst imposition language or culture)

राष्ट्रीय सरकारने देशांतील सर्व लोक आणि गटांसाठी विशिष्ट प्रकारची आदर्शत्मककल्पना, भाषा आणि संस्कृती माथी मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला प्रतिक्रीया म्हणूनप्रदेशवाद प्रथमतः या ठिकाणी दिसून येऊ लागला. अशा प्रकारेदक्षिणेकडील राज्यांनी हिंदी या भाषेला कार्यालनीन भाषा म्हणून विरोध केला कारण त्यांनाउत्तरेकडील राज्ये आपल्यावर वर्चस्व गाजवतील या गोष्टींची भिती होती.

### (२) प्रदेशाकडे दुर्लक्ष (Neglect towards Region) :

सत्ताधारी पक्षाचे म्हणजेच सरकारचे एखाद्या प्रदेशांकडे नेहमी दुर्लक्ष असते आणिदुसऱ्या एखादया प्रदेशाकडे नेहमी प्रशासकीय आणि राजकीय सत्तेच्या दृष्टिकोनांतून नेहमी लक्षकेंद्रित केलेले असते. तेव्हा दुर्लक्षित प्रदेशांतील लोक वेगळे होऊन राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरणकरण्याचा प्रयत्न करतात. यातूनच प्रदेशवाद उभा राहतो.

### (३) उप संस्कृती जतन करण्याची इच्छा (Desire to pre serve subcultures)

भारतीय संघ राज्य व्यवस्थेमध्ये स्वतःची उप-संस्कृती जतनकरुन ठेवण्याच्या हेतूने स्वतःचे सरकार स्थापून स्वतंत्रराज्यकारभार करण्याची इच्छा प्रदेशवादाला जन्म देते.

### (४) प्रादेशिक पक्षाची इच्छा (Desire of regional parties)

काही प्रादेशिक पक्षांच्या सत्ता हस्तगत करण्यांच्या इच्छेतून प्रदेशवाद(Regionalism) उदयास येतो उदा. AIADMK, अकाली दल (Akali Dal) तेलगू देशम (Telagu Desham) इत्यादी राजकीय पक्षांनी राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठीप्रदेशवादाला उत्तेजन दिले.

### (५) गटांच्या हितसंबंधाची ओळख राष्ट्रीय हितसंबंधाशी जोडण्यात अपयश (Failure to identify group interests with nationalInterests)

साठ वर्षाच्या स्वातंत्र्या नंतरही अनेक प्रकारच्या वेगवेगळया गटांना स्वतःच्या गटाच्याहितसंबधाची ओळख राष्ट्रीय हितसंबंधाशी जोडण्यात अपयश आले आहे. याचा परिणाम म्हणूनप्रदेशवाद टिकून राहिला आहे. हे गट स्थानिक आणि संकुचित हेतूने विचार करतात व स्वतःच्यागटालाच अग्रस्थान देतात. त्यांना असे वाटते की आपली ओळख मोठ्यादेशांच्या हितसंबंधाशी जोडल्यास आपल्या स्वतःच्या गटाचे अस्तित्त्व नष्ट होईल आणि आपल्यागटाला जगण्यासाठी धोका निर्माण होईल. या प्रकारच्या विचारामुळे प्रदेशवाद तसाच टिकूनराहतो.

munotes.in

**(६) मागासलेल्या प्रदेशांतील वाढती जाणीव (Growing awareness ofbackward region)**

मागासलेल्या प्रदेशांतील मागासवर्गीय लोकांच्या बरोबर नेहमी सापत्नभावठेवण्यात आलेला असल्यानेही प्रदेशवादाला चालना मिळालेली आहे.स्थानिक राजकीय नेते यांचा पुरेपुर फायदा घेतात. ते लोकांना नेहमी सांगत असतात की केंद्रीयसरकार सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून जाणून बूजून आपल्या प्रदेशाकडेदुर्लक्ष करुन प्रादेशिक असमानता मुद्दाम निर्माण करत आहे. राज्य सरकारची सुध्दा हीचभूमिका आहे. अशा प्रकारे स्थानिक राजकीय नेते त्यांचे वर्चस्व टिकण्यासाठी प्रयत्न करतात.यामुळेही प्रदेशवाद निर्माण होतो.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष वाढण्याची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ५.४ प्रदेशवादाचे संघर्ष (CONFLICTS OF REGINALISM)

जेव्हा एका प्रदेशांतील हितसंबधाला देश किंवा दुसऱ्या एखादया प्रदेशांकडून विरोधहोतो. तेव्हा प्रादेशिक संघर्ष निर्माण होतात. तीव्र प्रकारचे प्रादेशिक संघर्ष निर्माण होतात. तीव्रप्रकारचे प्रादेशिक संघर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

(१) **भारतीय संघातून बाहेर पडण्याची मागणी (Demand for secessionfrom the Indian union)**

भारतीय संघातून बाहेर पडण्याची मागणी ही प्रदेश वादाची शेवटच्या टोकाची भूमिकाआहे. तामिळनाडूमध्ये DMK, पंजामध्ये अकालीदल (Akali Dal), उत्तर - पूर्वभारतातील मिझोस आणि नागस् (Mizos and Hagas), खलिस्तान चळवळ (Khalistan move ments) इत्यादींनी भारतापासून काही प्रदेशांना वेगळेकरण्यासाठी मागणी केलेली होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. परंतु प्रदेशांनाभारतापासून वेगळे करणाऱ्या कोणत्याही चळवळीला यश आलेले नाही.

(२) **वेगळ्या राज्याची मागणी (Demand for separate state)**

काही क्षेत्रामध्ये लोकांनी त्यांची स्वतःची भाषा व संस्कृती विकसित केलेली आहे.त्याठिकाणी ते लोक स्वतंत्र वेगळया राज्याची मागणी करीत आहेत. त्या ठिकाणीप्रदेशवाद आढळत आहे. अशा प्रकारची मागणी मुख्यतः स्वतःची वेगळी राजकीयओळख निर्माण

करण्यासाठी करीत आहेत या प्रकारच्या प्रदेशवादामध्ये भाषेच्याआधारावर राज्याची फेररचना केली जाते.

(३) **विकासाच्या असमतोलपणामुळे मागणी (Demand due toimbalanced development)**

भाषेच्या आधारावर राज्यांची स्थापना मोठ्या प्रमाणावर झाली आहे. याचा परिणामम्हणून त्या राज्यामध्ये असंतुलित विकास झाला. साधनांचे असमान वितरण झाले.त्यामुळे काही उपप्रदेश अविकसित राहिले. हे अविकसित राहिलेले उपप्रदेश राज्यांचीस्वतंत्र्य मागणी करु लागले आहेत.

(४) **पूर्ण वाढ झालेल्या राज्याची मागणी (Demand for full- fledgedstate)**

राज्य फेर -रचना कायदा (state Reorganisation ACT) अस्तित्वातआल्यानंतर देशातi) घटक राज्य (states) आणिii) संघप्रदेश (the union Territories) असे दोन प्रकारचे विभग झाले. यापैकी संघप्रदेश (the union Territories) यांच्या पूर्ण वाढ झालेल्या राज्याच्या (Full fledged state) मागणीमध्ये प्रदेशवाद (Regionalism) दिसून येतो. काळाच्याओघात या संघ - प्रदेशाची मागणीची चळवळ अतिशय तीव्र झाल्याने हिमाचल प्रदेश,मनिपूर, त्रिपुरा, गोवा, मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश इत्यादी. संघप्रदेशांना (theunion Territories) यांना पूर्ण राज्यांचा दर्जा प्राप्त झाला.

(५) **आंतर राज्य सीमा वाद (Inter- state boundary disputes)**

अनेक ठिकाणी आंतर -राज्य सीमावाद असल्याने प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतात. उदा. पंजाब आणि हरियाना यांच्यामधील चंदीगड वरुन वाद आहे.महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा बेलगम् (Belgallm) वरुन वाद आहे. या ठिकाणीमराठी भाषिक आणि कन्नड भाषिक यांच्यातील वाद आहे. या शहरात मराठीभाषिकांची संख्या खूप आहे. इत्यादी अनेक प्रकारच्या वादामुळे प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतो.

(६) **आंतरराज्य पाणी वाद (Inter – state water disputes**)

पाणी वापराचा पहिला महत्त्वाचा वाद नर्मदा, कृष्णा आणि कावेरी या नदयांचा आहे.यामध्ये मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या राजांचा समावेश होतो.कृष्णा नदीच्या पाण्याच्या वितरणांवरून महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश याराज्यांमध्ये वाद आहे. कावेरी नदीच्या पाण्यावरुन तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटकया राज्यांमध्ये वाद आहे. वरील प्रकारच्या आंतर -राज्य पाणी वादावरुन प्रदेशवादनिर्माण होतो.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - निरनिराळे प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष सविस्तर सांगा.

___

___

___

___

munotes.in

## ५.५ प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष कमी करण्याचे उपाय (MEASURESFOR RESOLVING REGIONAL CONFLICTS)

प्रदेशवाद कमी करण्याचे उपाय पुढील प्रमाणे -

१. संघर्ष किंवा कलह निर्माण होणाऱ्या राज्यामध्ये सामंजस्याची व सहकाराची भावना निर्माणकरण्यासाठी राजकीय पक्ष, सामाजिक संस्था व प्रसार माध्यमांनी महत्त्वाची भूमिका पारपाडणे आवश्यक आहे.

२. आर्थिकदृष्ट्या व औद्योगिक दृष्ट्या भागास राज्यांसाठी विशेष सवलती देऊ करणे, सध्यासरकारचे अनेक मागास राज्यांसाठी कर सवलती व रोख सवलती दिल्या आहेत.

३. राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी भारत सरकारकडून शक्य तेवढेप्रयत्न होत आहेत. अजूनही जास्त प्रमाणात प्रयत्न व्हायला हवेत.

४. अप्रगत राज्यांवर केंद्र सरकार तसेच प्रगत राज्येही त्यांचे लक्ष केंद्रीत करुन त्यांच्याविकासास चालना देण्याचे प्रयत्न करत आहेत.

५. प्रादेशिक सहकार्याची भावना वाढीस लागण्यासाठी राज्याराज्यात सतत सांस्कृतिक वकिडाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

६. केंद्र सरकारकडून वितरीत केल्या जाणाऱ्या निधीचे वाटप योग्य प्रमाणात करुन त्यामध्येसमन्वयाची भूमिका केंद्र व राज्य सरकार निभावत आहेत.

७. महत्त्वाचे म्हणजे समर्थ नेतृत्व असेल तर प्रदेशवाद निर्माणच होणारनाही.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष कमी करण्याचे उपाय सांगा.

munotes.in

## ५.६ भाषावाद (LINQUISM)

भारत ही विविध भाषिक भूमी आहे. १६५२ भाषा भारतात बोलल्या जातात. त्यामुळेमोठ्या प्रमाणावर भाषावाद निर्माण होतात. याचा विचार करुन भारतामध्ये भाषावर प्रातांचीनिर्मिती करण्यात आली आणि घटनांकारांनी प्रत्येक राज्याला त्याच्या संबंधीत भाषेला म्हणजेचप्रादेशिक भाषेला मान्यता दिली. भारतीय संविधानाने सुरुवातीला परिशिष्ट आठमध्ये १४भाषांना मान्यता दिली. नंतर त्यामध्ये चार भाषांना मान्यता मिळाली. अशा प्रकारे सध्या भारतीयसंविधानात १८ प्रादेशिक भाषांची नोंद करण्यात आली आहे. भारतातील ९१%लोक याप्रादेशिक भाषा बोलतात व त्याद्वारेच व्यवहारही करतात.

भारतामध्ये हिंदुस्थानी भाषा व उर्दू भाषा बोलणारे ४६ लोक असल्याने भारतीयघटनांकारांनी हिंदी भाषेला राज्य भाषेचा दर्जा देण्याचे ठरवले. बिगर हिंदी भाषिक राज्यांनी त्यासविरोध केला. यामध्ये प्रामुख्याने दक्षिण भारतातील राज्ये व उत्तर पूर्वेकडील काही राज्यांचासमावेश होता. याबाबत बी.जी. खेर यांच्या अध्यक्षतेखाली एका भाषिक कमिशनची नेमणूक१९५५ साली करण्यात आली. या कमिशने त्यांचा अहवाल १९५६ मध्ये सरकारला दिला.संसदेने १९५७ मध्ये या अहवालाकर चर्चा करण्यांसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहाचे अधिवेशनबोलविले व त्यामध्ये पुढील तरतूद करण्यात आली.

भाषिक कमिशनच्या पहिला अहवाल १९५८ मध्ये प्रकाशित करण्यात आला. याअहवालावर दक्षिणेतील राज्यांनी मोठया प्रमाणावर टीका केली आणि हिंदी भाषेच्या वापरासनकार दिला. त्यामुळे १९५९ मध्ये त्यावेळचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरुंनी लोकसभेतजाहीर केले की, अहिंदी भाषिक राज्यांना हिंदी बोलणे व व्यवहारात तिचा उपयोग करण्याचेबंधन त्यांच्या संमत्तीशिवाय लादले जाणार नाही. यासाठी अनिश्चित कालावधी देण्यात आला.१९६३ मध्ये अधिकृत भाषा ठराव संमत करण्यात आला. यामध्ये इंग्लिश बरोबरचहिंदीलाही राष्ट्रभाषेचा दर्जा देण्याचे ठरले आणि १९६५ मध्ये हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा ठरली.१९६७ मध्ये हिंदी राष्ट्रभाषे विरोधात दक्षिणेतील राज्यांनी व पश्चिम बंगालने दंगली सुरु केल्या.यामध्ये तामिळनाडू राज्य वेगळे करण्याचे संकेत त्यांनी दिले. त्यामुळे १९६८ मध्ये भाषिककायदयात सुधारणा करण्याचे संसदेत ठरवले आणि इंग्रजीला हिंदी भाषेचाच दर्जा कायमठेवण्याचे मान्य करण्यात आले. यावर उत्तर भारतीयांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या म्हणून परतएकदा हिंदीलाच राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यात आला.हिंदी -इंग्रजी भाषेवरुन दक्षिण व उत्तर भारत असे दंगे चालू असतानाच गोवा राज्याने कोकणी विरुध्द मराठी असा संघर्ष सुरु केला.हिंदी -इग्रंजी वादाची सुरुवात घटना परिषदेत झाली. राज्यघटनेच्या मसुद्यात हिंदीचाराष्ट्रभाषा व प्रांताचा कारभार स्थानिक भाषेत करावा असे नमूद करण्यात आलेच नव्हते. थरीहीबहुसंख्य असणाऱ्या हिंदी भाषिक लोकांनी हिंदीस राष्ट्रभाषेचा दर्जा द्यावा आणि संघ सरकारचाराज्यकारभार इंग्रजी भाषेऐवजी देवनागरी लिपीत म्हणजेच हिंदीत करावा यासाठी आग्रह धरला.हिंदीवाल्यांचे प्रवक्ते सेठ गोविंददास आणि स्व. पुरुषोत्तम टंडन यांच्या या मागणीचे दक्षिणेतीललोक चिंतीत झाले. त्यांच्या मते हा हिंदी साम्राज्यवाद (Hindi Imperialism) होता आणियामुळे अहिंदी भाषिक राज्यांचे हितसंबंध धोक्यात येतील. म्हणून इंग्रजीच्या प्रेमामुळे नव्हे तरहिंदी भाषिकांना रोखण्यासाठी त्यांनी इंग्रजी भाषेचे समर्थन केले.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - भाषावाद सविस्तर स्पष्ट करा.

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

## ५.७ भाषिक संघर्ष (LINGUISTIC CONFLICTS)

भारताच्या स्वातंत्र्यानंतर लगेच भाषिक संघर्षाला सुरुवात झाली. त्यापैकी काही संघर्षशांत झालेले आहेत. परंतु अनेक संघर्षावर अजून तोडगा निघालेला नाही. काही महत्त्वाचेभाषिक संघर्ष पुढील प्रमाणे आहेत.

**(१) तामिळनाडूतील हिंदीच्या विरोधातील चळवळ (The Anti- Hindiagitations of Tamil Nadu)**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर ही तामिळनाडूमध्ये (पूर्वीचे मद्रास राज्य) झालेल्याचळवळीची मालिकाच आहे. चळवळीमध्ये अनेक प्रकारचे हल्ले, विद्यार्थ्यांच्याचळवळी, राजकीय चळवळी इत्यादीचा समावेश आहे.

**(२) १९५० मधील इंग्रजीविरोधी जमावाने केलेला गोंधळ (The Anti-English Riots in the 1950s)**

१९५० मध्ये उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राज्यस्थान या उत्तरेकडील राज्यांनीइंग्रजी या भाषेच्या विरोधात उठाव केला. यामध्ये विशेषतः विद्यार्थी होते. त्यांनीनियमांचे उल्लंघन करुन चळवळीत अनेक अहिंसक घटना घडवून आणल्या आणिखूप मोठ्या प्रमाणावर सरकारी संपत्तीचे नुकसान केले.

(३) महारष्ट्रीयन लोकांचे हितसंबंध सांभाळण्यासाठी आणि मराठीचे संरक्षण करण्यासाठीसंघर्ष (The struggle for protecting Marathi and Maharashtrian interests)

मराठी भाषा आणि मराठी लोकांचे समर्थन पूर्वीपासून शिवसेना आणि सद्यपरस्थितीमध्येमहाराष्ट्र नवनिर्माण सेना करीत आहेत यासाठी चळवळी होत आहेत.

munotes.in

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - भाषिक संघर्ष उदाहरणासह स्पष्ट करा.

## ५.८ भाषिक संघर्ष सोडवण्याचे उपाय (MEASURES TO RESOLVELINGUISTIC CONFLICTS)

हिंदी आणि इंग्रजी भाषेतील संघर्ष दूर करण्यासाठी १९६८ साली भाषिक कायद्यातसुधारणा (दुरस्ती) करण्यात आली. त्यातील तरतूदी पुढील प्रमाणे आहेत.

- इंग्रजी भाषेला हिंदी भाषेबरोबरच राज्यांच्या कार्यालयीन भाषेचा व संसदीय भाषेचा दर्जाअसेल. थोडक्यात भाषेला समान दर्जा असेल.
- हिंदी आणि स्थानिक प्रादेशिक भाषेला इंग्रजी भाषेचा पर्याय देण्यात आला.
- केंद्र आणि राज्य यांच्यातील संपर्काची भाषा म्हणून इंग्रजीला प्राधान्य देण्यात येईल. परंतुकोणतीही दोन राज्ये हिंदूतून व्यवहार करु शकतात किंवा हिंदीचे रुपांतर इंग्रजीमध्ये करुनसंपर्क करु शकतात. भाषावादाची समस्या लक्षात घेऊन भारतीय घटनेने हिंदीलाच संरक्षणन देता प्रत्येक राज्याला त्यांच्या स्थानिक भाषेतून व्यवहार करण्याची परवानगी दिली आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न - भाषिक संघर्ष सोडवण्याचे उपाय सांगा.

## ५.९ प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम (EFFECTS OFREGIONALISM AND LINGUISTIC DIFFERENCES)

प्रदेशवाद आणि भाषिक समस्या संघर्ष निर्माण करण्याच्या शक्तीअसल्याने ते देशाच्या एकतेला हानिकारक आहेत. त्यांच्या परिणामाचे वर्णन खालील प्रमाणेकरता येते.

**(१) प्रादेशिक पक्षांतील वाढ -**

प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेमुळे अकाई दल, शिवसेना, तेलगु देशम अगदीअलिकडील महाराष्ट्र नव निर्माण सेना इत्यादी अनेक प्रादेशिक पक्ष राज्यांमध्ये निर्माण झाले. हेप्रादेशिक पक्ष फक्त राज्यातीलच राजकीय सत्ता हस्तगत करत नसून राष्ट्रीय राजकीयसत्तेमध्येही त्यांचा महत्त्वाचा भाग असतो. याला महत्त्वाचे कारण म्हणजे काँग्रेस पक्षाचेअध:पतन आणि याला योग्य पर्याय म्हणून पक्षाची उभारणी करण्यामध्ये भारतीय जनता पार्टी(BJP) चे अपयश होय. आज दोन्हीही पक्षाला लोक सभेत सत्ता मिळवण्यासाठी प्रादेशिकपक्षांची मदत घ्यावी लागते.

**(२) प्रादेशिक नेत्यांमधील वाढ -**

कित्येक नेत्यांना प्रसिध्दी प्रादेशिक वाढ आणि विकास यामुळे मिळते. उदा. एन्. टी.रामराव, अण्णा दुराई, एम्. करुणानिधी, बाळ ठाकरे, ममता बॅनर्जी, जयललिता, इत्यादी अनेकप्रादेशिक नेत्यांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. प्रादेशिक नेत्यापैकी बऱ्याच जणांचा राष्ट्रीयराजकारणांमध्ये सुध्दा महत्त्वाची भूमिका बजावतात.

**(३) स्वतंत्र राज्यकारभाराची (स्वायत्ततेची) मागणी -**

ज्या समाजाकडे विकासाच्या दृष्टीकोनांतून दुर्लक्ष झालेले आहे. असा समाज स्वंतत्र्यराज्याची मागणी करुन स्वतंत्र राज्यकारभार करण्याची इच्छा करतो. ही मागणी प्रदेशवादमुळे केली जाते.

**(४) बाहेरील व्यक्ती विरुध्द मोहीम -**

कित्येक प्रादेशिक नेते बाहेरील व्यक्ती विरोधात बोलू लागतात की स्थानिक लोकांच्याउदरनिर्वाहाची साधने बाहेरील लोक बळकवतात. शिवसेनेचे अध्यक्ष बाळ ठाकरे यांनी दक्षिणभारतीयांविरुध्द मोहीम सुरु केली. तसेच त्यांचे पुतणे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजठाकरे यांनीही उत्तरप्रदेश व बिहार मधून विशेषतः मुंबईमध्ये येणाऱ्या लोकांच्या विरोधात मोहीमसुरु केली आहे.

**(५) राज्य व क्रेंद्रींय राजकारणामध्ये युती -**

प्रादेशिक पक्ष आणि प्रादेशिक नेते हे राजकीय दृष्ट्या बलवान व शक्तीशाली बनतआहेत. म्हणून सध्या बऱ्याच राज्यांमध्ये आणि केंद्रीय सत्तेमध्यही कोणत्याही एका पक्षाची सत्तायेऊ शकत नाही. सत्तेवर येण्यासाठी पक्षाला प्रादेशिक पक्षांशी युती करावी लागते. त्यामुळेप्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढत आहे.

munotes.in

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न – प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

## ५.१० सारांश

आपल्या देशाच्या एकात्मतेला प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेमुळे धोका निर्माण झालेला आहे. प्रदेशवाद म्हणजे प्रांतवाद होय. भाषा आणि संस्कृती माथी मारण्याच्या विरुध्द प्रतिक्रीया, सरकारचे विशिष्ट प्रदेशांकडे दुर्लक्ष, उपसंस्कृती जतन करण्याची इच्छा, प्रादेशिक पक्षाची इच्छा,स्वतःच्या गटाचे अस्तित्व टिकवणे, मागासलेल्या प्रदेशांतील वाढती जाणीव इत्यादी घटकांमुळे प्रदेशवाद वाढतो. प्रदेशवादामुळे भारतीय संघातून बाहेर पडण्याची मागणी, वेगळ्या राज्याची मागणी, आंतरराज्य सीमावाद, आंतरराज्य पाणीवाद इत्यादी संघर्ष उभे राहतात.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे बऱ्याच प्रमाणात प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष हातात हात घालून चालतात. प्रादेशिक पक्षांतील वाढ, प्रादेशिक नेत्यांमधील वाढ, स्वायत्ततेची मागणी, बाहेरील व्यक्ती विरुध्द मोहीम, राज्य व केद्रींय राजकारणांमध्ये प्रादेशिक पक्षांशी युती, इत्यादी प्रदेशवाद व भाषिक भिन्नतेचे परिणाम आहेत.

## ५.११ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

(१) प्रदेशवादाला अर्थ आणि विकास सविस्तर स्पष्ट करुन प्रदेशवाद व भाषिक संघर्षाचीकारणे सविस्तर सांगा.

(२) निरनिराळे प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष सविस्तर सांगून ते कमी करण्याचे उपायसांगा.

(३) भाषावाद सविस्तर स्पष्ट करुन भाषिक संघर्ष उदाहरणासह स्पष्ट करा व तेमिटवण्याचे उपाय सांगा.

(४) प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

(५) टिपा लिहा.

१) भाषावाद २) प्रदेशवाद / प्रांतीकवाद ३) भाषिक संघर्ष

❖❖❖❖

# घटक -६

## भारतीय संविधान / राज्यघटना
## The Indian Constitution

**पाठाची रचना :**

६.० पाठाची उद्दिष्ट्ये
६.१ प्रास्ताविक
६.२ भारतीय संविधान निर्मिती
६.३ भारतीय संविधानाचे तात्विक अधिष्ठान
६.४ भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये
६.५ सहिष्णुता, शांती आणि जातीय सलोखा
६.६ भारतीय संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये
६.७ समारोप
६.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

### ६.० पाठाची उद्दिष्ट्ये

- भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान समजून घेणे.
- भारतीय राज्यघटना रचनेचा अभ्यास करणे.
- भारतीय राज्यघटनेची शक्तिस्थाने आणि भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये जाणून घेणे.
- भारतीय राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ट्ये समजून घेणे.

### ६.१ प्रास्ताविक

भारतीय समाज हा बहुसांस्कृतिक, बहुभाषिक, बहुवांशिक असा विविधतेने भरलेला असला तरीही कोणत्याही परकीय आक्रमणावेळी अथवा संकटावेळी तो एक होतो. भारतीय राजकारणात कोणत्याही धर्माची व्यक्ती पंतप्रधान किंवा राष्ट्रपती बनू शकते. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीवेळी भारतीय लोक एकमेकांना मदतीचा हात देतात. लोक आपले मानवी हक्क मुक्तपणे उपभोगतात. हे सर्व आपल्या भारतीय राज्यघटनेमुळे शक्य झाले आहे. अन्यथा आपल्या शेजारील राष्ट्रांत आपण पाहतो की, पंतप्रधान, राष्ट्रपती यांना तुरुंगवास भोगावा लागतो, कोणत्याही क्षणी सरकारविरुद्ध बंड करून ते उलथवून टाकले जाते. कधी लष्करी बंड होऊन ते सत्ता काबीज करतात. समाजविरोधी घटकांच्या हातात राज्यकारभार जातो. परंतु भारतीय राज्यघटनेमुळे भारतीय राज्यात अशी परिस्थिती आपणास कधीही अनुभवास येत

नाही. उलट भारतीय समाजाने नेहमीच एकजूटीने अशा परिस्थितीत लोकशाही मार्गानेच सर्वप्रश्न सोडविले आहेत. त्या दृष्टीने पाहिल्यास, भारतीय राज्यघटनेला भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात तोड नाही.

## ६.२ भारतीय संविधान निर्मिती

भारतीय राजकारणाला सांविधानिक विकासाची मोठी परंपरा लाभली आहे. कारण ज्याज्या वेळी भारतीय जनतेने ब्रिटिशांविरूद्ध आपले निषेध नोंदविले, त्या त्या वेळी ब्रिटिशांनी भारतीय जनतेला हप्त्या हप्त्याने संविधानिक सुधारणा देऊ केल्या. उदा. मोर्लेमिंटो सुधारणा(१९०९), माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा (१९१९), भारतीय स्वातंत्र्य कायदा (१९३५) इत्यादी.इ.स. १९४६ मध्ये कॅबिनेट मिशन भारतात आले व त्यांनी भारतीय राज्यघटना निर्मितीसाठी संविधान सभा किंवा घटना समिती स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार संविधान सभा स्थापन होऊन प्रांतिक विधानमंडळाच्या निर्वाचित सदस्यांद्वारे संविधान सभेच्या सदस्यांची निवड करण्यात आली. हे सदस्य तीन गटांमधून निवडले होते. उदा. १) सामान्य, २) मुस्लिम,३) शिख. तसेच अल्पसंख्यांक, वंचित वर्ग (अनुसूचित जाती), पारसी, भारतीय ख्रिश्चन, अँग्लो इंडियन्स, आदिम जमाती आणि स्त्रिया यांनासुद्धा संविधान सभेमध्ये प्रतिनिधित्व देण्यात आले होते. हे सर्व सदस्य अनुभवी, बुद्धिमान आणि कर्तृत्ववान असे होते. संविधान सभेमध्ये एकूण सदस्य ३८९ असून त्यातील २९६ हे ब्रिटिश व्याप्त भारतातील तर ९३ हे संस्थानी राजांचे प्रतिनिधी होते. त्यातून २०८ राष्ट्रीय काँग्रेस, ७३ मुस्लिम लीग आणि उरलेले १०८ हे इतर संस्थांचे सदस्य होते.

संविधान सभेचे (घटना समिती) पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ रोजी हंगामी अध्यक्ष डॉ. सचिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यानंतर ११ डिसेंबर १९४६ रोजीडॉ. राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे कायम अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.राज्यघटना तयार करण्याच्या प्रक्रीयेसाठी संविधान सभेने काही नियम तयार केले. म्हणून संविधानाचा आराखडा लिहिण्यासाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. कायदेपंडीत व अनेक देशांच्या राज्य घटनांचा अभ्यास असलेले बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. त्या अगोदरपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेच्या अनेक उपसमित्यांवर सदस्य म्हणून भूमिका पार पाडित होते. आता त्यांच्यावर संपूर्ण संविधानाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी टाकण्यात आली व ती त्यांनी आजारपण असतानाही पार पाडली. आपले पूर्ण प्रयत्न पणाला लावून त्यांनी भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला.

संविधानाचा हा मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार झाला. हा मसुदा २१ फेब्रुवारी,१९४८ पासून आठ महिने संविधान सभेपुढे चर्चेसाठी ठेवला. तसेच, जनतेच्या सूचना मागविण्यात आल्या. अशा प्रकारे ९ डिसेंबर, १९४६ ह्या पहिल्या सत्रापासून ते २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशीपर्यंत एकूण २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवसांचा कालावधी संविधान निर्मितीसाठी लागला. २६ जानेवारी १९५० या दिवसापासून हे भारतीय संविधान अंमलात आले. मसुदा समितीची रचना खालीलप्रमाणे होती.

१) डॉ. बी. आर. आंबेडकर - अध्यक्ष

२) अल्लादी कृष्ण स्वामी अय्यर - सदस्य

३) एन्. गोपाल स्वामी अय्यंगार - सदस्य
४) डॉ. के. एम. मुन्शी - सदस्य
५) सय्यद मोहम्मद सादुल्ला - सदस्य
६) बी. एल. मित्तर (यांच्या जागी एन्. माधवराव सदस्य)
७) डी.पी. खेतान (यांच्या जागी टी.टी. कृष्णमाचारी सदस्य)

मसुदा समितीवर वरीलप्रमाणे सदस्य असले तरी ते आपले पाहिजे तेवढे योगदान देऊ शकले नाहीत व संपूर्ण आराखडा तयार करण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर येऊन पडली. त्यांच्या या महान कार्याची दखल भारतीय संविधान सभेने चर्चे दरम्यान घेतली आहे. ५ नोव्हेंबर, १९४८ रोजी मसुदा समितीचे एक सदस्य टी. टी. कृष्णमाचारी यांनी आपले मत संविधान सभेसमोर मांडले. त्यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद आणि त्यादिवशी हजर असलेल्या सर्व सदस्यांसमोर आपले म्हणणे पुढील शब्दांत मांडले.

"अध्यक्ष महोदय, या सभागृहाला याची जाणीव असेल की, याचं सभागृहाने मसुदा समितीवर ज्या सात सदस्यांची नियुक्ती केली होती त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला म्हणून त्याच्या जागी दुसऱ्यांना नियुक्त करण्यात आले. एका सदस्याचा मृत्यू झाला आणि ती जागा रिकामीच राहिली. एक सदस्य दूर अमेरिकेत निघून गेले आणि त्यांचीही जागा भरली गेली नाही. दुसरे एक सदस्य राज्याच्या राजकारणात व्यस्त होते, गुंतलेले होते आणि त्याप्रमाणात पोकळी निर्माण झाली होती. एक किंवा दोन सदस्य दिल्लीपासून फार दूर होते आणि कदाचित प्रकृती अस्वास्थाच्या कारणास्तव त्यांनी बैठकीत भाग घेतलाच नाही. याचा अंतिम परिणाम असा झाला की या संविधानाचा मसुदा तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर आली आणि त्यांनी हे महत्त्वपूर्ण कार्य निःसंशय, अत्यंत समर्थपणे पूर्ण केले यात तीळमात्र शंका नाही. याकरिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत."

टी.टी. कृष्णमचारी यांच्याप्रमाणेच हजर अनेक सदस्यांनी संविधानाच्या मसुद्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले आहे व ही सर्व चर्चा 'Constituent Assembly Debates' म्हणून नोंद करण्यात आलेली आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार मानले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न - मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते ?
प्रश्न - संविधान निर्मितीसाठी एकूण किती कालावधी लागला ?

## ६.३ भारतीय राज्यघटनेचे तात्विक अधिष्ठान

### ६.३.१ संविधानाच्या उद्दिष्टांचा ठराव :

भारतीय संविधानाची प्रास्ताविका हा अत्यंत महत्त्वाचा भाग असून ती तयार करताना त्यांत अनेक मूल्ये व तत्वज्ञानाचा समावेश असलेला आपणांस दिसतो. संविधानाचे तत्वज्ञान हे दुसरे तिसरे काही नसून वेगवेगळी मूल्ये, आदर्श, ध्येये व उद्दिष्ट्ये यांनाच पाया मानून त्यावर संविधानाची इमारत उभी केली आहे. संविधान सभेच्या पहिल्या अधिवेशनात ९ डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला व त्यावर चर्चा होऊन तो २२ जानेवारी १९४७ रोजी सर्वानुमते पारित करण्यात आला. संविधानाच्या सर्व पायऱ्यांमध्ये उद्दिष्टांच्या ठरावातील उच्च आदर्श व तत्वज्ञान यांचा उपयोग संविधान तयार करताना केलेला आढळतो. त्या दृष्टीने "उद्दिष्टांच्या ठरावास" अत्यंत महत्वाचे स्थान आहे. या ठरावातील मूल्यांचे प्रतिबिंब आपणांस प्रास्ताविकेमध्ये पडलेले दिसते. या ठरावाचे गमक म्हणजे भारत हे राष्ट्र एक सार्वभौम प्रजासत्ताक असून ते कोणत्याही परकीय सत्तेच्या प्रभावाखाली नसून ते भारतीय जनतेच्याद्वारे निर्माण झालेले आहे. तसेच भारतीय जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय आणि प्रत्येक नागरिकास व्यक्तिगत सुरक्षा, दर्जा व संधीची समानता उपलब्ध करण्याची भारतीय संविधान हमी देत आहे. तसेच संविधान अशी प्रतिज्ञापूर्वक दृढ निश्चय करते की, भारतास एक सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्रामध्ये रुपांतरीत करील.

### ६.३.२ भारतीय संविधानाची प्रास्ताविका :

प्रास्ताविका म्हणजे प्रस्तावना किंवा प्राथमिक विधान होय. तसेच कोणत्याही साहित्याच्या प्रारंभी त्या साहित्याची सारांशरुपाने दिलेली ओळख होय. भारतीय संविधानाची प्रास्ताविका ही सरकार व जनतेला दिलेले एक हमी पत्र आहे व सरकारची जबाबदारी निर्देशित करते. त्यामध्ये भारतीय जनतेच्या इच्छा-आकांक्षाचे प्रतिबिंब पडलेले आपणांस दिसते. संविधानाच्या माध्यमातून संपादन करावयाची ध्येये आणि उद्दिष्ट्ये म्हणजे ही प्रास्ताविका होय. ही प्रास्ताविका पुढील शब्दांत मांडण्यात आली आहे.

**"आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय ;**
**विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा**
व उपासना यांचे **स्वातंत्र्य ;**
दर्जाची व संधीची **समानता ;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
**आमच्या संविधानसभेत**

आज दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान **अंगीकृत आणि अधिनियमित**
**करुन स्वतःप्रत अर्पण करीत आहोत."**

आपणांस संविधानाचे तत्वज्ञान प्रास्ताविकेच्या माध्यमातून समजून घ्यावे लागेल.**'आम्ही भारतीय जनता'** म्हणजे आम्ही भारतीय लोक आमच्या स्वतःसाठीच हे संविधान अंगीकृत व अधिनियमित करीत आहोत. दुसऱ्या देशाचे संविधान आम्ही वापरीत नाही. भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांनी भारतीय जनतेच्या वतीने हे संविधान तयार केलेले आहे. म्हणजेच स्वतः घटनाकार किंवा संविधान सभा किंवा मसुदा समिती हे संविधान अंगीकृत व अधिनियमित करीत नसून भारतीय जनता ते करीत आहे. संविधान सभेचे सदस्य हे भारतीय जनतेचे प्रतिनिधी असून जनतेच्या वतीने जनतेसाठीच ते ही राज्यघटना तयार करीत आहेत.

### ६.३.३ सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक

भारतीय जनता भारतास एक सार्वभौम राष्ट्र म्हणून निर्माण करीत आहे. संज्ञा **'सार्वभौम'** याचा अर्थ भारत राष्ट्र कोणत्याही अंतर्गत किंवा बाह्य सत्तेच्या नियंत्रणाखाली नाही. तसेच भारतीय संविधान हे ब्रिटीश संसदेची किंवा सत्तेची देणगी नसून ते स्वतःसाठी भारतीय जनतेने स्वतःच्या शक्तीने व बुद्धिने तयार केलेले आहे आणि त्यासाठी तीने आपले प्रतिनिधी निवडून लोकशाही मार्गाने संविधान सभेमध्ये पाठविले. त्यामुळेच भारतीय जनतेवर कोणाचीही कोणत्याही प्रकारची बंधने नाहीत व ती पूर्णपणे मुक्त आहे.

**'समाजवादी'**हे १९५० च्या संविधानाचा भाग नव्हते तर त्याचा समावेश ४२ व्या घटना दुरुस्ती नुसार १९७६ रोजी करण्यात आला. समाजवादी संकल्पनेचा अर्थ सर्वसमावेशकता असा होतो. भारतीय जनता सर्वांना बरोबर घेऊन एकजीव समाजनिर्मितीसाठी प्रयत्न करील. तसेच एक केंद्री संपत्ती टाळणे, उत्पन्नाच्या साधनांवर सामाजिक नियंत्रण ठेवणे, तसेच गरजेप्रमाणे सर्वांना समान व योग्य वितरण करण्याचे आश्वासन देत आहे. ही संज्ञा मार्क्सच्या समाजवादाबरोबर साधर्म्य दाखवित असली तरी ती पूर्ण स्वरुपात नसून भारतीय सामाजिक रचनेप्रमाणे आहे. तसेच प्रत्येक भारतीय नागरिकास आपला योग्य मार्गाने उदरनिर्वाह करून आपले राहणीमान उंचावण्याचा अधिकार आहे हे या संज्ञेमद्ये अभिप्रेत आहे.

'**धर्मनिरपेक्ष**' हा शब्दसुद्धा ४२ व्या घटना दुरुस्तीन्वये प्रास्ताविकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्याचा अर्थ भारत या राष्ट्राचा 'राष्ट्रधर्म' नसून सर्व जाती धर्माच्या लोकांना आपले धर्मस्वातंत्र्य जोपासण्याचा अधिकार आहे. त्यांना उपासना स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आहे. भारत राष्ट्र आपल्या नागरिकांमध्ये जाती-धर्माच्या आधारावर बिलकूल भेदभाव करणार नाही. त्यामुळे धर्माच्या बाबतीत राष्ट्र अलिप्त राहील. कोणत्याही विशिष्ट धर्माची पाठराखण करणार नाही. त्यामुळे धर्मनिरपेक्षता ह्या तत्वाचे प्रतिबिंब आपणास कलम २५ मध्ये पडलेले आढळते. कोणतीही व्यक्ती कोणताही धर्म स्विकारू शकते, कोणत्याही धर्माचे-पंथाचे पालन करू शकते व तसे स्वातंत्र्य प्रत्येक भारतीय नागरिकास संविधानाने दिलेले आहे. भारताचे माजी राष्ट्रपती आर. वेंकट रामन यांनी धर्म निरपेक्षतेची व्याख्या अगदी मार्मिक शब्दात

munotes.in

केली आहे. ते म्हणतात, 'धर्मनिरपेक्ष म्हणजे असे नाही की भारत संधार्मिक (Proreligious) अधार्मिक (non-religious) किंवा धर्मविरोधी (anti-religious) आहे.'

**लोकशाहीवादी** याचा संक्षेपी अर्थ म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या साहाय्याने लोकशाही सरकार निवडून देणे होय. परंतु विस्तारीत अर्थाने लोकशाहीवादी म्हणजे या देशातील लोकांचे जीवनमान आणि येथील संस्थांचा कारभार हा कसा चालला पाहिजे तर तो लोकशाही मार्गानेच. भारतीय शासन हे प्रातिनिधीक संसदीय लोकशाही पद्धतीवर आधारित असून तेयेथील जनतेला जबाबदार आहे. लोकशाही सरकारचे अनेक प्रकार आहेत त्यापैकी अमेरिकेतील अध्यक्षीय लोकशाही, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड येथील राजा किंवा राणीला प्रमुख मानणारी लोकशाही यांचे उदाहरण देता येईल.

**प्रजासत्ताक** या संकल्पनेचा अर्थ असा होतो की, भारतीय राज्याचा प्रमुख हा निर्वाचित असून तो कोणत्याही प्रकारे वारसा हक्काने आलेला नसेल. याचा दुसरा अर्थ असा होतो की, अंतिम सत्ता ही जनतेच्या हाती असेल आणि त्यासाठी जनता आपले प्रतिनिधी निवडून देईल. याचा अजूनही संदर्भ द्यावयाचा झाल्यास सर्व सरकारी आणि सार्वजनिक ठिकाणे कोणत्याही भेदभावाशिवाय जनतेला खुली असतील.

### ६.३.४ न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता :

पुढील भागात प्रास्ताविका असे म्हणत की, प्रत्येक भारतीय नागरिकांस तीन प्रकारचा **न्याय** मिळाला पाहिजे. तो म्हणजे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय होय. भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी ही न्यायाची योजना अत्यंत बुद्धिमानाने तयार केली आहे. सामाजिक न्यायाशिवाय आर्थिक व राजकीय न्याय मिळणे शक्य नाही. तसेच सामाजिक व राजकीय न्यायाशिवाय आर्थिक न्याय मिळणे दुरापास्त आहे. कारण भारतीय समाज हा अनेक जाती, धर्म,भाषा, लिंग, भेद यांनी बनलेला आहे आणि भारतीयांमध्ये या गोष्टींच्या आधारावर आपापसात अनेक प्रकारे भेदभाव केला जातो. अशा परिस्थितीत भारतीय जनतेमध्ये एक सुदृढ सामाजिक दृष्टीकोन बिंबवणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच भारतीय राज्य हे एक कल्याणकारी राज्य असणे गरजेचे आहे. हे या प्रास्ताविकामध्ये दर्शविण्यात आले आहे. ज्यावेळी ॲरिस्टॉटल या तत्ववेत्त्याने असे म्हटले की, सामाजिक न्याय प्रस्थापित करायचा असेल तर "समान स्तरावरच्या लोकांना समान नियम लावावेत आणि असमान स्तरावरच्या लोकांना असमान नियम लावावेत."

सामाजिक न्याय मिळण्याबरोबरच भारतीयांना आर्थिक न्याय मिळणे तेवढेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक नागरिकास योग्य मार्गाने कमाई करुन आपला उदरनिर्वाह करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या तत्वानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेसुद्धा महत्त्वाचे आहे. आर्थिक स्तराच्या आधारावर भारतीय नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही हे मार्गदर्शक तत्वांमध्ये विशद केलेले आहे. म्हणूनच राज्याने सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळे कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित केल्यानंतरच आपणांस राजकीय न्यायाचा विचार करावा लागेल. या अगोदर भारतातच नव्हे तर जगाच्या अनेक देशात मताधिकार हा सामाजिक स्तर, संपत्ती, शिक्षण, वर्ण यांच्या आधारावर दिला जायचा. परंतु भारतीय संविधानाने सरसकट सर्वच प्रौढ

नागरिकांना मताधिकार बहाल केलेला आहे. तसेच गरीब, श्रीमंत, शिक्षित, अशिक्षित अशा सर्वच जाती विरहीत नागरिकांना प्रत्येकी एक प्रौढ मताचा अधिकार दिला आहे व त्या एका मताचे मूल्य देखील एकच ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच राजकीय न्यायाची संकल्पना महत्त्वाची आहे.

म्हणूनच प्रास्ताविकेमध्ये प्रस्तुत केलेली न्यायाची संकल्पना ही एका अर्थाने क्रांतीकारी योजनाच आहे.

प्रास्ताविकेमध्ये **स्वातंत्र्याची** योजना आहे ज्याद्वारे भारतातील सर्व नागरिकांना आपले विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, उपासना यांचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे. याबाबतीत कोणताही भेदभाव न करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याचबरोबर अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, प्रत्येकाने आपले स्वातंत्र्य उपभोगताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यास बाधा पोचणार नाही याचीही काळजी घेतली जाईल. प्रत्येक नागरिक आपणास हवा तो धर्म स्विकारू शकतो, कोणत्याही धर्म-पंथाची उपासना करू शकतो. म्हणूनच कलम १९ याद्वारे स्वातंत्र्याचा उहापोह करण्यात आला आहे.

प्रास्ताविकात सर्व भारतीय नागरिकांना कोणत्याही भेदभावाशिवाय समानतेने वागण्यांची हमी देत आहे. **समानतेच्या** संकल्पनेमध्ये दोन अर्थाच्या समावेश आहे. प्रथम **दर्जाची समानता** म्हणजे प्रत्येक व्यक्ती ही कायद्यासमोर समान मानली जाईल. तर दुसऱ्या प्रकारात **संधींची समानता** ज्याद्वारे सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दिली जाईल असे अपेक्षित आहे. संविधान कलम १६(४) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, कोणत्याही मागास वर्गाच्या विकासासाठी सरकार कायदे पारित करू शकते व सामाजिक न्यायाची संकल्पना वास्तवात आणू शकते. तसेच ऐतिहासिक दृष्ट्या ज्या समाजावर हजारो वर्षे सामाजिक अन्याय (जातीभेद) झाला आहे, अशा समाजवर्गांसाठी "संरक्षणात्मक भेद" करणे आवश्यक आहे. म्हणजेच धावपटूंच्या शर्यतीत अपंगांस सामील करावयाचे झाल्यास त्याला थोडी अंतर, वेळ यांची सूट देऊन नियम शिथिल केले तरच ती शर्यत न्यायपूर्वक होईल. म्हणूनच ॲरिस्टॉटलने जे म्हटले आहे की, "Equals to be treated equally, unequalsunequally" हे योग्यच आहे.

प्रास्ताविकेमध्ये असेही पुढे म्हटले आहे की, प्रत्येक भारतीय नागरिकांची प्रतिष्ठा आणि एकजूट व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणारी **बंधुता** स्थापित केली जाईल. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, ''बंधुता ही अशी भावना आहे की, ज्यामध्ये सार्वत्रिक भ्रातृभाव आणि एकजूट व अखंडता यांना उत्तेजित करता येते.'' पुढे ते म्हणतात, ''समता व स्वातंत्र्य हे बंधुता असल्याशिवाय शक्यच नाही, अन्यथा भिंतीवर दिलेला रंगाचा पहिला हात असल्यासारखाच आहे.'' म्हणूनच समता, स्वातंत्र्य व बंधुता यांचा स्वतंत्रपणे विचार न करता एकत्रितपणे केला तर या तिन्हींचा त्रिवेणी संगम होऊन लोकशाहीचा विकास होईल.

अश प्रकारे प्रास्ताविकेचा सामरोप करताना २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी संविधान सभेमध्ये आम्ही भारतीय जनता ही राज्यघटना अंगीकृत आणि स्वत:प्रत अर्पण करीत आहोत असे म्हटले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न - भारतीय नागरिकांस कोणत्या प्रकारचे न्याय मिळण्याची हमी प्रास्ताविके मध्ये देण्यात आली आहे ?

प्रश्न - भारतीय संविधान कोणत्या दिवशी अर्पण केले आहे ?

## ६.४ भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये

मूलतः मूलभूत अधिकारांच्या दुसऱ्या बाजूला मूलभूत कर्तव्ये आहेतच. म्हणूनच घटनाकारांनी सुरुवातीला कर्तव्यांची लिखित योजना केली नाही. जेव्हा एका नागरिकास आपले अधिकार माहित असतात किंवा त्यांचा तो उपभोग घेत असतो, त्याच वेळी त्याला इतरांच्या अधिकारांचीसुद्धा जाणीव असणे म्हणजेच हे त्याचे आपोआपच कर्तव्य होते. इ.स. १९७६ साली ४२ व्या राज्यघटना दुरुस्ती अन्वये कलम ५१-अ अंतर्गत मूलभूत कर्तव्ये प्रत्येक भारतीय नागरिकासाठी निश्चित केली आणि त्यांची प्रत्यक्ष अमलबजावणी ३ जानेवारी १९७७ पासून लागू झाली. ही कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत व त्यांचे प्रत्येक नागरीकाने पालक करणे आवश्यक आहे.

१) संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ति मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.

३) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.

४) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.

५) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

७) अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी आणि नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुन त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे.

८) वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा नि:ग्रहपूर्वक त्याग करणे.

१०) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

११) सहा ते चौदा वर्षे वयाच्या बालकांचे आई-वडील किंवा पालक, त्यांच्या बालकांना किंवा पाल्यांना जे लागू असेल त्याप्रमाणे, शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे. (घटनेच्या कलम ४५ नुसार इ.स. २००२ साली ८६ व्या घटना दुरुस्तीन्वये घालण्यात आले आहे).

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न - भारतीय संविधानातील कोणत्या परिशिष्टात भाषांची यादी आहे ?

प्रश्न - भारतीय नागरीकांची कोणतीही तीन कर्तव्ये लिहा.

## ६.५ सहिष्णुता, शांती आणि जातीय सलोखा

भारतीय समाज हा बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुजातीय, असून येथील भौगोलिक रचना, ऐतिहासिक पार्श्वभूमी, वेशभूषा इ. विविधतेने नटलेला आहे. त्यामुळे येथील समाजामध्ये भेदभाव राहणे क्रमप्राप्त आहे. परंतु अशा देशात सुध्दा 'भारतीय संविधान' हे असे एक अस्त्र आहे की ते सर्वांना एकजूट ठेवून नेहमी देश रक्षणासाठी बळकट करते. मूळातच संविधानामध्ये वेगवेगळी मूल्ये, आदर्श, तत्त्वज्ञान यांचा प्रभाव आहे. त्यानुसारच मुलांच्या लहानपणी त्यांच्यावर सहिष्णुता, शांती, सहकार्य, सलोखा इ. मूल्ये रुजविणे अत्यंत आवश्यक आहे. या उपघटकांत आपण सहिष्णुता, शांती व जातीय सलोखा या मूल्यांवर थोडक्यात प्रकाश टाकणार आहोत.

### ६.५.१ सहिष्णुता :

सहिष्णुता याचा शब्दशः अर्थ सहनशीलता असा घेता येतो. परंतु तो थोडा संकुचित वाटतो. दुसऱ्यांच्या भावना, कल्पना समजून घेऊन त्यांचा आदर करणे म्हणजे सहिष्णुता असे म्हणता येईल. भारतीय समाज हा धर्म, जाती, परंपरा, पंथ, भाषा यांच्या वैविध्याने नटलेला आहे. अशा परिस्थितीत सहिष्णुता या मूल्याला अत्यंत महत्व प्राप्त होते. दुसऱ्याच्या मताचा आदरभाव बाळगणे आवश्यक आहे. दुसऱ्याची मते बऱ्याच वेळेस आपणास आवडत नाहीत, पटत नाहीत. परंतु त्यांचे श्रवण काळजीपूर्वक करुन शांतीपूर्ण मार्गाने त्यांचे खंडन करणे जरुरी आहे. या देशात हिंदु-मुस्लिम, हिंदु-ख्रिश्चन, दलित-उच्च अशा दंगली हे सामान्य उदाहरण आहे. परंतु सहनशीलता व सहिष्णुता बाळगणे हे त्यावर रामबाण औषध आहे.

**सहिष्णुता मूल्याचे महत्व :**

१) दुसऱ्याचे स्वभावधर्म समजून घेण्यास सहिष्णुतेची मदत होते.

२) जीवनातील अनेक प्रसंगी व्यक्तिला तडजोड करावी लागते व परिस्थिताशी समायोजन साधावे लागते, त्या दृष्टीने सहिष्णुतेची गरज आहे.

३) सहिष्णुतेच्या मूल्यामुळे भांडणे-तंटे व आपापसांतील संघर्ष थांबून शांतीचा मार्ग प्राप्त होतो.

४) भारतासारख्या बहुविध देशात सलोखा राखण्यासाठी सहिष्णुतेची आवश्यकता आहे.

५) लोकाशाहीवादी समाजाला सतत धगताशील व वैभव प्राप्त करायचे असल्यास सहिष्णुतेचे महत्व अधिक आहे.

६) सहिष्णुतेच्या मूल्याने व्याक्तिंमध्ये उदारमतवादी विचारांचा शिरकाव होऊन विरोधी मते सुद्धा स्विकारणे सोयीचे जाते.

७) स्वतःच्या मनाविरुद्ध असले तरी सहिष्णुता भावामुळे मनुष्य दुसऱ्याच्या मतांचा आदर करण्यास तत्पर होतो.

८) सहिष्णुता माणसामाणसात समतेची भावना वृद्धिंगत करते आणि संविधानात्मक तरतूदींची अंमलबजावणी सहज स्विकारते.

९) भारताला आर्थिक वैभव प्राप्त करुन जागतिक सत्ता व्हावयाचे असल्यास सहिष्णुता मूल्याची अत्यंत आवश्यकता आहे.

### ६.५.२ शांती :

भारताच्या प्रत्येक नागरिकामध्ये शांतीपूर्ण सहकार्य असेल तरच भारताच्या एकजूटी सबळकटी प्राप्त होईल. सहकार्य आणि परस्परांना मदतीची भावना असल्यास दशातील नागरिकामध्ये शांती नांदत असते. सर्व प्रगतीचे सार म्हणजे शांती होय. सामाजिक सहजीवनात प्रत्येकाने आपआपली जबाबदारी उचलली पाहिजे. आपण सर्वांना कृत्रिम वा नैसर्गिक आपत्तीच्यावेळी कोणताही जात, धर्म, पंथ, भाषा, लिंगभेद, धदेश, पोशाख याबाबत भेद न बाळगता नेहमीच मदत केली पाहिजे. ज्यावेळी समाजातील प्रत्येक जण सहकार्य करण्यास तत्पर असेल तर प्रत्येक व्यक्तिचे भले झाल्यावाचून राहणार नाही. त्यामुळे सामूहिक किंवा सामाजिक कृती करण्यासाठी देखील योग्य समज आणि परस्पर सहकार्य असणे आवश्यक आहे व त्याचा शेवट समाजातच नव्हे तर व्यक्ति जीवनात, शेजारी व राष्ट्रामध्ये शांती नांदण्यात होतो.

शांती हे एक नैतिक-मानवी मूल्य आहे व त्याचे पालन करणे भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाला आवश्यक आहे. ज्यावेळी एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध होते त्यावेळी आपण आपला संयम सोडून हिंसाचार करु नये तर त्यावेळी संविधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. 'बळी तो काळ पिळी' हे सूत्र केवळ प्राणी जगताला लागू पडते परंतु मानवी समाजाला हे लागू करता येणार नाही. कारण जे सामाजिक दृष्ट्या वंचित, अंपग, रोगी, वृद्ध असतील यांची दखल कोणीच घेणार नाही किंवा त्यांचे रक्षणही केले जाणार नाही. यासाठीच शांतीच्या तत्वाचा मानवी जीवनात शिरकाव असणे अगत्याचे आहे. सिद्धार्थ गौतम बुद्धाने आपले वैभवशाली जीवनाचा त्याग करुन शांती प्रस्थापित करण्यासाठी किंबहुना शांती-सत्याचा शोध घेण्यासाठी वती प्रस्थापित करण्यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यामुळेच बुद्ध हे शांतीचे प्रतिक आहेत.

आपण शांतीपूर्ण सहजीवनाचे पालन केले तर इतरही त्याचे अनुपालन करतील. भारतामध्ये या मूल्यामुळे दंगली, हिंसाचार यांना तिलांजली मिळेल.

### ६.५.३ जातीय सलोखा :

भारतीय समाजाला अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच आपणांस राष्ट्रीय एकोपा, एकात्मता आणि भौगोलिक अखंडता जोपासणे आवश्यक आहे. आज धर्म,जात, पंथ, भाषा, प्रादेशिकता यांच्या आधारावर हिंसाचार माजतो. त्यामुळे देशाची आर्थिक,सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक नव्हे जीवित हानी होते. जगामध्ये नाचक्की होते. म्हणूनच प्रत्येकाने जातीय सलोखा राखणे महत्त्वाचे आहे. जातीय सलोखा राखायचा झाल्यास पुढीलकाही गोष्टींचे पालन प्रत्येक भारतीय नागरिकांने करणे आवश्यक आहे.

**१) सर्व धर्मांचा अभ्यास करणे :** प्रत्येक धर्माचे थोडक्यात तत्वज्ञान मग तो जैन, बौद्ध,हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख असेल अभ्यासणे करु प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असले पाहिजे.जसे की, ईश्वरभक्ती किंवा मोक्षप्राप्ती इ.

**२) मैत्री व भ्रातृभाव यांस उत्तेजन देणे :** प्रत्येक नागरिकाने, मैत्री, बंधुभाव, भगिनीभाव यांना उत्तेजन दिले पाहिजे व स्वतः त्याचे पालन केले पाहिजे. या सर्वांपेक्षा राष्ट्रभावनेला महत्त्व दिले पाहिजे.

**३) धार्मिक भावनेचे शोषण थांबविणे :** प्रत्येक नागरिकाने आपल्या लोकांच्या धार्मिक भावनांचे शोषण करु नये. उदा. आपल्या धर्मावर घाला आहे, धर्माचा अपमान आहे व त्यावरुन धार्मिक दगंलीना उत्तेजन देणे टाळले पाहिजे.

**४) आंतर-जातीय, आंतर-धर्मीय आणि आंतर-राज्य विवाहांना प्रोत्साहन देणे :**आपल्या देशांत विविध धर्म, जाती, राज्ये, भाषा असल्या तरी आपण भारतीय आहोत या भावनेतून आंतर-जातीय, आंतर-धर्मीय व आंतर-राज्य विवाहांना चालना दिली पाहिजे. मानवप्राणी एक आहे या माध्यमातून विचार केला पाहिजे. या संकल्पनेने एकीची भावना वृद्धींगत होण्यास मदत होईल.

**५) बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुराज्य संघटना स्थापन करणे :**अशा काही संस्था स्थापन करून त्यामध्ये सर्व धर्माच्या लोकांना सामील करून घेणे आवश्यक आहे. त्याद्वारे आपापसांतील परराज्यीय संघर्ष लयाला जावून धार्मिक सलोखा नांदेल.

**६) जातीय व धर्मांध शक्तींचे पितळ उघडे पाडणे :**अशी काही नेतेमंडळी आहेत, काही स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था आहेत की, ते आपली पोळी भाजण्यासाठी धर्माच्या-जातीच्या नावावर दंगली घडवून आणतात, निधी गोळा करतात, एवढेच नव्हे तर अतिरेकी प्रशिक्षण देऊन तशा कारवायाही करतात. अशा शक्तींचे प्रसारमाध्यमांसमोर किंवा कायद्यासमोर पितळ उघडे पाडले पाहिजे.

munotes.in

**७) नैसर्गिक व कृत्रिम आपत्तीवेळी मदतीची भावना :**नैसर्गिक वा कृत्रिम आपत्तीच्या वेळी मग ती त्सुनामी, महापूर, भूकंप, चक्रीवादळकिंवा आग, अपघात, दुष्काळ असेल, सर्व धर्माच्या लोकांनी आपद्ग्रस्तांना तन, मन, धनानेमदत केली पाहिजे. कारण ओरिसातील चक्रीवादळ असेल, गुजरातमधील धार्मिक दंगली असतील किंवा मुंबईतील २६ जुलैचा महापूर असेल यावेळी लोक आपले जात धर्म विसरून एकमेकांच्या मदतीला धावून गेले होते. परंतु हीच भावना राहिल्यास सलोखा वाढण्यास मदत मिळेल.

**८) तत्वज्ञान, कल्पना, उच्च विचार यांची देवाण घेवाण :**प्रत्येक भारतीय नागरिकाने चांगल्या धार्मिक कल्पना, सांस्कृतिक वारसा, वैज्ञानिक शोध, तत्वज्ञान, विचार यांची राज्या-राज्याच्या धर्मा-धर्माच्या लोकांपासून देवाण-घेवाण केली तर सामाजिक सलोखा वृद्धिगंत होण्यास मदत होईल. धर्मनिरपेक्षतेच्या भावनेला बळकटी येईल. धर्मापेक्षा मानव जातीला महत्त्व येऊन राष्ट्रीय भावनेचा विकास होईल.

**९) मानवी मूल्यांचे संवर्धन :**धार्मिक व जातीय सलोखा वाढण्यासाठी प्रत्येकाने मूलभूत मानवी मूल्यांचे अवलंबन वसंवर्धन केले पाहिजे. जसे सहकार्य, सत्य, अहिंसा, न्याय, सहिष्णुता, निपुणता, उदारता,देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांना जर प्रोत्साहन दिले तर राष्ट्रीय व जातीय सलोखा निर्माण होण्यास मदतच होईल.

**१०) प्रसार माध्यमांची भूमिका :**जातीय, धार्मिक, प्रादेशिक, भाषिक सलोखा निर्माण करून त्याला प्रोत्साहन देण्याचे काम, प्रचार व प्रसार करण्याचे काम वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे अत्यंत यशस्वीपणे करतात. परंतु त्यासाठी कोणत्या गोष्टींचे प्रसारण करणे व कोणत्या गोष्टींचे प्रसारण टाळणे हे यासाठी प्रसारमाध्यमांनी आपले नियम पाळले पाहिजेत. त्यांनी जातीय सलोख्याच्या उदाहरणांचे प्रसारण करावे व त्याप्रमाणे जनतेला वागण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे जातीय सलोखा राहणे आपल्या देशासाठीच नव्हे तर एकूणच विश्वासाठी आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न -१) सहिष्णूता म्हणजे काय ?

२) एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध झाल्यास आपण काय करावे ?

३) जातीय सलोखा राखण्यासाठी कोणत्या गोष्टींचे पालन करावे ?

munotes.in

## ६.६ भारतीय संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये

भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी त्याकाळी जगातील सर्व देशांमध्ये उपलब्ध असलेल्या संविधानांचा अभ्यास केला. त्यांच्यामधील ज्या ज्या चांगल्या तरतूदी भारतीय सामाजिक, भौगोलिक परिस्थितीला योग्य वाटतील त्यांचा समावेश भारतीय संविधानात केला. त्यामुळेच भारतीय नागरिकाला आनंदी व शांतीपूर्ण जीवन जगण्यासाठी जे आवश्यक आहे त्या गोष्टींचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला. भारतीय संविधानातील मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) जगातील सर्वात प्रदीर्घ व लिखित संविधान :

भारतीय संविधान हे जगातील सर्वात प्रदीर्घ व लिखित संविधान आहे. यामध्ये ३९५ कलमे, २२ भाग आणि १२ परिशिष्टे होती. शिवाय घटना दुरुस्त्यांची यादी अनुसूचीमध्ये देण्यात आली आहे. कारण अमेरिकन संविधान ७ कलमांचे आहे तर ऑस्ट्रेलियन संविधान १२८ कलमे आणि कॅनडाचे संविधान १४७ कलमांचे आहे. भारतीय संविधानात प्रशासकीय यंत्रणेचे विश्लेषण, त्यांची कार्यवाही, विधीमंडळ व त्यांचे कामकाज, न्याय यंत्रणा इ. विषयी विस्तारपूर्वक ऊहापोह करण्यात आलेला आहे. इंग्लंडसारख्या देशाला तर लिखित संविधानच नाही. इ.स.२००३ पर्यंत एकूण ९२ वेळा संविधानात दुरुस्त्या करण्यात आलेल्या असून त्यामध्ये ४४७ कलमे, २६ भाग आणि १२ परिशिष्टे आहेत.

### २) जनतेची सार्वभौमता :

भारतीय राष्ट्र हे कोणत्याही अंतर्गत व बाह्य सत्तेच्या नियंत्रणाखाली नसून येथील जनताच त्याची चालक व मालक आहे. देशावर जनतेची सत्ता ही अंतिम सत्ता आहे. त्यामुळे भारत हे सार्वभौम राष्ट्र आहे अशी संविधानात तरतूद आहे. भारतीय जनता त्यासाठी आपले प्रतिनिधी देशाचा कारभार चालवण्यासाठी निवडून देते. त्यासाठी प्रौढ मतांचा अवलंब करते. सर्वधर्माच्या, पंथाच्या, भाषेच्या, प्रदेशाच्या, १८ वर्षे व त्यापुढील वयाच्या भारतीय नागरिकास मतदानाचा अधिकार बहाल केला आहे.

### ३) अंशतः ताठर व अंशतः लवचिक :

भारतीय संविधानाचे हे एक वैशिष्ट्य आहे की, ते एकदम ताठर नाही की पूर्णतः लवचिक नाही. कलम ३६८ नुसार ज्या ज्या वेळी भारतीय जनतेला सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, तात्विकदृष्ट्या कालानुरूप, बदलत्या प्रगतीनुसार संविधानात बदल करणे आवश्यक वाटेल त्या त्या वेळी त्याच्यात बदल करून त्यानुसार नवीन कलम जोडण्याची तरतूद केली आहे. तसेच कालानुरूप अनावश्यक कलमे वगळण्याची सुद्धा योजना आहे. त्यानुसार आतापर्यंत अनेक नवीन राज्यांची निर्मिती केलेली आहे. परंतु संविधानाची मूळ चौकट बदलता येत नाही. उदा. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मूलभूत हक्क यांच्यामध्ये पूर्णपणे बदल करता येत नाही. सुरुवातीची कलमे ३९५ होती व सन २००३ पर्यंत त्यांची संख्या ४४७ झाली आहे.

### ४) मूलभूत अधिकारांची योजना :

भारतीय संविधानाने भारताच्या प्रत्येक नागरिकास मूलभूत अधिकार बहाल केलेले आहेत. ते कोणताही भेदभाव न करता त्याला उपभोगता येतात. त्यासाठी त्याला कायद्याने संरक्षणसुद्धा देण्यात आले आहे. या मूलभूत अधिकारांची तरतूद कलम १२-३५ मध्ये आहे.

**मूलभूत अधिकार पुढीलप्रमाणे आहेत.**

**अ) समानतेचा अधिकार :**

यािद्वारे प्रत्येक भारतीय नागरिक हा कायद्यासमोर कोणत्याही भेदभावाशिवाय समान आहे असे म्हटले आहे (कलम १२-१८).

**ब) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९-२२) :**

यामध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला सहा प्रकारची स्वातंत्र्ये बहाल करण्यात आलेली आहेत.

१) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य.
२) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य.
३) अधिसंघ वा व्यावसायिक संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य.
४) भारतीय राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार स्वातंत्र्य.
५) भारतीय राज्यक्षेत्रात कुठेही राहण्याचे स्वातंत्र्य.
६) कोणताही पेशा आचरण्याचे अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य.

**क) शोषणाविरूद्धचा अधिकार (कलम २३-२४) :**

यामध्ये मानवी व्यापार, वेठबिगारी, सक्तमजूरी यांना पायबंद घालण्यात आला आहे.

**ड) धर्म स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५-२८) :**

भारतातील कोणत्याही व्यक्तीस आपल्या धर्म त्यागून किंवा ठेवून दुसरा धर्मस्विकारण्याचा, धर्माचरण करण्याचा अधिकार आहे.

**इ) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम २९-३०) :**

प्रत्येक नागरिकास आपल्या संस्कृतीचा प्रचार, प्रसार, जतन करण्याचा व त्यासाठी आपल्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे अधिकार असतील व त्यांना कायद्याने संरक्षण मिळेल.

**ई) संपत्तीचा अधिकार (कलम ३१) :**

हा अधिकार इ.स. १९७८ साली ४४ व्या घटना दुरुस्तीन्वये वगळण्यात आला आहे.

**प) घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम ३२-३५) :**

कोणत्याही नागरिकावर बेकायदा अन्याय झाल्यास त्यास न्यायालयातर्फे संरक्षण दिले पाहिजे व हा त्याचा अधिकार आहे असे संविधानात नमूद केले आहे. उदा. १) हेबियस कॉर्पस(देहोपस्थिती) २) मँडॅमस (महादश) ३) ऊोतेहिबिशन (प्रतिषेध) ४) कोवॉरंटो (क्वाधिकार)आणि ५) सर्शिओराय (प्राकर्षण) या प्रकारचे प्राधिलेख काढण्याची सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी असेल.

**५) संघराज्य प्रबळ तर राज्यांनाही अधिकार :**

केंद्रसरकार व सर्व राज्य सरकारांवर संविधानाचे नियंत्रण असते, नव्हे तर त्या सर्वांचे मार्गदर्शन संविधानच करते. सर्व राज्यांना त्यांचे अधिकार बहाल केलेले आहेत व त्यानुसार त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु कोणतेही राज्य सरकार आपणांस संघराज्यापेक्षा वरचढ समजू शकणार नाही. कारण संघराज्य नेहमीच बळकट राहील अशी योजना संविधानानेच केली आहे. त्यासाठी एकेरी नागरिकत्व, संघसूची, राज्य विषय सूची, समवर्ती विषय सूची तयार करण्यात आले आहेत. आतापर्यंत (सन २००३) संघसूचीमध्ये ९९ विषय, राज्यसूची मध्ये ६१ विषय तर समवर्ती सूचीमध्ये ५२ विषयांची यादी आहे. ज्यावेळी संघसरकार व राज्य सरकार यांच्यातील कायद्याबाबत वाद निर्माण होतो तेव्हा संघ सरकारचाच कायदा वैध मानला जावून राज्याचा कायदा अवैध ठरतो. तर आणीबाणी संबंधीच्या अधिकारांमध्ये संघसरकारला घटनात्मक यंत्रणा कोलमडण्याच्या कारणाने राज्य सरकार बरखास्त करुन त्याजागी राष्ट्रपती शासन लागू करण्याचा अधिकार आहे.

**६) संसदीय लोकशाही :**

आपण संसदीय लोकशाहीचा स्विकार केलेला असून राष्ट्रपती हे संविधानिक व कार्यकारी प्रमुख आहेत. तर पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून कार्य करते व प्रत्यक्ष सरकार चालविते. असे म्हटले जाते की, राष्ट्रपती हे राज्याचे नामधारी प्रमुख असतात तर खरी सत्ता ही पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ यांच्या हातात असते. भारतीय संसद द्विगृही असून राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह तर लोकसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. ही दोन्ही सभागृहे आपल्या लोकप्रतिनिधीं मार्फत बहुमताने देशातील जनतेसाठी ठराव, कायदे पारित करीत असतात.

**७) राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (कलम ३६-५१) :**

राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे ही अतिरिक्त कायदेशीर सूचना व मार्गदर्शक भाग आहे. राज्य सरकार व संघसरकार यांनी आपली पाच वर्षांची राजवट करताना कोणत्या सूचनांचे पालन करावे व आपले सरकार व एकूणच आपले राष्ट्र कसे कल्याणकारी राज्य आहे हे सिद्ध करणे गरजेचे आहे. सरकारने या मार्गदर्शक तत्वांचे पालन केले नाही तर नागरिक त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागू शकत नाहीत. तरीही सरकारला या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे भाग पडते. याचे कारण म्हणजे जे लोक अशा सरकारला निवडून देतात त्यांना पुन्हा निवडून देता येणार नाही हे त्याला पक्के माहित असते. उदा. कलम ४५ मधील तरतूद म्हणते की, भारतातील ६ ते १४ वयोगटाच्या मुलांस मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी सरकारची ही नैतिक जबाबदारी आहे की, त्यासाठी शाळा बांधकाम, शिक्षकांच्या नेमणूका, त्यांचे वेतन, इमारती बाधणे इ. गोष्टी सरकारला करणे क्रमप्राप्त आहे.

**८) धर्मनिरपेक्षता :**

या तरतूदीचा संविधानात इ.स. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्ती नुसार समावेश करण्यात आला. याचा अर्थ ‘राष्ट्रधर्म’ अशा प्रकारचा कोणताही भारताचा धर्म नाही. तसेच भारत सरकार कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे लांगूलचालन करणार नाही किंवा तिरस्कारही करणार नाही. तसेच राज्य कोणत्याही धर्मामध्ये हस्तक्षेप करणार नाही व कोणावरही धार्मिक सक्ती करणार नाही. धर्म ही खाजगी बाब आहे. कोणत्याही धर्माचा सरकारवर पगडा नसेल.

प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्य आहे व त्याला उपभोगता यावे यासाठी राज्यसरकार प्रयत्न करील. या तत्वामुळेच भारतामध्ये वेगवेगळ्या धर्माचे नेते राष्ट्रपती, पंतप्रधान या पदावर होऊन गेले.

### ९) एकेरी नागरिकत्व :

अमेरिकेच्या संविधानाने त्यांच्या नागरिकांना दुहेरी नागरिकत्वाची मुभा दिली आहे. एक देशाचे नागरिकत्व तर दुसरे राज्याचे नागरिकत्व होय. याउलट भारतीय परिस्थितीनुसार सविधानाने भारतीय नागरिकास फक्त एकेरी म्हणजे देशाचे नागरिकत्व बहाल केले आहे. कारण राज्याचे नागरिक फक्त आपल्या राज्याशी एकनिष्ठ राहतील परंतु देशाचे काय? हा मोठा धोका भारतात संभावतो. तसेच संचार स्वातंत्र्याशी किंवा कुठेही राहण्याच्या अधिकाराचे काय झाले असते? म्हणून भारतीय नागरिक कोणत्याही भेदभावाशिवाय कुठेही राहू शकतो, शिक्षण घेऊ शकतो, नोकरी-व्यवसाय करु शकतो. याच एकेरी नागरिकत्वामुळे 'मी प्रथमही भारतीय व अंतिमही भारतीय आहे' अशी भावना जोपासण्यास मदत होते. या एकरी नागरिकत्वामुळे विविध भाषा, धर्म, प्रदेश, स्त्री-पुरुष असे भेद न पाळता लोकांमध्ये राष्ट्रीय एकोपा व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होण्यास मदत होते.

### १०) स्वतंत्र न्याययंत्रणा :

भारतीय संविधानाच्या तीन स्तंभांपैकी (विधानमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ) न्याय यंत्रणा ही स्वतंत्र ठेवण्यात आली असून त्यांना जादा अधिकार देण्यात आले आहेत. सर्वोच, उच्च, दुय्यम न्यायालयांची रचना व त्यांतील न्यायाधिश, त्यांची पात्रता, सेवा, शर्ती, अटी यांची तरतूद संविधानात स्पष्ट करण्यात आली आहे. न्याय यंत्रणेला पूर्णपणे स्वतंत्र ठेवण्यात आले आहे. न्यायालयांना विधीमंडळ अथवा कार्यकारी मंडळाचा कायदा, निर्णय,नियम, ठराव संविधान विरोधी असल्यास अवैध ठरविण्याचा अधिकार आहे.

### ११) न्यायिक पुनर्विलोकन :

सर्वोच्य व उच्च न्यायालये संविधानाचे रक्षक मानले जातात. त्यांना संविधानातील तरतूदींचा अंतिम अन्वयार्थ लावण्याचे अधिकार आहेत. म्हणूनच सरकार कोणताही कायदा, नियम, पारित करताना त्याची संविधानिक वैधता प्रथम तपासून पाहते व संविधानाचे कोणतेही उल्लंघन होणार नाही यांची काळजी घेते. बऱ्याच वेळेस राज्य विधानमंडळे किंवा संसदेने पारित केलेले कायदे संविधानाशी पूरक नसतात. अशा वेळी हे कायदे पूर्णपणे रद्द करण्याचे किंवा ते वैध ठरविण्याचे अधिकार न्यायालयांना असतात त्याला न्यायिक पुनर्विलोकन असे म्हणतात.

### १२) जुन्या राजवटीचा अंत व नव्या राजवटीस प्रारंभ :

आपले संविधान हे खऱ्या अर्थाने क्रांतीकारी आहे. भारताचा राज्यकारभार प्राचीन काळापासून मनुस्मृतीवर आधारित होता, धर्मशास्त्रांवर आधारित होता. येथील कायदे त्याप्रमाणेच होते. परंतु आता त्याऐवजी संविधान आले. पूर्वी समानता, स्वातंत्र्य, न्याय, समान संधी-दर्जा यांना अजिबात भारतीय समाजात थारा नव्हता. तसेच जातीय, स्त्री-पुरुष, धार्मिक भेदभाव इतका बोकाळला होता की, खालच्या जाती, स्त्रीया यांना जीवन जगणे कठीण झाले होते. अस्पृश्यतेचा कलंक येथील भारतीय समाजाला लागला होता. परंतु भारतीय संविधानाने या

सर्व त्रुटी दूर केल्या आहेत. स्त्रिया कमकुवत वर्ग यांना संरक्षण देण्यात आले आहे. म्हणूनच भारतीय संविधान म्हणजे जुने युग जाऊन नव्या युगाचा प्रारंभ होय.

**१३) इतरांच्या चांगल्या गोष्टींचा समावश :**

संविधानाच्या शिल्पकारांनी इतर देशातील प्रचलित राज्यघटनांचा सखोल अभ्यासकेला व त्यातील जी काही चांगली तत्वे असतील त्यांचा भारतीय सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीनुसार भारतीय संविधानात समावेश केला.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न -१) भारतीय संविधान अंशतः ताठर व अंशतः लवचिक आहे म्हणजे काय ?

२) स्वातंत्र्याचे अधिकार सांगा.

३) न्यायिक पुनर्विलोकन म्हणजे काय ?

## ६.७ सारांश

भारतीय संविधाननिर्मिती पाठीमागे ब्रिगेश सरकारने वेळच्या वेळी काही कायदे केले व भारतीय जनतेचा असंतोष कमी करण्याचे उपाय केले. भारतीय नेत्यांची आंदोलने सतत चालूच होती आणि इ.स. १९४६ कॅबिनेट मिशनला संविधान निर्मितीसाठी संविधान सभेची शिफारस करावी लागली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु तत्पूर्वीच ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक होऊन संविधान निर्मितीला सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसचे सदस्य नसतानाही त्यांना त्यांच्या सांविधानिक कायद्याच्या सखोल ज्ञानामुळे संविधान सभेचे सदस्य बनवून मसुदा समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. संविधानाच्या आराखडा तयार करण्याचे काम या समितीने मोठ्या कष्टाने पार पाडले व त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरना जाते.

आपले संविधान हे अनेक प्रकारची मूल्ये, कल्पना, महान विचार यांवर आधारित आहे. जगातील तत्वज्ञनाच्या अनेक चांगल्या तत्वांच्या पायावर ते उभे आहे. भारतीय संविधान हे जगातील एक प्रदीर्घ व लिखित संविधान असून ते लोकशाही तत्वांवर आधारित आहे. येथील नागरीकाला मूलभूत अधिकारांबरोबर मूलभूत कर्तव्येसुद्धा दिली आहेत. भारतीय संविधान हे सर्व भारतीयांना, त्यांचे अनेक जाती, धर्म, पंथ, वेशभूषा, भौगोलिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी असली तरी एकजूट ठेवण्याचे कार्य करते. संविधान मुळेच जनतेमध्ये शांती, सलोखा, सहिष्णुता यांना

munotes.in

प्रोत्साहन मिळते. त्यामुळेच आपल्या सांविधानिक तरतूदींचा आधार आज अनेक नवनिर्मित देश घेत आहेत.

## ६.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१. भारतीय सांविधानाचे तात्विक अधिष्ठान स्पष्ट करा.

२. भारतीय संविधान रचना स्पष्ट करा.

३. भारतामध्ये सहिष्णुता, शांती आणि जातीय सलोखा कसा वाढीस लागेल ? विश्लेषण करा.

४. भारतीय संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये कोणती ? चर्चा करा.

५. थोडक्यात टीपा लिहा.

अ) भारतीय संविधान निर्मिती

ब) भारतीय नागरीकाची मूलभूत कर्तव्ये

क) संविधानाची प्रास्ताविका

ड) जातीय सलोखा राखण्याचे उपाय

इ) मूलभूत हक्क

munotes.in

# घटक -७

## राजकीय प्रकियेतील महत्त्वाचे घटक

**पाठाची रचना :**

७.० उद्दिष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ भारतातील राजकीय पक्ष पद्धती
७.३ महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्त्व
७.४ सारांश
७.५ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

### ७.० उद्दिष्टे

या प्रकरणामुळे आपल्याला भारतातील राजकीय प्रक्रिया समजून घेण्यास मदत होईल.

- भारतातील राजकीय पक्ष पद्धती, त्यांची वैशष्ट्ये, त्याचा विकास आणि गुण व दोष.
- ग्रामपंचायती संदर्भात ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामपंचायती ह्या स्वशासन धोरण कसे राबवू शकतात हे सांगता येईल.
- ७४ वी घटना दुरुस्ती व नगर परिषदा आणि महानगरपालिका यांची माहिती सांगता येईल.
- भारतातील स्त्रियांच्या राजकारणातील धवेशाचा आढावा.
- भारतीय स्त्रियांच्या राजकीय सहभागातील अडथळे.
- भारतीय महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्त्व.

### ७.१ प्रस्तावना

भारतासारख्या विकसनशील देशाच्या विकासामध्ये त्याला विकसीत बनविण्यासाठी राजकीय पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरते. कोणत्याही देशाची प्रगती ही तेथील राजकीय पक्षाच्या कार्यशक्तीवर अवलंबून असते. त्यामुळे देशाच्या विकासात राजकीय पक्ष, त्यांची भूमिका, त्यामध्ये असलेला लोकांचा सहभाग, महिलांची भूमिका इ. घटक महत्त्वाचे ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यावेळी घटना लिहिली त्यावेळी त्यांच्या समोर एक पक्ष पद्धती, द्विपक्ष पद्धती आणि बहुपक्ष पद्धती असे अनेक पर्याय होते. परंतु तत्कालीन देशांती सर्व राजकीय पक्षांचा अभ्यास करून भारतासारख्या बहुभाषिक, बहुधर्मिय, लोकसंख्या असलेल्या देशालासुद्धा बहुपद्धती असणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी बहुपक्ष पद्धतीचा स्वीकार केला हे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता असलेल्या भारतामध्ये आज अनेक राष्ट्रीय, प्रादेशिक पक्षाचा उदय व विकास होत गेलेला दिसून येतो. त्याचबरोबर ग्रामीण भागातील

जनतासुद्धा राजकीय क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवू लागले. महिलांनीसुद्धा आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखविले होतेच. बदलत्या परिस्थितीनुसार आपणही राज्यघटनेमध्ये बदल करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले. या दृष्टीने ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती महत्त्वाची ठरते.

## ७.२ भारतातील राजकीय पक्ष पद्धती :

मनुष्य हा स्वभावः समाजशील आहे. तो एकाकी राहु शकत नाही. संघ करुन राहणे ही त्याची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. विचार भिन्नतेमुळे समाजात निरनिराळे संघ किंवा लोकसमूह निर्माण होतात. अशा प्रकारची विचार भिन्नता आर्थिक, सामाजिक, धार्मिक, तत्वज्ञान विषयक किंवा अन्य स्वरुपाची असू शकते. राजकीय पक्षांच्या उदयाला हे घटक कारणीभूत होऊ शकतात.त्यांच्यातील भिन्नतेमुळे पक्ष भिन्नता निर्माण होऊ शकते. राजकीय पक्ष हे समाजातील संघटित गट असतात. त्यांना राजकीय म्हणतात कारण ते राज्यातील सत्तेशी संबंधित असतात.

### ७.२.१ राजकीय पक्ष व्याख्या :

एडमंड बर्क यांच्या मते, "राजकीय तत्वज्ञानाच्या बाबतीत एकमत असलेला व संघटितपणे राष्ट्रीय हितसंबंध जपणारा लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय". मॅक आयव्हर यांच्या मते राजकीय पक्ष म्हणजे एखाद्या तत्वाला किंवा उद्दिष्टाला पाठिंबा देण्यासाठी संघटित झालेली संस्था. अशी संस्था घटनात्मक मार्गाने ते तत्व किंवा उद्दिष्ट शासन संस्थेचे उद्दिष्ट म्हणून ठरवण्याच्या प्रयत्न करते. या विचारवंताच्या विचारातून पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१) राजकीय पक्ष ही लोकांची संघटना असते. पक्षाच्या मुलभूत तत्वाविषयी त्या लोकांत एक वाक्यता असते.

२) राजकीय पक्ष सत्ता हस्तगत करुन आपल्या तत्वांच्या चौकटीत लोककल्याण साधण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे राजकीय पक्ष म्हणजे समान राजकीय मते व ध्येय असणाऱ्या व्यक्तींची ऐच्छिक संघटना. ही संघटना शासनावर नियंत्रण ठेवून आपले धोरण साध्य करण्याचा प्रयत्न करते.

### ७.२.२ भारतातील पक्ष पद्धतीचा उदय व विकास :

भारतात १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. परंतू शासन संस्था राबविणे या उध्देशाने नाही तर देशाला मुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट ठेवून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. पुढे ब्रिगेश कायद्याच्या चौकटीत राहून राष्ट्रीय काँग्रेसने सत्ता प्राप्ती करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. स्वातंत्र्य पूर्व काळात मुस्लिम लिग व हिंदू महासभा या संघटना सुद्धा विशिष्ट्ये हेतूने स्थापन करण्यात आले. परंतु या दोन्ही संघटना राजकीय पक्षापेक्षा धार्मिक पक्ष म्हणूनच लोकप्रिय झाल्या.

स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षाविषयी स्पष्टपणे कोणत्याही घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या नाहीत. परंतु कलम १९ प्रमाणे नागरिकांना संघटना स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याची परिणती म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळ अत नवनवीन राजकीय पक्ष उदयास येत आहे. राज्यघटनेच्या ३२४ व्या कलमान्वये निवडणुकांचे संचालन, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचे

कार्य निवडणूक आयोगाकडे सोपविले आहे. त्यामुळे निवडणूका लढविणाऱ्या राजकीय पक्षाना मान्यता देणे, त्यांच्यासाठी चिन्हे राखून ठेवणे इत्यादी कामे हे आयोग करते.

### ७.२.३ भारतात पक्ष पद्धतीचा विकास विविध टप्प्यात झाल्याचे दिसून येते :

१) १९४७ ते १९७७ : १९५० ला समाजवादी पक्ष, १९५१ ला भारतीय जनसंघ, १९५७ ला स्वतंत्र पक्ष, १९५७ रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया, १९६६ ला शिवसेना इत्यादी पक्ष उदयास आले. पण या काळात एकपक्ष प्रभुत्व पध्दती अस्तित्वात होती. काँग्रेस अतिशय प्रभावी पक्ष होता.

२) १९७७ ते १९८० : काँग्रेस पक्षाचा प्रभाव या कालखंडात कमी झाला व विविध विचारसरणीचे लोक एकत्र येवून जनता पक्षाची सत्ता आली.

३) १९८० ते १९८९ : या काळात पुन्हा काँग्रेस पक्षाचे शासन होते. ह्या काळात एक पक्ष प्रभुत्व पद्धती दिसून येते.

४) १९८९ पुढे : बहुपक्ष पद्धती व संमिश्रे आघाडी सरकार यासाठी हा प्रसिद्ध कालखंड आहे.

### ७.२.४ भारतीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये :

**अ) बहुपक्ष पद्धती :** भारताच्या राजकीय वातावरणात अनेक राजकीय पक्ष आढळतात. राष्ट्रीय स्तरावरील पक्ष फुटून नवीन पक्ष निर्माण झाले. काही पक्ष, नेत्यांनी स्थापन केले. प्रादेशिक पक्षांची त्यात भर पडली. छोटे-मोठे मिळून ७५ पेक्षा अधिक पक्ष आहेत. कमी होण्यापेक्षा त्याच्या वाढण्याकडे अधिक कल आहे.

**ब) एक पक्ष प्रभुत्व पद्धती :** तांत्रिकदृष्ट्या आपल्याकडे बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे.परंतू १९७७-७५, १९८९-९१, १९९६-९७-१९९८, १९९९-२००४ हा काळ वगळता केंद्रात कांग्रेस पक्षच सत्ताधारी पक्ष राहिला आहे. भारताच्या राजकीय पक्षावर काँग्रेसचे स्थान प्रमुखच राहिले आहे. काँग्रेस पक्षामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले अशी अनेक लोकांची समजूत आहे. बरेच राजकीय पक्ष व त्याचे नेते हे काँग्रेस पक्षाचा कधीतरी एक भाग होते. राष्ट्रीय स्तरावर काँग्रेसला गंभीर धोका उद्‌भवलेला नव्हता. तथापि गेल्या काही वर्षात काँग्रेसचा प्रभाव कमी होत असलेला दिसून येत आहे.

**क) दुर्बल व असंघटित विरोधी पक्ष :** लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीसाठी बलवान विरोधी पक्ष आवश्यक असतो. परंतु भारतात विरोधी पक्ष दुर्बल आहेत. विरोधी पक्षांची संख्या प्रचंड आहे त्यामुळे त्यांच्या सामर्थ्यांचे विघटन होते.

**ड) राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष :** काही पक्ष राष्ट्रीय स्तरावर कार्य करतात. त्यात काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पक्ष इत्यादींचा समावेश होतो. शिवसेना, अकाली दल इत्यादी पक्ष प्रादेशिक स्वरुपाचे आहेत. प्रदेश निष्ठा चेतवली गेल्याने राज्यात प्रादेशिक पक्ष अधिक लोकप्रिय झाले. तेवढ्या प्रमाणात राष्ट्रीय पक्षांचा जनाधार कमी झाला. राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्षांचे महत्व लक्षात घ्यावे लागले. त्यांच्याशी तडजोड करावी लागली.

munotes.in

**इ) नेतृत्वावर आधारीत :** नेतृत्वावर आधारित पक्ष हे भारतातील पक्ष पद्धतीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. पक्षाच्या नेत्याच्या नावाने त्या त्या राजकीय पक्षाला ओळखण्यात येते. नेत्यांमधील संघर्ष, त्यांचा अहंकार, त्यांच्यातील अधीक बेब नाव हेच बहुतेक राजकीय पक्षांच्या स्थापनेचे कारण आहे.कोणत्याही दोन राजकीय पक्षांमध्ये तीव्र स्वरुपाचा वैचारिक संघर्ष दिसत नाही. पक्ष नेतृत्वात मतभेद झाले की पक्षाचे विभाजन होते व नवीन पक्ष निर्माण होतो.

**ई) पक्षातंर :** विविध राजकीय पक्षाचे सदस्य अनेकदा पक्षातंर करताना आढळतात. अनेक वेळा या पक्षांतराचे कारण वैचारिक नसते. सत्ता मिळविण्याचा विचार सर्वात वरचढ ठरतो. कालचे शत्रू आजचे मित्र बनतात. निवडणूक जिंकल्यानंतर पक्ष बदल करणे म्हणजे एक प्रकारे मतदारांचा विश्वासघात होय. म्हणून पक्षांतर बंदीचे कायदे केले आहेत. पक्षांतर करणे ही भारतीय राजकारणाची एक गंभीर समस्या बनली आहे.

**उ) प्रबळ प्रादेशिक पक्ष :**

अनेक प्रांतात प्रादेशिक पक्ष स्थानिक धश्नांना वाचा फोडणे या भावनेने उदयाला आले आहेत. आपापल्या राज्यात काँग्रेसला पर्याय म्हणून हे पक्ष वावरतात. राष्ट्रीय पक्ष आपले हित संबंध जोपासण्यात असमर्थ आहेत अशी लोकभावना आहे. या भावनेमुळे राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष प्रबळ होतात. भारताच्या आजच्या राजकारणामध्ये ‘प्रादेशिकता“ हा राजकारणातील प्रभावी घटक आहे. आज भारतात अनेक प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आहेत.उदा. द्रविड मुन्नेच कळघम, तेलगू देशम पक्ष, समाजवादी पक्ष, अकाली दल, आसाम गणतंत्र परिषद, शिवसेना इ.

**ऊ) विचारांचा आधार :** भारतातील बहुसंख्य राजकीय पक्ष कोणत्यातरी विचारप्रणालीचा पुरस्कार करतात.समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही इत्यादी विचारांना बांधलेले असल्याचा दावा करतात. सत्ता मिळविणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट नसते. ते सत्तेच्या माध्यमातून विचार कृतीशील करण्याचे आश्वासन देताना दिसतात.

**ए) विरोधी पक्षाच्या मर्यादा :** पंतप्रधनांना आपल्या पत्नी पेक्षाही विरोधी पक्ष नेत्याचा अधिक परिचय असतो असे इंग्लडंच्या संसदीय लोवशाही बघ्ल म्हटले जाते. विरोधी पक्षाचे सरकारवर नियंत्रण असते.अभ्यासपूर्ण टीका टिपणी केली जाते व जागरुक लोकमत आपणास अनुकूल व्हावे म्हणून प्रयत्नकेला जातो. भारतात अनेक वर्षे एक पक्षीय वर्चस्व होते. विरोधी पक्षांचा विरोध बांधट होता.आता एक पक्षीय वर्चस्व राहिले नाही. तरीही विरोधी पक्ष हवा तितका प्रभावी नाही.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न -१) भारतातील पक्ष पद्धतीचा उदय व विकास जाणून घ्या.

२) भारतीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये जाणून घ्या.

munotes.in

## ७.३ महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्व :

आज सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवलेले दिसते. एकेकाळी केवळ पुरुषांची मक्तेदारी समजण्यात येणारी अनेक क्षेत्रे आज स्त्रियांनी स्वकर्तृत्वार पादाक्रांत केली आहेत. मात्र यासाठी स्त्रियांनी अनेक वर्षे पुरुषसत्ताक समाजाशी संघर्ष करावा लागला. केवळ भारतात नव्हे तर अमेरिका, इंग्लडंसारख्या प्रगत देशांमध्येही स्त्रियांच्या प्रदीर्घ संघर्ष करावा लागला. केवळ स्त्री असल्याने नाकारण्यात आलेल्या राजकीय, आर्थिक हक्कांसाठी, सामाजिक दर्जासाठी स्त्रियांना पराकोटीचा संघर्ष करावा लागला. स्त्री ही देखील माणूस आहे, तिला हक्क नाकारणे म्हणजे अर्ध्या मानवतेला वंचित ठेवणे आहे या जाणिवेतून स्त्रीवादाचा जन्म झाला. या जाणिवेतूनच जगाच्या विविध भागात स्त्रियांच्या हक्कासाठी वेगवेगळ्या पद्धतीने लढा उभारण्यात आला आणि स्त्रियांना राजकीय, सामाजिक, आर्थिक न्याय मिळण्यास सुरुवात झाली. परंतु ही लढाई अजून चालूच आहे, अजूनही या आधुनिक युगात स्त्रियांना समान न्याय हक्क मिळाला नाही.

### ७.३.१ भारतीय स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशाचा आढावा :

२००९ साली झालेल्या लोकसभा निवडणूकीतील आकडेवारीनुसार लोक सभेवर निवडुन गेलेल्या स्त्रियांची संख्या केवळ ५९ आहे. लोकसभेच्या एकूण संख्येच्या ही केवळ ११% एवढी आहे. महिलांना संसदेत ३३% आरक्षण असावे अशी मागणी स्त्रीवादी चळवळ, स्त्रियांच्या संघटना वारंवार करतात. सर्व पक्षातील स्त्री खासदारांमध्येही याबाबत एकमत दिसुन येते. मात्रही मागणी आजतागायत अपूर्णच राहिली आहे. महिला आरक्षण विधेयक वेळोवेळी संसदेत मांडले जावुनही संमत झालेले नाही. स्त्रियांच्या राजकीय सहभाग व हक्कासांठी ब्रिग्शि वींळापासून विविध प्रकारचे प्रयत्न होत आलेले दिसतात.

१९१७ साली भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधीमंडळाने लॉर्ड मॉन्टेग्यू यांची भेट घेऊन स्त्रियांसाठी मताधिकाराची मागणी केली. पुढे १९२० साली संपत्तीदार स्त्रियांना मताधिकार बहाल केला गेला. मात्र त्यांना विधी मंडळात प्रवेश नव्हता. १९३० साली वूमेन्स इंडिया असोसिएशन च्या प्रतिनिधींच्या सततच्या पाठपुराव्याने विधीमंडळ धवेश स्त्रियांना खुला झाला. मुथु लक्ष्मी रेड्डी या पहिल्या प्रतिनिधी म्हणून विधीमंडळावर कार्यरत झाल्या. १९३० साली इंग्लंड येथे आयोजित गोलमेज परिषदेत बेगम जहानआरा शाहनवास व राधाबाई सुब्बरायन या स्त्री कार्यकर्त्यांनी स्त्रियांसाठी विधीमंडळामध्ये ५% आरक्षणाची मागणी केली. पुढे १९३५ च्या भारत सरकार कायद्याद्वारे स्त्रियांच्या मताधिकाराचा व विधीमंडळ प्रवेशाचा पाया व्यापक करण्यात आला. या कायद्यांतर्गत घेण्यात आलेल्या प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणूकांतून एकूण ५६ स्त्रिया प्रांतिक विधीमंडळ सदस्य बनल्या. याशिवाय ३० स्त्रिया केंद्रिय विधीमंडळावर निवडून गेल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या नेतृत्वाखाली बनविण्यात आलेल्या राजघटनेत सर्व जाती, धर्माच्या वंशाच्या भारतीय स्त्रियांना समान घटनात्मक अधिकार देण्यात आले. पुढे १९९२ च्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्त्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण देण्यात आले. त्यामुळे अनेक स्त्रियांनी राजकारणात धवेश करुन आपला ठसा उमटविला.

munotes.in

### ७.३.२ भारतीय स्त्रियांच्या राजकीय सहभागातील मर्यादा :

स्त्रियांच्या राजकीय सहभाग हा विविध घटकांवर अवलंबून असतो. स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन, परंपरा, चालीरिती, जातीव्यवस्था, लिंगभेद इत्यादीच्या प्रामुख्याने समावेश करता येईल. भारतीय राज्यघटनेनुसार जरी स्त्रियांना राजकारणात समान अधिकार प्राप्त झाले असले तरी त्याची अंमलबजावणी मात्र योग्य प्रकारे केली जात नाही. किंबहुना हे अधिकार महिलांना मिळू नयेत यासाठी पुरुषसत्ताक मानसिकतेकडुन प्रयत्न केले जात आहेत.

### ७.३.३ भारतातील स्त्रियांचा राजकारणातील आढावा :

२००९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत एकूण ५५० पैकी फक्त ५९ स्त्रिया खासदार बनल्या याचाच अर्थ आजही लोकसभेमध्ये ८९% पुरुषांची मक्तेदारी दिसून येते. उर्वरीत ५९ पैकी किती महिला या स्व-कर्तृत्वावर निवडून आलेल्या आहेत हा संशोधनाचा विषय आहे. कारण भारतीय राजकारणामध्ये प्रस्थापितांनी आपल्या घरातील स्त्रियांना राजकारणामध्ये प्रवेश जरी दिला असला तरी निर्णय मात्र ते स्वतः घेतात. भारतीय राजकारणामध्ये काही मोजक्या स्त्रियांनी पुरुषसत्ताक मानसिकतेला विरोध करून आपले स्वतःचे स्थान निर्माण केलेले दिसून येते. यामध्ये मायावती, जयललिता, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज, सोनिया गांधी इ. हिलांचा विशेष उल्लेख करावा लागेल. ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ३३% आरक्षण दिले आहे. त्याचप्रमाणे विधानसभा, लोकसभेसाठी सुद्धा आरक्षणाची आवश्यकता आहे. तरच खऱ्या अर्थाने स्त्रि-प्रतिनिधींची संस्था वाढलेली दिसून येईल.

**आपली प्रगती तपासा.**

प्रश्न -भारतीय स्त्रियांचे राजकारणातील महत्त्व आणि भूमिका जाणून घ्या.

## ७.५ सारांश :

अशा प्रकारे भारतातील बहुपक्ष पद्धती, त्यातील महिलांचे स्थान, ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीचे दूरगामी परिणाम दिसून येतात. खऱ्या अर्थाने हे तीनही घटक एकमेकांशी संबंधीत व एकमेकांवर अवलंबून आहेत. याची प्रचीती सद्य परिस्थितीतील राजकीय घटनांचा आढावा घेतल्यास लक्षात येईल. आज भारतातील बहुतेक प्रमुख पक्षांची जबाबदारी ही महिलांकडेच आहे. ग्रामीण भागात महिला राजकारणात पुढे येत आहेत. अनेक पक्षांनी सुद्धा पारंपारिक विचारसरणीचा त्याग करून जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत

munotes.in

आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण भागातील जनतेला सुद्धा राज्य हाकण्याची संधी प्राप्त झाली आहे. अशा प्रकारे भारतीय राजकारणामध्ये आमूलाग्र बदल झालेले दिसून येतात.

## ७.६ विद्यापीठीय स्तरीय धश्न

१. भारतातील राजकीय पक्षपद्धती विषयी माहिती सांगा.

२. ७३ वी ७४ वी घटना दुरुस्ती व भारतीय राजकारण चर्चा करा.

३. भारतीय महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्त्व सांगा.

❖❖❖❖

munotes.in